॥ग्रंथाली॥

इ-दिवाळी अंक २०१५ - दुबई

४१

अतिथी संपादक

मेघना अशोक वर्तक

# वाळवंटातील दुबई





# शुभ दीपावली !



दीपमाळेच्या कळ्या-कळ्यांतुन
तेज:पुंज प्रकाश...
अर्थपूर्ण सेवेतून गवसे
समृद्धीचे अवकाश



**आमचे सर्व सभासद, ग्राहक व सर्व हितचिंतकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !**

सारस्वत
बँक

## दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(शेड्युल्ड बँक)

मिले यहाँ, दोनो जहाँ

प्रशासकीय कार्यालय: एकनाथ ठाकूर भवन, ९५३, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई -४०० ०२५. दुरध्वनी - (०२२) ६६०० ५५५५




||ग्रंथाली||

दुबई इ-दिवाळी अंक

नोव्हेंबर २०१५

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

अतिथी संपादक : **मेघना अशोक वर्तक**

मुखपृष्ठ : **शैलेंद्र साठे**

मांडणी : **अनिरुद्ध गद्रे**

**कार्यालयीन संपर्क**

कॉम्प्युटर युनिट - **योगिता मोरे/अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com

मुंबई प्रतिनिधी - **धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

इ-जाहिरात प्रसिद्धी - **संजीवनी पाटील**

**पत्रव्यवहारचा पत्ता**

ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प.),
मुंबई ४०००१६ ☎ 24306624/24216050
granthali02@gmail.com
www.granthali.com

**मेघना अशोक वर्तक**
पी.ओ.बॉक्स ८७७६
दुबई, यु.ए.ई.
meghana.sahitya@gmail.com
meghana_vartak@yahoo.com



अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.




## संपादकीय

नमस्कार मंडळी,

'प्रथम तुम्हा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! नूतन वर्ष हे तुम्हा सर्वांना भरभराटीचे सुखसमृद्धीचे आणि स्वप्नपूर्तीचे जावो!'

गेली ४० वर्षे, मराठी प्रकाशन क्षेत्र आणि साहित्यासाठी कार्यरत असलेल्या 'ग्रंथाली' या संस्थेने गतवर्षी म्हणजे २०१४ मध्ये 'वाळवंटातील वटवृक्ष' हा इ-दिवाळी दुबई विशेषांक प्रकाशित केला. या अंकाला तुम्हा सर्वांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. त्यातूनच स्फूर्ती मिळून 'ग्रंथाली'चा २०१५चा इ-दिवाळी दुबई विशेषांक तयार झाला. 'वाळवंटातील वटवृक्ष' या इ-दिवाळी अंकाचे दुसरे पुष्प आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे.

या अंकाद्वारे शब्दरूपाने का होईना; पण तुम्हा सर्वांशी संवाद साधता येतो, घडलेल्या घडामोडींची देवाणघेवाण करता येते, पुस्तकरूपाने जगाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या मराठी वाचकांपर्यंत पोहोचता येते, विचारांचा मेळ जमतो व ऋणानुबंधांच्या गाठी घट्ट होतात.

'वाळवंटातील वटवृक्षा'च्या या पारंब्या, जमिनीपर्यंत पोचून, आलेले नवांकुर सूर्यप्रकाशाकडे झेपावत आहेत. 'मराठी पाऊल सर्व क्षेत्रात मागे आहे' असे सर्वत्र म्हटले जाते. पण हा समज दुबईत आलेल्या मराठी बांधवांनी खोटा ठरवला आहे. या अंकात, पुढे पडलेल्या मराठी पावलांचा पायरव या वटवृक्षाच्या सावलीत मनामध्ये गुंजत राहतो. दुबईच्या जीवनातील सर्व क्षेत्रांत, बुद्धिमत्ता, चिकाटी आणि परिश्रम यांच्या बळावर त्यांनी मराठी नाव कोरले आहे, मराठी मातीची छाप पाडली आहे. दुबईच्या जडणघडणीमध्ये contracting आणि consulting या





दोन्ही क्षेत्रात मराठी लोकांचे योगदान फार मोठे आहे आणि हे खचितच अभिमानास्पद आहे.

दुबईतील रेस्टॉरंटच्या व्यवसायात आज एक मराठी नाव अग्रभागी आहे आणि ते म्हणजे स्वरसम्राज्ञी उद्योजिका आशा भोसले! स्वर आणि स्वाद यांची सुरेख मैफल जमवलेल्या आशाताई यांचे 'आशाज्' हे रेस्टॉरंट प्रथम दुबईत सुरू झाले. आज ही वेल सर्व जगभर पसरली आहे. अस्सल महाराष्ट्रीयन पदार्थ मिळणारी अनेक उपाहारगृहे आज दुबईत उघडली आहेत आणि भिन्न प्रांतीय, देशीय, धर्मीय लोकांमध्ये मराठी पदार्थांची आवड निर्माण करण्यात ती यशस्वी ठरली आहेत.

दुबईतील इतर कोणताही व्यवसाय घ्या, chemicals चा व्यवसाय घ्या किंवा movers packers चा, printing घ्या किंवा painting घ्या, advertising घ्या किंवा food industry घ्या, Electronic व्यवसाय घ्या किंवा एकदम भिन्न असा certified organic mangoes चा व्यवसाय घ्या, अशा अनेक प्रकारच्या विविध व्यवसायांवर दुबईमध्ये मराठी माणसाने आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. काही व्यवसायरूपी पुष्पे मागील अंकात गुंफली, या अंकात वेळेअभावी आणि पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे अनेक फुले गुंफायची राहून गेली आहेत. संपादनाची अशीच संधी पुन्हा मिळाली तर नक्कीच तिसरी माला गुंफता येईल आणि या व्यावसायिकांच्या अनुभवांचा फायदा सर्वांना घेता येईल.

व्यावसायिक दुबईबरोबर सांस्कृतिक दुबईवरही मराठी माणसाने आपली छाप पाडली आणि तिला संपन्न केले. दुबईच्या अंतरंगात शिरून, अरबी लोकांचे जीवन, त्यांची वेशभूषा, आवडीनिवडी, त्यांची संस्कृती यांची माहिती करून घेत, येथील जीवनाशी समरस झालेले, महाराष्ट्राच्या मातीतील हे जीव इथे रुळले, रमले, स्थिरावले, वृद्धिंगत झाले आणि पाठी काही हरवलंय ही खंत न राहता दुबईचेच झाले.

इथे अरबी मराठी भाषेचे ऋणानुबंध जुळले. ग्रंथप्रेमींना वाचन कट्टा मिळाला, हळुवार कवीमनाला पालवी फुटली. महाराष्ट्र मंडळ हे परदेशातील माहेरघर मिळाले. त्या माहेराच्या सावलीत मराठी रंगभूमी नटली-सजली. गायन-वादन, सणवार जपले गेले, नवीन पिढीसाठी मराठी संस्कार वर्ग सुरू झाले आणि अध्यात्माच्या पंखाखाली मनाला शांती मिळाली.


अशा या दुबईच्या आयुष्यात भारतीयांना, स्वतःच्या भारतीयत्वाचा अभिमान वाटेल अशी घटना घडली ती म्हणजे तब्बल ३५ वर्षांनी १७ ऑगस्ट २०१५ रोजी भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी युएईत आले. दुबई क्रिकेट स्टेडियमवर ५०,०००हून अधिक भारतीय समुदायासमोर मोदीजींचे भाषण झाले. या भेटीमुळे भारताशी अनेक क्षेत्रांत गुंतवणुकीचे करार युएई सरकारने केले आणि दोन देशातील नाते घट्ट होण्यास नक्कीच मदत झाली. जात, पात, धर्म, भाषा, कोणताही राजकीय पक्ष या सर्वांपलीकडे जाऊन फक्त 'एक भारतीय' या नात्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभूतपूर्व स्वागत झाले. दुबईत राहणाऱ्या सर्व भारतवासीयांच्या दृष्टीने २०१५ मधील हे अविस्मरणीय क्षण म्हणावे लागतील. आणि अशा या ऐतिहासिक क्षणांची नोंद 'वाळवंटातील वटवृक्ष' या २०१५च्या 'ग्रंथाली'च्या 'इ-दिवाळी दुबई विशेषांकात' करावीच लागेल.

मोंदींच्या या भेटीतच युएई सरकारने अबुधाबीमध्ये मंदिरासाठी जमीन देण्याचे वचन दिले. युएईमध्ये अनेक स्थित्यंतरे होत आहेत. ४० वर्षांहून अधिक काळ वास्तव्य करणारे, आमच्यासारखे अनेक भारतीय या बदलाचे साक्षीदार आहेत. राहणीमान, जीवन पद्धती सर्वातच बदल झाले त्याबरोबर धार्मिक व्यवस्थेतही! एक काळ असा होता की पूजापाठ, गणपती उत्सव लपत-छपत, चोरून-मारून करावा लागत होता. पण आज गणपती उत्सव, विसर्जन हे खुलेपणे होऊ शकते. हे येथील सरकारचे सहिष्णुतेचे धोरण आहे, की जगाच्या नकाशावर बदललेल्या भारताच्या प्रतिमेचा हा परिणाम आहे, की बदलत्या काळाची पावले ओळखून धूर्तपणे उचललेले हे पाऊल आहे हे येणारा काळच ठरवेल!

पुढे पडलेले दुबईतील मराठी पाऊल हे असेच पुढे पुढे जावे आणि त्यांच्या पाऊलवाटेवरून जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेली अनेक मराठी पावले पुढे पडावीत हीच प्रार्थना!

या अंकाच्या निमित्ताने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांभे आभार आणि पुन्हा दीपावलीच्या शुभेच्छा! जय महाराष्ट्र!! जय मराठी!!!

– मेघना अशोक वर्तक





# अनुक्रम


१. नमो इन दुबई...!
समीर कुंटे / ५

२. मैफल स्वर अन् स्वादाची!
मेघना वर्तक / ९

३. Desert Alphonso
अमेय वर्तक / १७

४. Moving on
चिरंतन जोशी / २१

५. बदलती मुद्रणालये!
सागर ओक / २४

६. बिझनेसचा कावळा
विनीत पानसरे / २७

७. मनीषाचे मनीषाज् किचन
सचिन चितळे / २९

८. Professional Journey
सुहास/प्रीती रेगे / ३२

९. वाळवंटातील वाटचाल
मिलिंद देशमुख / ३५

१०. रंगांची दुनिया
अजय म्हसकर / ३८

११. इलेक्ट्रॉनिक विश्व
सुनील सबनीस / ४१

१२. Eventful दुबई
विवेक कोल्हटकर
मानसी खरे / ४३

१३. ऋणानुबंध
अरबी आणि मराठी भाषेचे
श्रीपाद गोखले / ४६

१४. स्थित्यंतरे
प्रशांत कुलकर्णी / ४९

१५. काहीच हरवलं नाहीये...!
प्रकाश केळकर / ५३

१६. मराठी ग्रंथप्रेमींचा
परदेशातील वाचनकट्टा
सीमा पाध्ये/स्वाती पानसरे / ५६


१७. दुबईच्या अंतरंगात...
शिल्पा मोहिते-कुलकर्णी / ६०

१८. मराठी रंगभूमी दुबईची
श्रीकांत/उमा राळे / ६७

१९. कथा वाळवंटाची (कविता)
नितीन खानापूरकर / ७१

२०. दुबईतील संस्कृती
संजीवनी पाटील / ७२


२१. आध्यात्मिक दुबई
सलील जामखेडकर / ७४

# नमो इन दुबई...!

समीर कुंटे







*१७ ऑगस्ट २०१५!*
*भारताचे पंतप्रधान*
*श्री. नरेंद्र मोदी यांचे दुबईत आगमन झाले. जात, धर्म, भाषा, पक्ष या सर्वांची बंधने झुगारून एक भारतीय या नात्याने सर्वांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. या अविस्मरणीय क्षणांच्या परिपूर्णतेसाठी ज्यांनी रात्रंदिवस मेहनत केली व कार्यक्रम यशस्वी केला अशा अनेक कार्यकर्त्यांपैकी एक श्री. समीर कुंटे यांच्याच शब्दांत...*
*कथा नमो इन दुबईची!*

१७ ऑगस्ट २०१५! दुबईत राहणाऱ्या भारतीयांच्या दृष्टीने अतिशय आनंदाचा, अभिमानाचा दिवस होता. कारण तब्बल ३५ वर्षांनंतर भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी UAEमध्ये येणार होते. तिथे त्यांच्या ओघवत्या वाणीत भाषण देणार होते. भारताची प्रतिमा जगाच्या नकाशावर उजळून टाकणार होते. सर्व दुबईवासी भारतीय या क्षणाची उत्सुकतेने वाट बघत होते. सर्वकडे मोदींच्या आगमनाची चर्चा चालू होती. कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी नाव रजिस्टर करायची धांदल उडाली होती.

मे २०१४ हे वर्ष भारताच्या राजकारणात ऐतिहासिक ठरले. नरेंद्र मोदी– अत्यंत गरीब परिस्थितीतून वर आलेला, रेल्वे प्लॅटफॉर्मवर चहा विकणारा मुलगा भारताचा पंतप्रधान म्हणून निवडून आला.

पंतप्रधानपदी आल्यानंतर अनेक धोरणांपैकी एक महत्त्वाचे धोरण त्यांना आखायचे होते ते म्हणजे जगातील सर्व देशांशी सलोख्याचे संबंध निर्माण करणे व सशक्त असे परकीय धोरण आखणे. भारत देशापुढे लोकसंख्या, दारिद्र्य, Unemployment अशी अनेक आव्हाने होती त्याला तोंड द्यायचे होते. त्याचबरोबर सर्व जगामध्ये 'fast developing nation' अशी भारताची प्रतिमा निर्माण करायची होती.

नरेंद्र मोदी हे आधी १० वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्या अनुभवावरून Indian Economy सुधारण्यासाठी काही नवीन योजना तयार केल्या त्या म्हणजे, 'Make in India' आणि 'Smart Cities!' या योगे direct foreign investment मुळे Indian Economy सुधारेल.

यासाठी पंतप्रधान झाल्यानंतर २७हून अधिक देशांना– जपान, कॅनडा, अमेरिका, चीन, श्रीलंका... भेटी दिल्या. आणि त्याचे आश्चर्यकारक results दिसले. त्यांच्या भेटीमुळे, भाषणामुळे प्रभावित होऊन, सर्वांमध्ये विश्वास निर्माण झाला की भारत हा investment साठी योग्य देश आहे. बिलिअन डॉलर्स गुंतवणुकीचे वचन या देशांनी भारताला दिले आहे.






जिथे जिथे PM गेले तिथे तिथे त्यांचे उत्साहात स्वागत झाले. केवळ त्या देशांच्या प्रमुखांकडून नव्हे तर भारतीय berucrates, business community, NRI's abroad अशी ५०,००० पर्यंत लोकं जमली होती व ह्यामुळे MAKE INDIAच्या campaign ला चालना मिळाली.

८ ऑगस्ट २०१५ रोजी मला BJP अध्यक्षांकडून फोन आला की दुबईच्या Indian Consulate मध्ये तातडीची मीटिंग आहे तर हजर राहा. कारण काहीच माहीत नव्हते. संपूर्ण दिवस अस्वस्थेतच गेला. tension आले. अखेर संध्याकाळी पाच वाजता H H Consulate General of India यांच्या अध्यक्षतेखाली मीटिंग झाली. आश्चर्याचा मोठा धक्का बसला! नरेंद्र मोदी १७ ऑगस्ट २०१५ला दुबईत येणार होते व त्या कार्यक्रमाची सर्व व्यवस्था आम्हाला करायची होती. आनंद झालाच; पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही झाली. आमच्या आयुष्यातील ते खरोखरच आनंदाचे क्षण होते! आणि मग काय एकच लगीनघाई उडाली. स्थळ ठरवणे, सिक्युरिटी व्यवस्था, लोकांची जायची-यायची व्यवस्था करणे, सांस्कृतिक कार्यक्रम ठरवणे, दुबईतील सरकारच्या वेगवेगळ्या permissions मिळवणे, एक ना दोन अनेक कामे होती! हा प्रश्न फक्त मोदींचे स्वागत करण्याचा नव्हता, तर जगातील इतर देशांत त्यांचे जे कार्यक्रम झाले त्यापेक्षा दुबईतील कार्यक्रम वेगळा व सुंदर करण्याचा होता. हा अविस्मरणीय असा Mega Event करायचा होता! इतर देशांना रूपरेषेसाठी, तयारीसाठी तीन-चार महिन्यांचा अवधी मिळाला होता. आम्हाला फक्त दहा दिवसांचा कालावधी होता!

या सोहळ्यासाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागत होता. पहिले सर्वात मोठे आव्हान होते ते कार्यक्रमाचे स्थळ ठरवणे! आम्हाला काहीच कल्पना नव्हती की किती लोकं या कार्यक्रमाला येतील! Venue एवढा छोटा पण नको होता की लोकांची बसण्याची गैरसोय होईल व इतका मोठा पण नको होता की रिकामा दिसेल! आमच्यापुढे अनेक पर्याय होते- Conventional Hall near Trade Centre, Jumeria Beach, Zabil Park, Dubai Cricket Stadium इत्यादी. वेळ अतिशय थोडा होता. त्यामुळे एका दिवसात सर्व ठिकाणे पाहण्याचा आम्ही निर्णय घेतला. त्याचवेळी समजले की BJPचे सेक्रेटरी श्री. राम माधवजी स्थळ नक्की करायला येणार आहेत. आम्ही सर्व व माननीय प्रमुखांबरोबर सकाळी साडेनऊ वाजता

Jumeria Beachला जमलो व तिथून स्थळाच्या पाहणीस सुरुवात झाली. राम माधवजींना मोदींच्या भेटीची पूर्ण कल्पना होती व काय काय करायला पाहिजे हे त्यांनी ठरवले होते. सर्व स्थळांची पाहणी करून अखेर दुपारी साडेबारा वाजता आम्ही क्रिकेट स्टेडियमवर पोहोचलो. फायदे-तोटे लक्षात घेऊन DUBAI CRICKET STADIUM हा Venue नक्की ठरला!

त्यानंतर आम्ही लोकांची जायची-यायची व्यवस्था, सांस्कृतिक कार्यक्रम व प्रोग्रॅमची इतर आखणी यात गुंतलो! प्रत्येकावर एकेका कामाची जबाबदारी सोपवली. Transportation हे एक मोठे task होते. आमच्या अंदाजाप्रमाणे ५०,००० पर्यंत लोकं हजर असतील असे होते. त्यामुळे एवढ्या लोकांची जायची-यायची व्यवस्था चोख असणे आवश्यक होते. RTAच्या परवानग्या मिळवल्या. Shuttlesची व्यवस्था केली.

सिक्युरिटीसाठी म्हणून कोण लोकं उपस्थित राहणार आहेत त्यांची माहिती असणे आवश्यक होते. म्हणून 'namoindubai.ae' अशी website developed केली. आणि तिथे लोकांना आपले नाव register करायची विनंती केली व त्यांनाच कार्यक्रमाला आत सोडण्यात आले. Site open केल्यापासून एका तासाच्या आत पाच-सहा हजार लोकांनी नावे नोंदवली व संध्याकाळपर्यंत ही संख्या २०,००० वर गेली. त्यामुळे आमची पण खात्री पटली की ५०,००० पर्यंत लोकं नक्की येणार.

यानंतरचे मोठे काम होते ते म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणे! मोदीजी येण्यापूर्वी दीड तासच कार्यक्रम करायचा होता. त्यासाठी कलाकारांची निवड करणे, event selection, रंगीत तालीम करणे व शेवटी १०० टक्क्यांहून event सुंदर होणे सोपे नव्हते कारण वेळ अतिशय कमी होता. काही कलाकार भारतातून बोलावले, काही स्थानिक होते व सर्वांनी मिळून दिवस-रात्र मेहनत घेऊन अखेर सुंदर सादरीकरण झाले.

हा सर्व कार्यक्रम पार पाडण्यासाठी ६०० स्वयंसेवकांची आवश्यकता होती. Consulate Generalने दुबईतील सर्व भारतीय organizationsना विनंती केली व एका दिवसात अनेक स्वयंसेवक हजर झाले. महाराष्ट्र मंडळ दुबई, Indian Association Sharjah यांनी खूप स्वयंसेवक पाठवले.

कार्यक्रमाची जय्यत तयारी झाली व सर्व आपल्या लाडक्या पंतप्रधानांचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाले. आही सकाळी साडेआठ वाजताच स्टेडियमवर पोहोचलो final touch देण्यासाठी! दुबईच्या वाळवंटातील भर उन्हाळ्याचे दिवस! ४२/४४ डिग्री तापमान होते. अंगाची काहिली होत होती. पण कशाचीही तमा न बाळगता ५०,००० हून अधिक लोकं प्रवेशद्वारावर रांगा लावून उभी होती. सर्वकडे 'भारत झिंदाबाद', 'मोदी अमर रहे'च्या घोषणा होत्या. भारताचा तिरंगी झेंडा फडकत होता. पूर्ण वातावरण मंगलमय, भारतमय झाले होते. प्रत्येकाला आपण भारतीय असल्याचा अभिमान वाटत होता. जात, धर्म, भाषा या सर्वांपलीकडे जाऊन एकच भावना होती भारतीयत्वाची!

प्रत्येक भारतीयासाठी हा खरोखर अभिमानाचा क्षण होता! ३५ वर्षांनंतर भारताचे पंतप्रधान दुबईत आले होते. अबुधाबीच्या माननीय शेख खलिफा बिन झाहिद अल नाहियान व कुटुंबीय यांनी मोदींचे मनःपूर्वक स्वागत केले होतेच!


सांस्कृतिक कार्यक्रमाने सुरुवात झाली. ५०,००० हून अधिक प्रेक्षक दुबईच्या भयंकर गरमीची पर्वा न करता त्याचा आनंद लुटत होते, तेव्हाच पंतप्रधानांचे आगमन झाले. भारतीयांच्या उत्साहाला उधाण आले. टाळ्यांच्या गजरात, घोषणांच्या नादात नरेंद्र मोदींचे स्वागत झाले.

आणि... आणि नंतर ओघवती वाणी, सुंदर भाषाशैलीत त्यांनी मंत्रमुग्ध करणारे भाषण केले. भारतात गुंतवणूक, भारत व अरब देशांचे संबंध, दहशतवाद, इंडियाचा south east asia च्या प्रगतीमधील सहभाग अशा अनेक विषयांना त्यांनी आपल्या भाषणात स्पर्श केला. MAKE IN INDIA व SMART CITIES या भारत सरकारच्या नवीन योजनांची माहिती दिली.

अखेर मी एवढेच म्हणू इच्छितो की, 'NAMO IN DUBAI' हा यूएईमधील सर्वात मोठा कार्यक्रम म्हणावा लागेल. ाा कार्यक्रमामुळे भारत व यूएईचे नाते घट्ट होण्यास नक्कीच मदत होईल.

आणि अशा या अविस्मरणीय सोहळ्यासाठी योगदान देण्याची संधी मला मिळाली याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो!

– समीर कुंटे
sam_kunte1007@yahoo.com





# मैफल
## स्वर अन् स्वादाची!

मेघना वर्तक





*आयुष्यभर गाण्याची सुरेख मैफल सजवणाऱ्या आशा भोसले आज आपल्या आणखी एका आवडीच्या गोष्टीत मग्न आहेत. 'आशाज्' या त्यांच्या रेस्टॉरंटच्या माध्यमातून आपल्या पाककलेला सर्वदूर पसरवण्याच्या! त्यासाठी शेफना खास प्रशिक्षण देताहेत, स्वतः पदार्थांची चोखंदळ निवड करताहेत, एखादा पदार्थ शिकून घेण्यासाठी जंग जंग पछाडणाऱ्या आणि या व्यवसायातील माणसे जपणाऱ्या यांच्या एका वेगळ्या पैलूची माहिती वाचकांना करून द्यायची आहे.*
*'लोकसत्ता' दैनिकाच्या चतुरंग पुरवणीच्या सौजन्याने मी घेतलेली त्यांची मुलाखतच वाचकांच्या भेटीसाठी आणली आहे.*
*'आशाज्' हे त्यांचे पहिले रेस्टॉरंट प्रथम दुबईत उघडले, याचा सर्व दुबईकरांना अतिशय अभिमान आहे. आज दुबईत लावलेली 'आशाज्'ची ही वेल सर्व जगभर पसरली आहे. 'आशाज्'चे मूळ दुबईत आहे. म्हणूनच 'ग्रंथाली'चा ई-दुबई दिवाळी विशेषांक' आशाताई यांच्या मुलाखती शिवाय पूर्ण होऊच शकत नाही. या व्यवसायात शिरू इच्छिणाऱ्यांना ही मुलाखत नक्कीच मार्गदर्शक आहे!*



'ॲडिंग अ लिटिल स्पाइस टू लाइफ' हे ब्रीद वाक्य असलेली 'आशाज्' ही जगातील भारतीय रेस्टॉरंटची एक चेन, आशा भोसले यांची! खरं तर त्यांच्या गाण्यांनी आपल्या आयुष्यात फार पूर्वीच अपूर्व गोडी निर्माण केलीय. पण आता 'आशाज्'मध्ये प्रत्यक्ष स्वादाचाही आविष्कार घडतो आहे. स्वर व स्वाद या अंतरात्म्याला साद घालणाऱ्या या दोन गोष्टी. त्यांची सुरुवातही 'स्व'ने होते, आशाताईंच्या 'स्व'ची छाप 'आशाज्'मधल्या प्रत्येक गोष्टीवर पडली आहे आणि म्हणूनच त्यांचं गाणं असो की खाणं वेगळाच आनंद देतं!

२००२ मध्ये दुबई येथे वाफी सिटीमध्ये त्यांचं पहिलं रेस्टॉरंट सुरू झालं. खास भारतीय जेवणाची लज्जतदार चव व जोडीला 'सांगीतिक' सजावट यामुळे लवकरच या रेस्टॉरंटचं नाव झालं आणि त्याच बरोबरीने कुवेत, कतार, बहारीन, अबुधाबी, इजिप्त, बर्मिंगहॅम येथे १० रेस्टॉरंट उघडली गेली. येत्या पाच वर्षांत मध्यपूर्व आशिया, ब्रिटन आणि उत्तर अमेरिका येथे १० रेस्टॉरंट उघडण्याचं त्यांचं स्वप्न आहे.

आज आशाताईंशी केवळ उद्योजिका म्हणून गप्पा मारायच्या होत्या. सुरुवात अर्थातच त्यांच्या भूतकाळातील बालपणातल्या खाण्याच्या आठवणीनेच झाली. ''खाण्याची आवड उद्योगात कशी बदलली माहीत नाही, पण आधी आयुष्यात गाणं आलं आणि मग खाणं करणं. चार वर्षांची असल्यापासून वडिलांनी गाणं शिकवलं. गाणं हेच आयुष्य होतं. बाबांबरोबर, नाटक कंपनीबरोबर गावोगावी फिरायचं, राहायला घर नव्हतं. त्यामुळे शिक्षणाची तशी हेळसांडच झाली. बाबा गेल्यानंतर आईसह आम्ही पाच भावंडं पहिल्यांदा पुण्याला व नंतर कोल्हापूरला आलो. तिथं गेल्यावर शाळेत गेलो तर गेलो नाही तर नाही. शाळा, शिक्षण यापेक्षा आम्ही गाणं शिकावं हाच आईचा प्रयत्न व इच्छा होती. ७०-८० वर्षांपूर्वीचा काळ होता. मुलीच्या शिक्षणाची तशी पद्धत नव्हतीच. पण आईनं स्वयंपाक मात्र शिकवला. मुलींच्या जातीला तो आलाच पाहिजे, यावर तिचा कटाक्ष होता.





कोल्हापूरला असतानाही माई तशी अस्वस्थच असायची. तिला सदैव चिंता होती, या मुलांचं काय होणार? गुजराती डोकं होतं तिचं! आई गुजराती होती, खानदेशची! तिचा सारखा दोन अधिक दोन किती, असा व्यवहारी विचार असायचा. कोण गाणार, कोण वर येणार, कोण वडिलांसारखं होणार? ती आम्हाला सतत वडिलांचा आवाज कसा वर चढायचा, ते किती मोठे होते, त्यांच्या गाण्यांना कसे वन्समोअर मिळायचे हे खुलवून खुलवून सांगायची. वडील दिसायला सुंदर, आईही सुंदर, गुजराती गोरी! पण एकदम मराठी, नऊवारी साडीतली! मग तिनं आम्हाला सांगायला सुरुवात केली की, तुम्ही दिसता किती सुंदर, हिरॉईन तुमच्यापुढे काहीच नाही. आम्हा मुलांच्या मनात आत्मविश्वास कसा निर्माण करायचा हे तिनं पाहिलं, हा असा आत्मविश्वास फक्त आईच देऊ शकते, निर्माण करू शकते. आम्हीही स्वतःला सुंदरच समजत गेलो. पण यामुळेच आमच्यात जबरदस्त आत्मविश्वास निर्माण झाला. जो आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर, जीवनाच्या प्रत्येक शर्यतीत उपयोगी पडला. त्या आत्मविश्वासाच्या जोरावर आज इथपर्यंत पोहोचलो!''

''आई कट्टर शाकाहारी व वडील गोव्याचे, मासे खाणारे! आमच्याकडे पूजापाठ व धार्मिक कार्याचं फार होतं. वडिलांची पुण्यतिथी असो किंवा इतर धार्मिक कार्यक्रम. त्यावेळी स्वयंपाक मी व मीनाताई करायचो. पुरणपोळी, खीर, सात भाज्या, पाच-सहा कोशिंबिरी, तीन-चार चटण्या, भात, कढी, उडदाचे वडे, बटाटे, मिरची, घोसाळे, दोडके, ओव्याच्या पानांची भजी असा स्वयंपाक करायचो. चूल पेटवायची, वरती फोडणी द्यायची, खालती निखाऱ्यावर दुसरा पदार्थ शिजायचा! पुरण वाटणं, ढवळणं ही कामं माझी. रात्री १२ला सुरुवात करायचो, सकाळी ११ वाजायचे सगळं संपायला. मग आम्ही झोपायचो. यावेळी माझं वय असेल १० वर्षांचं!'' भविष्यातील सुगरणीचा आणि नंतरच्या उद्योजिकेचा पाया इथे घातला असावा बहुधा!

आशाताईंचं पुढचं आयुष्य खूपच धावपळीचं होतं, लग्न, मुलं आणि गाण्याचं रेकॉर्डिंग यात दिवस जात होते. त्यानंतर त्या (१९६०) प्रभुकुंजमध्ये राहायला आल्या. थोरला मुलगा हेमंत बाहेर शिकायला होता. आणि इतर दोघांना आनंद व वर्षाला खाण्याचं जबरदस्त वेड.

आशाताई पुन्हा आठवणींत रमल्या, ''मी बाहेर जायला लागले की मुलं मला विचारायची, 'आई कोणाकडे चाललीस? राज कपूरकडे? मग आम्हाला बांधून आण हं! त्यांच्याकडे छान असतं जेवण! त्या आंटीकडे कबाब खूप छान असतात, कुणाकडची बिर्याणी अप्रतिम असते!' मुलांचं बोलणं ऐकून मला फार वाईट वाटायचं. आपल्याही हातचं जेवण यांना आवडायला हवं. मग माझ्या डोक्यानं घेतलं आपण व्हेज जेवण खूप केलं, आता नॉन-व्हेज शिकायचं! अक्षरशः श्वास घेतला आणि झपाटल्यासारखी एक एक पदार्थ शिकत गेले. मग याला विचार, त्याला विचार असं करत करत लखनौपर्यंत पोहोचले. भारतात लखनौचं जेवण प्रसिद्ध! तेथील लोक शोधून त्यांच्याकडून तेथील लखनवी कबाब, मटण, बिर्याणी, दही मासा हे पदार्थ शिकले.''

''चांदबाला नावाची मुलगी होती. छान गाणं गायची. तिनं मला पाया व बिर्याणी शिकवली. मजरूह सुलतानपुरींच्या घरचं जेवण साऱ्यांना आवडायचं. त्यांच्या बेगमना सांगितलं, 'मुझे खाना सिखना है आप जैसा'. त्यांनी खालाकडे मला सुपूर्द केलं. तिने अगदी चपाती लाटून मध्ये कापून गोल गोल फिरवायची व पराठा कसा लाटायचा तेही शिकवलं. त्यानंतर हळूहळू पंजाबी पदार्थ शिकले. कोलकात्याला जाऊन तेथील पदार्थ शिकले. मस्कतला गेले. तिथे पाकिस्तानी धाबा होता. अत्यंत चविष्ट जेवण. मुलं लागली मला चिडवायला. मग काय मी थेट त्यांच्या खानसाम्यापर्यंत पोहोचले. पाकिस्तानीच होता तो. त्याने मला मस्कत गोश्त शिकवलं. तो पाकिस्तानी माणूस जेव्हा मला कृती सांगता होता तेव्हा मी हातातील टिशू पेपरवर लिहीत गेले. शाई पसरत होती, मग हातावर लिहून घेतलं. पण जिद्द सोडली



नाही. मुंबईला जेव्हा परतले तेव्हा बाजारात जाऊन नवीन लोखंडी कढई आणली आणि मस्कत गोश्त बनवले.''

''मटण बिर्याणी व चिकन बिर्याणी तर सर्वांकडे असतेच, पण एकदा लेकीनं, वर्षानं फर्माईश केली ती फिश बिर्याणीची! मी स्वतःच मसाला तयार केला व फिश बिर्याणी बनवली. केशर बिर्याणीचीही तीच कथा! मटार पॅटीस, खिमा पॅटीस करतात तशीच माझी स्वतःची कृती म्हणजे फिश पॅटीस व झिंगा पॅटीस! माझी पुण्यातील मैत्रीण कुंदा ढवळे हिच्या मैत्रिणीकडून रोगनजोश शिकले.''

''एक अनुभव सांगते, रेसिपी सांगताना कोणीही त्यातील खुब्या सांगत नाही. 'ये डालो, वो डालो हो जाएगा!' असं मोघम असतं बऱ्याचदा. मी एकदा सरसोंका साग बनवला. त्याचा कडवटपणा जात नव्हता. एकदा एका रेस्टॉरंटमध्ये सरसों का साग खाल्ला तर कडवटपणा अजिबात नव्हता. मी थेट तिथल्या कुकलाच विचारलं, त्यानंही सहजपणे सांगितलं, ''सरसो एक घंटा पानी मे भिगा के रखना, कडवापन निकल जाता है!'' माझं सर्वांना सांगणं आहे की, विद्या हे दान असं आहे की ते दिल्याने वाढतं त्यामुळे रेसिपी सांगताना त्यातील टिप्ससह सांगा.''

''मला खिलवायला फार आवडतं. त्यामुळे मी तयारीही नीट करते. समजा उद्या चार माणसं घरी जेवायला येणार आहेत तर रात्री झोपतानाच कोणत्या पदार्थाबरोबर कोणता जाईल? हा मसाला टाकावा का? कोणता? माशाचं लोणचं



की कोलंबीचं, कोलंबीची मिरवणी की बोंबिलाची? कुणाला काय आवडेल याचा सर्व विचार करते. हळूहळू मी स्वतःच्या आशा रेसिपीज तयार केल्या. जसे गाणे, गाण्यापूर्वी वाचून त्याचा अर्थ समजून, त्या गाण्याची पार्श्वभूमी काय आहे हे समजून घेऊन, त्यातील बारकावे टिपून घेऊन जर मनापासून गाणं म्हटलं तर त्या गाण्याची मजा काही औरच असते. कारण त्यात आत्मा ओतून समरस होऊन ते गाणं गायलेलं असतं. तसंच स्वयंपाकाचंही आहे.

स्वयंपाक करताना त्यात सर्व लक्ष केंद्रित करून, मेहनत घेऊन करणं अतिशय महत्त्वाचं, उदा. मासा तळताना त्याचा मसाला गळता कामा नये. त्याचा तुकडा पडता कामा नये. तळून काढल्यानंतर तो टिशूवर ठेवून त्यातील तेल निवळून घेतलं पाहिजे. मंद आचेवर सर्व तळणं झालं पाहिजे. लोणी कढवताना वरती फेस आला, लालसर रंग

*''आणखी एक पदार्थ म्हणजे पसंदा! आज मूळ कृती कोणालाही माहीत नाही. जे करणारे होते, ते सर्व गेले. आज कुठेही पसंदा म्हणजे मटणाचे नुसते छोटे तुकडे देतात. पण पसंदा म्हणजे एक मोठा तुकडा. रात्रभर मसाला लावून ठेवतात आणि दुसऱ्या दिवशी शिजायला ठेवतात. तो गळून जातो अगदी. चमच्याने वाढून वर कांदा ठेवतात. तो मसाला, ते वाटण-घाटण सर्वांना जमत नाही. मला अनेकदा वाटतं, एखाद्या टी.व्ही.वरच्या रेसिपी शोमध्ये हा करून दाखवावा. जेणेकरून अनेक जण ही कृती बघतील, करून पाहतील व मूळ रेसिपी फुकट जाणार नाही.''*

येऊ लागला की चुलीवरून उतरवून ठेवायचं. चपाती केली तर तव्यावरून काढून हातावर फोडून ताटात वाढली पाहिजे. अशी चपाती माणूस किती खातो ते समजतही नाही. पूर्वी चुलीजवळ बसलेली आई, तिथूनच कोणाच्या पानात काय संपलं आहे हे लक्ष ठेवून वाढायची. स्वतः आधी जेवायची नाही. प्रेमानं केलेलं व वाढलेलं याला अतिशय महत्त्व आहे. मी जेव्हा स्वयंपाक करते तेव्हा सर्वांचं जेवण होईपर्यंत जेवत नाही. सर्वांचं पोट भरलेलं पाहून समाधान वाटतं.''

''एखादा पदार्थ करायला तुमच्याकडे सर्व मसालेच पाहिजेत असं नाही. प्रेमानं केलेला साधा वरणभातही चविष्ट लागतो.'' हे सांगताना आशाताईंची एक आठवण ताजी झाली. ''कोल्हापूरचे भालबा पेंढारकर आणि आम्ही सगळी भावंडं एकदा रायगड चढून गेलो. भालबा एकदम शिवाजीमय झाले होते. त्या वातावरणात असताना अचानक त्यांनी



मला सांगितलं, ''आशा! जे काही इथे आहे त्यात तू स्वयंपाक कर. बघू या तरी सुगरण काय करते ते!'' चूल पेटवली, काय होती ती भांडी घेतली. बटाटे होते ते कापले. तिखट-मीठ फक्त होतं ते घेतलं. रस्सा बनवला. दूध होतं त्यात तांदूळ घातले व खीर बनवली. भात बनवला. जेवायला बसल्यावर भालबा म्हणाले, ''आशा, तुझ्या हातात अन्नपूर्णा वसली आहे.'' तो आशीर्वादच होता.

भूतकाळातून गप्पा 'आशाज्'वर आल्या. त्या म्हणाल्या, 'आशाज्' हे रेस्टॉरंट सुरू करायची कल्पना आनंदची! तो म्हणाला, आई तू स्वतः एवढे पदार्थ केले आहेस तर तुझ्या रेसिपीजचे एक पुस्तक लिही. मी दोन-चार पदार्थ लिहिले, पण कंटाळा आला. कारण एक चमचा मसाला, अर्धा इंच आल्याचा तुकडा, दोन लसणीच्या पाकळ्या, असं मला मोजून-मापून जेवण करता येत नाही. प्रत्येक पदार्थ अंदाजानं टाकायचा ही माझी सवय. रियाज करूनच गाण्यात सहजता येते. मग आनंदनं आणखी एक पर्याय दिला, मी हॉटेल काढतो, तू तिथे येऊन शिकव... इथेच 'आशाज्'चा श्रीगणेशा झाला.''

''माझा आनंद सर्वच बाबतीत माझा बॅकबोन आहे. एक वेळ अशी होती की मुलं लहान, मी एकटी, पैसा सांभाळता न येणं, लोकांना देणं, त्यांनी फसवणं, अशा अनेक प्रसंगी तो खंबीरपणे माझ्या मागे उभा राहिला. पैशाचे व्यवहार त्यानं सांभाळले आणि मी सावरले. दुबईत त्याला काही लोकं भेटली, यानं शब्द टाकला. माझं नाव आलं, लोकांना काही तरी वेगळं वाटलं, कल्पना प्रत्यक्षात आली आणि 'आशाज्' साकारलं गेलं.''

मी मध्येच विचारलं, ''आशाताई, तुम्ही हाडाच्या कलाकार आहात, असं असताना कला व व्यवहार यांची सांगड कशी घातलीत?'' त्या म्हणाल्या, ''जीवनातील प्रत्येक गोष्टीत कला व व्यवहार दोन्ही असतात. रेस्टॉरंटच्या बाबतीतही तसंच. स्वयंपाक ही मोठी कला आहे. त्यामुळे स्वयंपाक कसा हवा व स्वयंपाकघर कसं असावं हे मी सांभाळते. रेस्टॉरंटचा आर्थिक व्यवहार, 'रेस्टॉ'ची संपूर्ण व्यवस्था, अंतर्गत सजावट, जागेची निवड, परदेशात असल्यामुळे स्टाफ भारतातून किंवा इतर देशांतून आणणं, त्यांचे व्हिसा, लेबर कॅम्पची व्यवस्था हे सर्व व्यवहार आनंद बघतो.''

''दुबईला जाऊन तेथील शेफना मी माझ्या रेसिपीज शिकवल्या. त्यात केशर बिर्याणी, फिश बिर्याणी, मस्कत गोश्त, सुलतानपुरी कबाब या प्रमुख होत्या. ज्यांच्या ज्यांच्याकडून मी सर्व गोष्टी शिकले, ते सर्व माझे स्वयंपाकातील गुरू आहेत. त्यांनी माझ्या या कलेत भर टाकली. त्यांची नावे मी त्या त्या रेसिपीजना दिली. जसे मस्कतला शिकले म्हणून मस्कत गोश्त. सुलतानपुरींच्या घरी शिकले म्हणून सुलतानी कबाब! आपल्या गुरूंची आठवण ठेवण्याचा अधिक चांगला मार्ग कोणता असू शकेल? हे सर्व पदार्थ 'आशाज्'मध्ये खूप लोकप्रिय झाले आहेत. बिर्याणी



करणारा मुलगा एका वर्षात घाबरून गेला. बिर्याणीच्या ऑर्डरच्या चिठ्ठ्या खट-खट-खट किचनमध्ये लावल्या जायच्या व ऑर्डर पुऱ्या करता करता त्याची बिचाऱ्याची दमछाक व्हायची.''

प्रत्येक उद्योगधंद्याचं हे एक तंत्र आहे ते सांभाळलं की झालं. प्रत्येक माणूस हा एक कलाकार आहे व प्रत्येकाला इगो असतो हे लक्षात ठेवायचं. 'आशाज्'मध्ये तंदुरी कबाब, तंदुरी चिकन हे पदार्थ करण्यासाठी सलीम कुरेशी नावाचा एक स्वयंपाकी आहे. मी तिथे गेल्यानंतर सर्वजण मला भेटायला बाहेर आले. पण हा आला नाही, हा आतच बसून राहिला. माझं आयुष्य अशा अहंकारी माणसांमध्येच गेलं होतं. त्यामुळे मला माहीत होतं की समोरचा माणूस जर अहं दाखवत असेल तर त्याच्याशी त्याच भाषेत बोलावं लागतं, पण समोरचा माणूस साधा असेल तर त्याच्याशी साधेपणानं वागायला हवं. माझ्या लक्षात आलं, त्याच्या मनात माझ्या नावाची भीतीही आहे. मी आत गेले. त्याला म्हटले, 'सलीमभाई नमस्ते, आप कैसे हो?' तो म्हणाला, 'सलाम आशाजी.' मी म्हटले, 'सलीमभाई ये जो सब है वो तो सब आपही का है। आपही ये सब सम्भालनेवाले है। मै तो सिंगर हूं, मै थोडीही खाना बनानेवाली हूं? बस मेरा खाली नाम है।' माझं बोलणं ऐकून तो खूश झाला व बाकीच्यांना म्हणाला, 'देखा, मैने बोला था ना की ये औरत कितनी अच्छी है, वो बराबर जानती है की मैं अच्छा खाना बना सकता हूँ।' मी त्याची स्तुती केली, तो खूश झाला. पुढे माझ्याशी त्याचं खूप छान जमलं. मी त्यालाही बऱ्याच गोष्टी शिकवल्या. तो स्वतःहून शिकला. मी जर 'आशा भोसले' म्हणून गेले असते तर त्यानं बघितलंही नसतं कदाचित. पण मी त्याला मान दिला. धंद्यात माणसे जोडण्याची व ती टिकवून ठेवण्याची अतिशय आवश्यकता असते.''

मी 'आशाज्'मध्ये आणखी एक काळजी घेतली आहे ती म्हणजे व्हेज, नॉन-व्हेज जेवणासाठी निरनिराळे फ्रायर आहेत. एका फ्रायरवर भाजी, डाळ व एका फ्रायरवर मटण, चिकन शिजतं. शाकाहारी जेवणाबद्दल मी अधिक जागरूक



आहे. सर्वसाधारणपणे किचनमध्ये एक मोठं पातेलं असतं, त्यात दहा-बारा चमचे असतात. व्हेज, नॉन-व्हेज दोन्ही बनत असतं. एकच चमचा दोन्ही पदार्थांसाठी वापरला जातो. 'आशाज्'मध्ये 'नॉन-व्हेज'चा चमचा 'व्हेज'मध्ये जाऊ नये यासाठी काळजी घेतली जाते.''

''सूपमध्ये चिकन स्टॉक घालतात, नानमध्ये अंडं घालतात. पण मी 'आशाज्'मध्ये सांगितले आहे की, जी लोकं आपला धर्म पाळत आहेत त्यांना ती पाळू दे. नाही





तर त्यांना आधीच सांगा, नानमध्ये अंडे आहे. त्यांना चपाती बनवून द्या किंवा अंड्याशिवाय नान बनवून द्या. पाहुण्यांचा विश्वास हा अतिशय महत्त्वाचा आहे व त्याला तडा जाता कामा नये. त्यांच्या भावना जपल्या गेल्या पाहिजेत. या विश्वासावर तर 'आशाज्'चा डोलारा उभा आहे.''

करिअर करून, संसार सांभाळून हे सगळं करता येईल का, या प्रश्नावर त्या म्हणाल्या, ''आजच्या स्त्रीला मी सांगेन की, नुसतेच करिअर व पैशाच्या मागे धावू नका. त्या व्यतिरिक्तसुद्धा तुम्ही कोणी तरी आहात, तुम्ही काही करू शकता हे लक्षात ठेवा. मी 'आशाज्'मध्येही तेच सांगते. तुम्ही जेवण बनवता ते काम उरकून टाकायचं म्हणून, नोकरी म्हणून करू नका तर आवडीनं, प्रेमानं करा. एखादा पदार्थ ढवळतो त्यातसुद्धा प्रेम हवे, आत्मीयता हवी. मग तो पदार्थ चांगला होणारच व 'आशाज्'च्या यशाचं हे एक रहस्य आहे!''

आशाताईंना मध्येच थांबवत मी विचारलं, ''तुम्हाला काय वाटतं रेस्टॉरंटचं यश कशात आहे? आशा भोसले या नावाचं वलय, स्किल की तेथील जेवण?'' त्या म्हणाल्या, ''प्रथम लोकं आली ती आशा भोसले या नावाच्या वलयामुळे, पण आता परत परत येत आहेत ती जेवणातील स्वादाच्या आशा पूर्ण झाल्यामुळे! जेव्हा एखादा नवीन पदार्थाचा आम्ही मेन्यूत समावेश करतो तेव्हा मी, आनंद, दोन युरोपीय, दोन आशियाशी शेफ अशी टीम उपस्थित असते. सर्वजण चव बघतात, काय हवं नको यावर मत सांगतात व अखेर नवीन पदार्थाचा निर्णय सांघिकरीत्या घेतला जातो. शेफची निवड



मुंबईत करतो, त्यांना तिथे ट्रेनिंग देतो, दोन व्हेज जेवणासाठी व दोन नॉन-व्हेज जेवणासाठी असे चार शेफ प्रत्येक रेस्टॉरंटमध्ये असतात. बाकी सर्व व्यवस्था आनंदबरोबर सप ऑर्टन ही युरोपीय स्त्री बघते. आनंद जेव्हा मुंबईत असतो तेव्हा रेस्टॉरंटची जबाबदारी ती घेते.

आशाताईंचा आणखी एक स्वभाव म्हणजे त्यांची सौंदर्याची आवड. 'आशाज्'च्या इंटिरियर डिझायनिंगमध्ये त्याचं प्रतिबिंब पडणार नाही असं शक्य नव्हतं. त्यांचं प्रत्येक रेस्टॉरंट देखणं आहे. पण त्याविषयीची एक भावुक आठवण त्यांच्याकडे होती. त्या म्हणाल्या, ''मुलं लहान असताना मी मण्यांचे पडदे घरात लावले होते. छान दिसायचे ते. ते इतक्या वर्षानंतर लक्षात ठेवून आनंदने सर्व 'आशाज्'मध्ये लावलेत.'' सांगतानासुद्धा आशाताईंना गहिवरून आलं होतं.



विषय बदलावा म्हणून म्हटलं, ''आशाताई गेली ४० वर्षे आम्ही दुबईत राहात आहोत, भारत जरी आमची जन्मभूमी असली तरी आता दुबई कर्मभूमी झाली आहे. त्यामुळे साहजिकच 'आशाज्' जेव्हा दुबईत सुरू झालं तेव्हा आपल्या आवडत्या गायिकेचं रेस्टॉरंट दुबईत उघडलं म्हणून सर्वांना अभिमान वाटला. पण तरीही मनात प्रश्न राहिलाच की भारतात किंवा मुंबईत पहिलं रेस्टॉरंट का उघडलं नाही?

आशाताई म्हणाल्या, ''खरं तर परदेशात कोणताही व्यवसाय सुरू करताना अनेक अडचणी येतात. तेथील सामाजिक वातावरण, चालीरीती समजून घेत, शून्यातून व्यवसाय उभा करणं खरंच सोपं नसतं. तेथील कायदेकानू वेगळे असतात, अनेक अडचणींना तोंड द्यावं लागतं. पण खरंच सांगते, दुबईत आमचे सर्व व्यवहार अतिशय सुलभतेनं पार पडले. अगदी जागा मिळवण्यापासून ते प्रत्यक्ष 'रेस्टो'

सुरू होईपर्यंत प्रत्येक पायरी सहजगत्या चढत गेलो आणि दुबईमध्ये 'आशाज्'चं नाव झळकलं. जी गोष्ट दुबईत तीच कुवेत, कतार, बहारीन, अबुधाबी, बर्मिंगहॅम येथेही. अतिशय सुलभपणे रेस्टॉरंट्स उघडली गेली. पण याउलट मुंबईत अनुभव आला. मुंबईतही आम्ही रेस्टॉरंट उघडण्यासाठी खूप प्रयत्न केला. अनेक अडचणींशी सामना केला. कधी पाण्याची कटकट तर कधी जागेची, कधी मद्य परवाना, तर कधी नवनवीन बदलणारे नियम. जोडीला सामाजिक, राजकीय अस्थिर वातावरण. या सर्वांना तोंड देत आजही आम्ही प्रयत्न करीत आहोत, बघूया कधी सुरू होणार ते!''

''आनंदने जेव्हा रेस्टॉरंटची कल्पना माझ्यासमोर मांडली तेव्हा मी त्याला सांगितलं होतं, हा तलाव आहे त्यात उडी मार. एक तर काठापर्यंत पोहोचशील किंवा मध्येच बुडशील! पण पाण्यात उडी मारल्याशिवाय तुला कळणार नाही. थोडासा वेडेपणा जर माणसात असेल व पूर्णत्वाला नेण्याची जिद्द असेल तरच तो काही तरी करू शकतो. जी माणसं नुसती हिशेब करत बसतात ती काहीच करू शकत नाहीत. मी जेव्हा गाण्याच्या व्यवसायात पडले तेव्हा खूप खाचखळगे होते. तऱ्हेतऱ्हेच्या अडचणींना तोंड दिले, पाठीशी खंबीरपणे कोणीही उभं नव्हतं. आनंदला आज सांगितलं आहे, तू करशील त्याला माझा पाठिंबा आहे. मी सदैव तुझ्यासोबत आहे.''

मी ऐकत होते, मनात विचार आला सूरसम्राज्ञी आता आदर्श मातेच्या भूमिकेतून बोलत आहे. त्यांचे हे विविध पैलू जाणून घेतच मी त्यांना विचारले, आशाताई आज गायनाच्या क्षेत्रातील तुमच्या कार्यामुळे तुम्हाला अनेक सर्वोच्च पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आता हॉटेलच्या क्षेत्रातील पुरस्कार 'आशाज्'ला मिळत आहेत. Birmingham UK येथील अतिशय मानाच्या Michelin Guide मध्ये २००९ पासून दरवर्षी 'आशाज्'चा समावेश होत आहे. तसेच त्यांना 'टाईम आऊट दुबई रेस्टॉरंट' पुरस्कार दरवर्षी मिळत आहे. 'आशाज्'ला जेव्हा पुरस्कार जाहीर होतात तेव्हा तुम्हाला काय वाटते? त्या म्हणाल्या, '''माझ्या दृष्टीने सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे, जेवणानंतर पाहुण्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे तृप्त व समाधानी हास्य!''

आपल्या कलेद्वारे दुसऱ्यांना आनंद देण्यात इतिकर्तव्यता मानणाऱ्या आशाताईंना मी विचारले, तुम्ही कोणत्या सामाजिक संस्थांशी संलग्न आहात का? त्या म्हणाल्या, ''आपण दान देणं जेवढं चांगलं तेवढंच ते दान सत्पात्री जातंय ना हे बघणं आपली जबाबदारी आहे हे लक्षात ठेवून मी आता 'आशा भोसले ट्रस्ट' सुरू करतेय. या ट्रस्टद्वारे गरीब मुलांना शिक्षण व जेवण दिलं जाईल.


''या मंगळवारीच माझा ८२वा वाढदिवस झाला. या साऱ्या प्रवासातील चांगल्या-वाईट घटनांनी, संकटांनी मला खूप काही शिकवलंय. जीवनाकडे मी सकारात्मक दृष्टीनं बघते व आत्मविश्वासानं जगते. माझा देवावर विश्वास आहे. रोज रात्री झोपताना मी देवाला सांगते, माझी शक्ती, माझा आत्मविश्वास सदैव जागृत ठेव. कोणत्याही दुःखाला सामोरे जाण्याची ताकद दे. उद्या सकाळी उठेन तो माझ्या आयुष्याचा पहिला दिवस असेल. माझा विश्वास आहे, त्याने जे ललाटी लिहिलं आहे ते होणारच आहे. ते थांबवण्याची ताकद कोणातच नाही. याचाच अर्थ आपल्या हाती काही नाही... आणि म्हणूनच गेल्या दिवसाचा अफसोस नाही, येणाऱ्या दिवसाची चिंता नाही. फक्त आजचा दिवस आपला आहे. श्रीकृष्ण म्हणतात, प्रत्येक दिवस माझ्यावर सोड. 'क्या लेके आया था, क्या लेके जाएगा' या गोष्टी लक्षात ठेवते.''

''आशाताई तुम्हाला काय म्हणवून घ्यायला आवडेल, आशाताई एक गायिका की आशाताई एक उद्योजिका?'' मी मध्येच थांबवत विचारलं तर म्हणाल्या, ''एक उत्तम माणूस, एक चांगली स्त्री म्हणवून घ्यायला आवडेल!''

आशाताईंच्या उत्तराचा विचार करत, मुलाखत आटोपून संध्याकाळी सात वाजता मी त्यांच्या घरून निघाले. मला लिफ्टपर्यंत सोडायला आलेल्या आशाताई निरोप घेताना म्हणाल्या, ''मी तुम्हाला चारची वेळ दिली होती, पण मी ट्रॅफिकमध्ये अडकल्यानं वेळेत येऊ शकले नाही, तुम्हाला त्रास झाला, मला माफ करा. तरी मी सकाळी साडेनऊला घराबाहेर पडले होते. जेवणही व्हायचं आहे माझं.''

मी अवाक् होऊन आशाताईंकडे पाहातच राहिले! दुसऱ्यांच्या वेळेची कदर करणारे, उशीर झाला म्हणून माफी मागून न जेवता मुलाखत देणारं एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व! त्यांच्यातल्या 'चांगलं माणूस' असण्याचं आणखी वेगळं प्रत्यंतर काय असणार?

**- मेघना वर्तक**
meghana.sahitya@gmail.com







*तीस–पस्तीस वर्षांपूर्वी ज्याचे बालपण दुबईत गेले, पायाखाली तप्त वाळू, डोक्यावर माध्यान्हीचा सूर्य आणि अंगाची काहिली करणारा उन्हाळा यांची पर्वा न करता शाळेच्या खुल्या मैदानात, मधल्या सुट्टीत soccer खेळणारा, दुबईच्या प्रगतशील बदलांचा साक्षीदार असलेला हा तरुण–*

# Desert Alphonso

**अमेय वर्तक**

तीस–पस्तीस वर्षांपूर्वी ज्याचे बालपण दुबईत गेले, पायाखाली तप्त वाळू, डोक्यावर मध्यान्हीचा सूर्य आणि अंगाची काहिली करणारा उन्हाळा यांची पर्वा न करता शाळेच्या खुल्या मैदानात, मधल्या सुट्टीत soccer खेळणारा, दुबईच्या प्रगतशील बदलांचा साक्षीदार असलेला हा तरुण–

काही वर्षांनंतर कोकणातील रत्नागिरीच्या डोंगर उतारावर, तळपता सूर्य, खारी चिकट हवा, जमिनीखालचे निवासी विंचू, कोळी, सर्प यांची पर्वा न करता 'आमराई' ह्या त्याच्या organic mangoesच्या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवतो!

शून्यातून वर येणाऱ्या, अनेक संकटांना तोंड देत प्रगती करणाऱ्या, दुबई आणि आमराई यांच्यातील साम्याचे मार्मिक विश्लेषण करीत आहे, खेळ आणि आमराई यांच्या वेडाने झपाटलेला तरुण, आमराईचा निर्माता अमेय वर्तक!



**असं वाटतंय की हे अगदी काल-परवाच घडलंय!** दुबईच्या रखरखीत वाळवंटात, डोक्यावर तळपता सूर्य आणि पायाखाली तापलेल्या वाळूच्या खुल्या मैदानात आम्ही soccer खेळायचो. मध्यान्हीचा सूर्य, आंतर्बाह्य घामाने डबडबून टाकणारी हवेतील आर्द्रता, रखरखीत वाळू- खरोखरच असह्य, सहन-शीलतेच्या पलीकडे होते सर्व! पण आम्हाला त्याचे काहीच वाटायचे नाही. कारण आमचे संपूर्ण लक्ष केंद्रित झाले असायचे ते बॉलवर व खेळावर! आम्हाला कशाची पर्वाच नसायची. दिवसाच्या दुसऱ्या प्रहरी ज्यावेळी कडक ऊन असते त्यावेळी म्हणजे दुपारी दोन वाजता असायची आमची मधली सुट्टी... डबा खाण्यासाठी! पण आईने दिलेला डबा खिशात भरून आम्ही सर्व जायचो मैदानात खेळायला, उन्हातान्हाची पर्वा न करता! वर्षानुवर्षे त्याकाळातील दुबईच्या सर्वच शाळांमधून हेच चित्र असायचे!





अशी होती आमच्या बालपणातील तीस वर्षांपूर्वीची दुबई- छोटीशी, साधी सरळ, खरोखर आनंदाचे दिवस होते! सभोवताली सर्वकडे, दूरवर पसरलेली वाळू, मोठमोठी रिकामी मैदाने, जमिनी, कुठेही इकडे-तिकडे भटकण्याचे स्वातंत्र्य, कसलीही भीती नव्हती, दोन-तीन मॉल्स, शहराची लोकसंख्या कमी, मेट्रो नव्हती, बसेस नव्हत्या, खाण्यापिण्याची ठिकाणे, उपाहारगृहे मोजकीच होती. ट्रॅफिक जाम तर कधीच असायचा नाही, हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच गगनचुंबी इमारती होत्या, बहुतांशी लोक छोट्या छोट्या इमारतींमधून राहत होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकांपाशी वेळ होता, एकमेकांना भेटायला, हास्यविनोद करायला, एकत्र खायला-प्यायला, सुख-दुःख वाटायला!

शाळेच्या मैदानात सॉकर खेळणाऱ्या दुबईचे तीस-पस्तीस वर्षांपूर्वीचे हे चित्र आहे! आता दुबईत इतका आंतर्बाह्य आमूलाग्र बदल घडला आहे की तिला ओळखणे आता कठीण आहे. एका संथ, शांत, सरळ, साध्या छोट्याशा शहराचे रूपांतर आता २०,००००० वस्ती असलेल्या, एका प्रगतशील, उत्साहाने सळसळणाऱ्या मोठ्या शहरात झाले आहे. एखाद्या माणसाने २० वर्षांनंतर आता पुन्हा दुबईत पाऊल टाकले तर त्याला वाटेल की आपण चुकून दुसऱ्या शहरात आलो नाही ना? हा बदल केवळ roads, landmarks, areas एवढ्या पुरता मर्यादित नाही, तर दुबईचा संपूर्ण 'पोतच' बदलला आहे. तेथील लोकं, तेथील संस्कृती, तेथील जीवनमान, तेथील संपन्नता, तेथील विचारसरणी, दुबईने जणू नवीन 'कातच' टाकली आहे!

सर्व काही बदलले; पण एक गोष्ट मात्र तशीच आहे- ती म्हणजे दुबईची वाळू! दुबईचा आत्मा असलेली, खोल खोल पसरलेली, येणारी परिस्थिती स्वीकारणारी, ऊन-वाऱ्याशी झुंज देणारी, कोणत्याही स्थितीशी जुळवून घेणारी आणि अनेक संकटांना तोंड देत त्यातून मार्ग काढत परिस्थितीवर मात करणारी अशी ही आत्म्याशी प्रामाणिक राहणारी दुबईची वाळू! बदलत्या जगाचा तिने स्वतःवर परिणाम होऊ दिला नाही, एकनिष्ठ राहिली.

निर्जन वाळवंटात, रणरणत्या उन्हात, उंट साथीला घेऊन भटकणारे बद्दू, खाडीमध्ये मच्छीमारी करणारे मच्छीमार, सागराच्या तळाशी जाऊन मोती शोधणाऱ्या पाणबुड्या, जपानी तंत्रज्ञानामुळे या व्यवसायाला लागलेले ग्रहण, तेलाचा शोध, ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून सुटका, दूरदृष्टीने सर्वांबरोबर सलोख्याचे संबंध, सर्व क्षेत्रात पसरलेली दुबईची आर्थिक धोरणे, आलेली सुबत्ता, असा प्रवास करत दुबईत बदल झाला, ती तरून गेली आणि प्रगत झाली आणि आज जगाच्या नकाशावर तिचे नाव झळकले.

**असं वाटतंय की हे ही अगदी काल-परवाच घडलंय!** रणरणत्या उन्हात, डोंगरांच्या रांगांच्या उतारावर मी पहिले पाऊल टाकले. झाडावरून उतरवण्यासाठी तयार असलेल्या, पिकलेल्या आंब्यांचा मनाला धुंद करणारा सुवास आसमंतात



भरून राहिला होता. कोकणपट्टीतील लाल माती, सह्याद्रीच्या घाटावरचे जांभळे-काळे डोंगर, रत्नागिरीच्या तळपत्या उन्हामुळे, त्यातील उबेमुळे गरम झालेले, अरबी सागरातून वाहणाऱ्या खाऱ्या वाऱ्यामुळे थंड झालेले, अवीट गोडी असलेले असे 'आमराई'चे उत्तम दर्जाचे 'organic हापूस आंबे'!

खरं म्हटलं तर डोक्यावर तळपणारा सूर्य, अंगाची काहिली करत असतो, आर्द्रतेने भरलेली खारी हवा शरीरावर एक कायमचा घामाचा चिकट थर तयार करत असते, जमिनीच्या तळात कोकणातले मूळचे सर्व रहिवासी- कोळी, विंचू, साप सर्व राहत असतात, हळूच डोके वर काढत असतात, मधेच कुठे दंश करत असतात. वातावरण खरोखर मन उद्विग्न करणारे असते.

पण तरीही तुमच्यावर या सर्वांचा काहीच परिणाम होत नाही. कारण या फळाच्या सुमधुर सुवासाने तुमचे मन संमोहित झालेले असते. हापूस आंबा- धुंद करणारा सुगंध- अर्धवट पिकलेले, कच्चे-पक्के असे हिरवट, पिवळसर, शेंदरी रंगाचे सुंदर आकारातील हे फळ आणि अर्थातच त्याचा पहिला घास घेऊन चव बघण्याची स्वर्गीय कल्पना यातच तुम्ही स्वतःला हरवून बसता. रसाळ, सुमधुर आणि सुवासिक असलेल्या या फळाची चव अवीट असते, त्याचा रंग धुतला जात नाही आणि सुवास आपली साथ सोडत नाही.

असे हे आंब्याचे फळ म्हणजेच 'आमराईचा organic हापूस आंबा'! जवळ जवळ एक तपापूर्वी मी त्याच्या बंधनात अडकलो! हा आमराईचा संपूर्ण जो प्रवास आहे- सेंद्रिय खते वापरून आंब्याच्या झाडांची लागवड करणे, त्या झाडाला अन्नपाणी देऊन वाढवणे, त्याला मोहर येणे, फळे झाडावरून योग्यवेळी खाली उतरवणे, त्यांना नैसर्गिकरीत्या पिकवणे आणि अर्थातच नंतर त्यांचा स्वाद घेणे- असा हा प्रवास अतिशय प्रेमाने, भक्तीने आणि तन-मन-धन अर्पून केला जातो.

खरं म्हटलं तर या प्रवासाची सुरुवात एक प्रयोग म्हणून, हौस म्हणून झाली. पण बघता बघता त्याचे रूपांतर अभिमानास्पद अशा 'आमराई' या ब्रँडमध्ये कधी झाले हे समजलेच नाही. या प्रवासात नक्कीच चढ-उतार आले-गेले. अनेक प्रयोग करावे लागले. विविध अडथळ्यांना तोंड द्यावे लागले, तऱ्हेतऱ्हेची आव्हाने, संकटे चोहोबाजूंनी आली- जशी- अवेळी येणाऱ्या थंडीपावसामुळे प्राथमिक अवस्थेत होणारी पिकाची हानी, त्यामुळे कमी होणारी आंब्याच्या फळातील गुणवत्ता, मुंबई-गोवा हायवेवरील रस्त्याची कामे किंवा traffic jam यामुळे लागणारा वेळ, मुंबईच्या विमानतळावर असलेल्या अपूर्ण सोयी, दुबईतीलsandstorm मुळे विमाने दुसऱ्या शहरात पाठवली गेली, कामाला माणसे मिळण्याचा प्रश्न तर इतर कोणत्याही व्यवसायाप्रमाणे इथेही भेडसावत असतोच- आंबा हे नाशवंत नाजूक फळ असल्यामुळे सर्व छोट्या-मोठ्या परिस्थितीचा परिणाम फळावर लागलीच होतो. पण तरीही हा प्रवास चालूच राहिला...!

याचे कारण एकतर मूलभूत विचार पक्के व पाया भक्कम होता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे देवाची कृपा आणि कठीण प्रसंगी माझ्या आई-वडिलांचा असलेला संपूर्ण भरभक्कम पाठिंबा! आमराईच्या फळाची गुणवत्ता दुर्मिळ आहे. त्याच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते- 'झाले बहु, होतील बहु, परंतु यासम हा'! कितीही अडथळे आले- वाईट मौसम, कमी पीक, माणसांचे प्रश्न असले तरी आमराईचेच आंबे व ते सांगितलेल्या वेळी ऑर्डरप्रमाणे पोचविण्यामध्ये कधीही कुचराई केली जात नाही. उत्तम प्रतीच्या आंब्याच्या झाडाने एखाद्या मोसमात आंबे दिले नाहीत तरी पुढच्या मोसमात ते अधिक गोड व अधिक चवदार फळ देते.



पूर्वीच्या काळी कोकणात असे म्हणत की, जो माणूस आंब्याचे रोप लावतो त्याला स्वतःला ती फळे खायला मिळत नाहीत तर तो त्याच्या नातवंडांना सुमधुर फळे खायला देऊ शकतो.

मला वाटते दुबई हे एक आंब्याचे झाड आहे. त्याची लागवड राज्यकर्त्यांनी अतिशय दूरदृष्टीने, धैर्याने, विचारपूर्वक, मेहनत घेऊन अनेक वर्षांपूर्वी करून ठेवली आहे. आता ते झाड मोठे होऊन त्याला सुमधुर फळे धरली आहेत. त्याची फळे आता आपण चाखत आहोत.

जोपर्यंत या झाडाची मूलभूत काळजी घेतली जात आहे तोपर्यंत अधिकाधिक सुमधुर फळे वर्षानुवर्षे हे झाड देईल आणि म्हणूनच या झाडाची योग्य ती काळजी घेण्याची जबाबदारी केवळ राज्यकर्त्यांची नव्हे तर सर्व दुबईकर-वासियांची आहे.


बाल्यावस्थेत असलेल्या आमराईचीसुद्धा अशीच योग्य काळजी घेतली जात आहे. organic आमराईचे मूलभूत गुणधर्म हे आहेत की भोवतालच्या परिसराशी आणि हवामानाशी तिचे जवळचे नाते आहे. सर्व जीव आपल्या eco systemचा भाग आहेत. कोणताही जीव हा स्वतंत्र नाही. प्रत्येक जीव हा दुसऱ्या जीवावर अवलंबून आहे आणि त्याचा समतोल राखणे आवश्यक असते. सेंद्रिय (organic) शेती ही अतिशय साधी आहे; परंतु अमलात आणायला कठीण आहे. कारण त्यासाठी सहनशीलता, चिकाटी हवी व निसर्गाला आवश्यक तो वेळ द्यायची तयारी हवी. पीक जास्त येण्यासाठी किंवा झाडांवरच्या रोगांना मारण्यासाठी, कोणतीही केमिकल्स न वापरता किंवा कृत्रिम उपाय न करता त्याऐवजी आम्ही झाडे सशक्त व निरोगी ठेवण्यासाठी नैसर्गिक उपायांचीच योजना करतो. आंब्याच्या झाडांवर जी कीड हल्ला करते त्यासाठी आम्ही लाल मुंग्या व पक्षी शेतात वाढू देतो कारण हे नैसर्गिक उपाय आहेत. हे उपाय छोट्या काळासाठी नाहीत तर हा कायमचा उपाय आहे, परंतु अमलात येण्यासाठी वेळ लागतो.

आज आमराईचे आंबे हे अनेक premium retail chains, organic outlets, भारतातील आणि जगातील corporate houses तसेच दुबईत जातात. दुबईमध्ये उद्योगधंद्यासाठी नेहमीच खुले, पूरक व लवचिक असे वातावरण तयार केले आहे त्यामुळे दुबईत विविध संस्कृती आणि निरनिराळ्या क्षेत्रातील उद्योगधंदे यशस्वी झाले आहेत. विविध प्रकारचे जाचक कायदेकानून व धोरणे लादून उद्योगधंद्याची प्रक्रिया क्लिष्ट करण्याऐवजी दुबई सरकारचे धोरण हे उद्योगधंद्याच्या दृष्टीने नेहमीच योग्य आणि खुले राहिले आहे आणि त्यामुळेच दुबईत उद्योगांची भरभराट झाली आणि सर्वकडे समाधान पसरले.

हापूस आंब्याचे हे एक वैशिष्ट्य आहे की एकाच झाडाचे काही आंबे जरी सडके निघाले तरी इतर सर्व आंबे अवीट गोडी देणारे, अतुलनीय असतात...

ज्याप्रमाणे आकाशात अनेक तारे चमकत असतात त्यातील काही निस्तेज हातोत, काही खाली पडतात; पण जे परिस्थितीशी झुंज देऊन प्रकाशित होतात ते एवढे चमचम करतात की ते सूर्य बनतात. दुबईमध्ये अनेक चढ-उतार आले-गेले, अनेक वेळा यश-अपयशाने दुबईला ग्रासले. निसर्गाचा हा तर नियमच आहे! ज्यावेळी एखादी गोष्ट प्रकाशमान होते तेव्हा ती अविस्मरणीय, दर्शनीय आणि अतुलनीय ठरते!

**- अमेय वर्तक**
ameya@aamrai.com







# Moving On

चिरंतन जोशी

खरं सांगायचं तर मी योगायोगाने उद्योजक झालो. मी ऑफिस फर्निचर कंपनीमध्ये १९९८ ते २००३ असा पाच वर्षांचा कालखंड पुरा केला होता. परंतु पाच वर्षांनंतरही पदोन्नती होण्याची चिन्हे दिसत नव्हती, उत्पन्नात अथवा ज्ञानातही भर पडत नव्हती. या सगळ्याला कंटाळून मी अचानक एक दिवस client ऑफिसमधून माझ्या पत्नीला फोन केला व सांगितले की, मला राजीनामा द्यावासा वाटतो आहे. पलीकडून प्रश्नात्मक होकार आला. तू राजीनामा दे; पण पुढे काय करायचं ठरवलं आहे? तिच्या या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे नव्हते. मी पुढे काय करणार आहे हे त्या क्षणी मला खरोखरच माहीत नव्हते. मात्र गेली पाच वर्षे मी जी नोकरी करत आहे ती सोडायची वेळ आता आली आहे हे मात्र मला जाणवत होते.

पत्नीशी बोलल्यावर मी तडक माझ्या ऑफिसमध्ये गेलो आणि बॉसकडे माझा राजीनामा सुपूर्द केला. यापूर्वी कधी मी राजीनामा देण्याचा विचारही केला नसल्याने त्याचा या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. त्यानंतर घरी गेल्यावर पत्नीला मी राजीनामा दिल्याचे सांगितले. तिने मला परत





*दुबईत येणाऱ्या नवीन तरुण पिढीने प्रस्थापित व्यवसाय सोडून नवीन दिशा शोधल्या आणि नवीन पाऊलवाटेवरून नवीन क्षेत्रं काबीज केली, त्यावर आपले नाव कोरले. त्यातील एक नवीन क्षेत्र म्हणजेच...*

तोच प्रश्न विचारला, पुढे काय? तिने हा प्रश्न विचारणे स्वाभाविकच होते, कारण त्यावेळी ती प्रेग्नंट होती. कुटुंबात भर पडणार हे दिसत असतानाच मी नोकरी सोडली होती. आमच्या भविष्याबद्दल ती काळजीत पडली होती.

प्रथम मी तिला सांगितले की आपण भारतात परत जाऊ. मी आपला family business जॉईन करीन. तिला हे ऐकून साहजिकच आनंद झाला. कारण तिची प्रथमपासूनच भारतात परत जाण्याची इच्छा होती. मी आपला शब्द पाळला नाही ही अर्थातच वेगळी गोष्ट! सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन भारताऐवजी दुबईतच बिझनेस करायचा निर्णय घेतला आणि मग मात्र आमच्यातील ग्रहकलहास सुरुवात झाली. शेवटी जर दोन वर्षांत मी माझ्या नोकरीएवढे मासिक उत्पन्न कमवू लागलो नाही तर परत नोकरी धरायची किंवा गाशा गुंडाळून भारतात परत जायचे, या अटीवर ती मला बिझनेस करून द्यायला तयार झाली आणि देवाच्या कृपेने अजूनही आम्ही दुबईतच आहोत.


अडीअडचणीला बँकेत १०,००० darham ठेवून व सर्वच्या सर्व gratuity fund वापरूनही माझ्याकडे बिझनेससाठी फारसे भांडवल नव्हते. त्यामुळे सुरुवातीला मी कमी उद्योगात चालू करता येण्याजोग्या उद्योगाच्या शोधात होतो.

आणि अशातच मला माझ्या नोकरीतला सहकारी योगायोगाने भेटला. त्याला त्याच सुमारास कंपनीने नोकरीतून काढून टाकल्यावर त्याने स्वतःची moving company सुरू केली होती. त्याला भेटलो तेव्हा मला moving company बद्दल काडीमात्र कल्पना नव्हती. त्याने मला moving business म्हणजे काय हे सर्व समजावून सांगितले. मला त्याची कल्पना आवडली आणि आपल्याला हा बिझनेस जमेल असे वाटल्याने, आपण हा बिझनेस एकत्र करू शकतो का असे मी त्याला विचारले. त्यालाही मी हे काम करू शकेन असा विश्वास वाटल्याने, त्याच्या इनमीन तीन माणसांच्या कंपनीत भागीदारी देऊ केली. माझ्याकडेच भांडवल त्यासाठी पुरेसे असल्याने मी त्याचा प्रस्ताव स्वीकारला आणि अशा तऱ्हेने 'E movers' आकारास आली.

आमचे दोघांचेही कसब वेगवेगळे होते. मी sales व business development मध्ये वाकबगार होतो, तर operations मध्ये त्याचा हातखंडा होता. आम्ही आमच्या बिझनेस मार्केटमधील gap शोधून काढून त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित केले. आमच्या मेहनतीला फळ आले व अनेक मान्यवर clients आमच्या client list मध्ये आले. आमची client list वाढू लागली. चार वर्षांपेक्षा कमी कालावधीत १००हून अधिक माणसे आमच्याकडे काम करू लागली आणि आम्ही आमचा पसारा वाढवतच राहिलो. आम्ही moving बरोबर इतर काही सेवाही पुरवू लागलो व आज दहा वर्षांनंतर ४००हून अधिक माणसे आमच्या 'E movers' कुटुंबाची सदस्य आहेत.

उत्पन्नाची साधने एकाहून अधिक असली पाहिजेत या मताचा मी आधीपासूनच होतो. त्यामुळे आमच्या E moversला पूरक असे इतर उद्योग आम्ही सुरू केले. आजच्या घडीला आम्ही 'E movers, leather doctor' आणि 'green star shipping' अशा तीन companies चालवतो ज्यात यूएई व कतार मिळून ४५० माणसे काम करतात.

'E movers' ही कंपनी गेली १२ वर्षे कार्यरत आहे. यूएईमधील ही सर्वात मोठीmoving company आहे. आम्ही घरे व ऑफिसेस relocate करतो. Domestic व International Relocations हाताळतो. Short Term व Long Term असे Storage ptions देतो. Office Furniture Installation services पुरवतो. E Movers ही ISO



Certified कंपनी आहे. तसेच E Movers कडे FAIM Accrediation (Highest Certificate Standard) आहे. आमची एक शाखा कतारमध्ये आहे व इतरत्र संधीच्या आम्ही शोधात आहोत. आमच्याकडे ४००हून अधिक माणसे आहेत आणि ७०हून अधिक वाहनांचा ताफा आहे.

TLD (The Leathre Doctor) हा Australian brand आहे व त्याची Middle East ची Master Franchisee आमच्याकडे आहे. आम्ही furniture, गाड्या, yachts आणि विमाने ह्यांचे लेदर स्वच्छ करतो, दुरुस्त करतो व recolour करतो. लेदर ही एक प्रकारची त्वचा आहे व डॉक्टर ज्याप्रमाणे त्वचेवरील जखम, ओरखडे यांना मलमपट्टी करतो त्याप्रमाणे आम्ही लेदरवरील ओरखडे, भोकं यांना मलमपट्टी करून पूर्ववत बनवतो व म्हणूनच आम्ही स्वतःला डॉक्टर म्हणवतो. TLD ही गेली चार वर्षे दुबईत कार्यरत आहे आणि लवकरच GCC मध्ये franchisee च्या माध्यमातून विस्तार करायचा आमचा प्रयत्न आहे.

GSPS - Green Star Shipping ही Frieght Forwarding आणि Logistics Solutions Provider आहे. Art Moving करण्यावर या कंपनीचा भर असेल. मात्र GSPS घरगुती सामानाच्या movement मध्ये सहभागी नाही. कारण ते E Movers च्या अखत्यारीत येते.

बिझनेस करताना मी काही अत्यंत महत्त्वाचे धडे शिकलो, त्यातील काही खालीलप्रमाणे –

Getting good people is a luck, but keeping good people is a skill. चांगली माणसे नशिबाने मिळतात. पण चांगली माणसे टिकवायला कौशल्य लागते. एकांडा शिलेदार कोणतेच काम नीट करू शकत नाही, तर त्यासाठी त्याला चांगल्या सहकाऱ्याची आवश्यकता असते. आपल्याकडे चांगला माणूस असेल तर त्याला टिकवण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी कधीकधी चाकोरीबाहेरचे निर्णय घ्यावे लागतात. चांगली माणसे जपणे हे जसे महत्त्वाचे तसेच चुकीच्या माणसांना वगळणे हेदेखील तितकेच किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्वाचे आहे.

'Cash is king'! बिझनेसमध्ये पैसा सतत खेळत राहणे हे नफ्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे आहे. जर भरपूर cash flow असला व नफा जरी होत नसला तरी कठीण परिस्थितीतही बिझनेस तग धरून उभा राहू शकतो; परंतु नफा होत असूनही हातात पैसा नसला तर बिझनेस चालवणे कठीण होऊन बसते.

'Routine sets you free'! बिझनेसमध्ये किंवा आयुष्यात जर एकाच वेळी तुम्हाला अनेक गोष्टी करायच्या असल्या तर आगाऊ आखणी करण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे. नियमितपणे व लयबद्धतेने आखणी केली तर तुमची कामे तुम्ही व्यवस्थितपणे व सातत्याने करू शकता व नवीन कामे हाती घेण्यास तुम्ही मोकळेसुद्धा राहू शकता. 'We only get what we inspect, and not what we expect'.

सांगायचे झाले तर तपासणीचे योग्य मुद्दे ही यशाची गुरुकिल्ली आहे. मी असे पाहिले आहे की यशस्वी माणसे प्रथमपासूनच तपासणी यंत्रणा उभारण्यावर अधिक भर देतात. ज्यायोगे नंतर उद्भवणाऱ्या प्रश्नांना तोंड देण्यास त्यांना कमीत कमी वेळ घालवावा लागतो. Micro management पेक्षा Micro monitering ची जास्त गरज आहे.

Word of mouth is always working. You need to know it is working for you or against. बिझनेसमध्ये आपण जे कबूल केले आहे तेच देताना ते पाहिले पाहिजे. जग अत्यंत लहान आहे व word of mouth प्रकाशापेक्षाही अधिक वेगाने पसरतो. 'Having a good mentor and accountability, partner is essential for the acceleration of business growth.' तुम्हाला तुमच्या जबाबदारीची जाणीव करून देईल व तुम्ही मार्गावरून ढळत असाल तर तुम्हाला परखडपणे सांगेल अशी मार्गदर्शक व्यक्ती तुमच्या सोबत असणे अतिशय आवश्यक आहे.

'People do business with people they like and trust' हे समजण्यास अत्यंत सोपे; पण अमलात आणण्यास अत्यंत कठीण आहे. हे धडे गिरवता गिरवता मी आजकाल training व व्याख्याने देणे यांवर लक्ष केंद्रित करत आहे. ज्यायोगे स्वानुभवातून व माझ्या मार्गदर्शकांकडून मिळालेले ज्ञान मी इतरांपर्यंत पोहोचवू शकेन आणि त्यांच्या प्रगतीस हातभार लागू शकेल.

देवाचा आमच्यावर वरदहस्त आहे. देवाच्या कृपेने योग्यवेळी योग्य सल्ला देणारे आम्हाला भेटले. त्यामुळेच तीन लोकांच्या सहाय्याने सुरू झालेल्या 'E Movers'चा प्रवास ४५०हून अधिक सदस्यांसकट अजूनही पुढे चालू आहे.

– **चिरंतन जोशी**
cajoshi8@gmail.com






*पूर्वीच्या काळी जेव्हा छपाईला सुरुवात झाली, त्याकाळापासूच लोकांचा त्यावर अथांग विश्वास होता. एखादी गोष्ट छापून येणे हीच त्या गोष्टीच्या सत्यतेची ग्वाही ठरयची. अशा या छपाईच्या क्षेत्रात बदलत्या युगात कसे कसे बदल होत गेले याची रोचक माहिती श्री. सागर ओक यांच्या लेखात वाचायला मिळेल*

# बदलती मुद्रणालये

**सागर ओक**

सुमारे ४५ वर्षांपूर्वी मी मुद्रण क्षेत्रात येण्याचे मनात ठरवले तेव्हाचे आणि आत्ताचे मुद्रणालय यात खूप मोठा फरक आहे. जगातील सर्वच क्षेत्रांत गेल्या काही वर्षांत बरेच बदल घडलेत तेव्हा मुद्रण क्षेत्र याला अपवाद कसा ठरेल? तेव्हा अक्षरांची खिळे जुळणी करून किंवा पत्र्याचे ब्लॉक बनवून त्याला शाई लावून त्याने कागदावर ते चित्र अथवा मजकूर छापला जायचा. हे काम बरेच वेळकाढू व किचकट होते. खरं सांगायचं तर ती एक कलाच होती. मीसुद्धा शाळेला सुट्टी लागली की माझ्या वडिलांच्या प्रेसमध्ये जाऊन दिवस दिवस घालवायचो. आता ती पद्धत जवळजवळ नामशेष होऊन त्याऐवजी नवनवीन तंत्रज्ञान आलंय, येऊ घातलंय.

खरं तर त्यानंतर ८०च्या दशकामध्ये ऑफसेट प्रिंटिंगने जुनी मुद्रणालये काबीज केली. या प्रकारच्या प्रिंटिंगमध्ये पूर्वीच्या पेक्षा वेळ कमी लागत असल्यामुळे प्रिंटिंग प्रेसच्या







मालकांनी ती पटकन आत्मसात केली. कलाकारांच्या कलेपेक्षा तंत्रज्ञानावर अवलंबून असलेल्या या पद्धतीमुळे कामगारांवरचे अवलंबित्व कमी होऊन मशीनवरचे वाढले. याच सुमारास भारतामध्ये विशेषतः मोठ्या शहरांमध्ये कामगार चळवळीने जोर धरला होता. 'लेटरप्रेस'सारख्या जुन्या मुद्रण करणाऱ्या व्यवस्थापनांना या जुन्या कलाकार कामगारांची अरेरावी सहन करावी लागत होती. कारण ती कला जाणणारे कामगार कमी होते. त्यामुळे बँकेकडून कर्ज घेऊन जुन्या मशीनच्या बदल्यात नवीन ऑफसेट मशीन घेऊन नवीन कामगारांना त्यावर तयार करणे सोपे झाले होते आणि या सर्व कारणांमुळे बघता बघता ऑफसेटचा प्रसार झाला.

याच सुमारास दुबई व आजूबाजूच्या आखाती देशांच्या प्रगतीचा घोडा चौफेर उधळू लागला होता. इथे विविध व्यापार सुरू होत होते. कर सवलतींमुळे इथे जगभरातून व्यावसायिक येऊ लागले होते. या सर्व परिस्थितीमुळे या सर्व धंद्यांना पूरक म्हणून मुद्रण व्यवसाय पण इथे उभा राहू लागला. तेलातून मिळालेल्या अफाट पैशामुळे इथे मशिनरी विकत घ्यायला भांडवल पटकन उपलब्ध होते. त्यामुळे आखाती देशांमध्ये सुद्धा १९९०च्या सुमारास स्थानिकांनी अनेक नवीन मुद्रणालये उघडली. ही नवनवीन मशीन चालवायला हुशार आणि तंत्रज्ञ वृत्तीचे कामगार पाहिजे होतेच. ती गरज भारतीय उपखंडाने सहज पुरवली. कामगार, सुपरवायझर, मॅनेजर असे सर्व थरांवरचे लोक इथे आले. सर्व व्यवसायांसारखे या क्षेत्रात पण सर्वांनी भरपूर पैसे कमावले. त्याच नोकरदार व्यक्तींमधून काही उद्यमशील लोकांनी कमावलेले पैसे गुंतवून स्वतःचे लहान प्रेस व त्यांना लागणारे पूरक व्यवसाय सुरू केले.

हाच तो सन २००० ते २००७ सालचा काळ. दुबई-शारजामध्ये मुद्रण क्षेत्रावर प्रभुत्व आणि स्वामित्व तेव्हा भारतीयांनी स्थापित केलं. आणि याच सुमारास दुबईमध्ये काही महत्त्वाचे बदल घडत होते. सरकारने विविध ठिकाणी मुक्त व्यापार विभाग (फ्री-झोन) सुरू करून नव-व्यावसायिकांची खूप चांगली सोय केली. या विभागांमध्ये नोंदणी केली तर आता पूर्वीसारखा एक स्थानिक भागीदार घेण्याची सक्ती राहिली नव्हती. याचा फायदा पण अनेकांनी घेऊन आपले नवीन व्यवसाय सुरू केले. काही वर्षे दुबईमध्ये जणू कुबेराचेच राज्य सुरू होते. अगदी लहानात लहान मजुरापासून ते मोठ्या कारखानदारापर्यंत सगळे भरपूर पैसे मिळवत होते.

आणि अचानक २००८ मध्ये अमेरिकेत लेहमन ब्रदर्सची बँक दिवाळखोर झाल्यावर त्याचा विपरीत परिणाम बहुतेक सर्व देशांच्या अर्थव्यवस्थेवर झाला. याचा यू.ए.ई.मधल्या दुबई सारख्या नुसत्या व्यापार/पर्यटन क्षेत्रावर बहुतांश अवलंबून असलेल्या देशावर झाला नसता तरच नवल. या सुमारास बरीच लहान-मोठी मुद्रणालये बंद पडली. झालेल्या कामांचे पैसे गिऱ्हाईकांनी बुडवले म्हणून असे घडले. यामध्ये ज्या मालकांवर बँकांचे व बाजारातले कर्ज होते, त्यांची संख्या जास्त होती. ही सर्व पडझड थांबल्यावर २०१० पासून उरलेल्या व्यवसायांचे पुन्हा सक्षमीकरण सुरू झाले. आता लोक हुशार झाले होते. दुधाने जीभ भाजली म्हणून ताकसुद्धा फुंकून पिऊ लागले होते. त्यामुळे त्यांचा पुन्हा जम बसू लागला.

मध्ये दोन-तीन वर्षे संथ गेल्यावर आता पुन्हा नव्या जोमाने सगळे कामाला लागले आहेत. इंटरनेट व मोबाईलचा वापर सर्वदूर आणि सर्वमान्य झाला होता. यामुळे आता बरीचशी माहिती, नोंदणी इत्यादी कामे कागदोपत्री न





राहता फोनवरून अथवा ई-मेलवरून होऊ लागली होती. साहजिकच मुद्रित साहित्याची मागणी कमी होऊ लागली. निसर्गाचा ऱ्हास थांबविण्यासाठी कागदाचा वापर कमी करावा अशी एक रास्त चळवळ जोरात होती.

या सर्व गोष्टींमुळे प्रिंटिंगमध्ये पण एक मोठी क्रांती घडत होती. ऑफसेट प्रिंटिंगचा वापर कमी होऊन त्याची जागा नवीन डिजिटल तंत्रज्ञानाने घेतली होती. याचा मोठा फायदा हा होता, की आपल्याला अगदी हातावर मोजण्याइतक्या प्रती जरी हव्या असल्या तरी ते शक्य झाले होते. यासाठी किंमत पण फक्त आपण जितक्या प्रती छापू तितकीच द्यावी लागे. याचे फायदे पण खूप होते. ऑफसेट प्रेसच्या मालकांनी आता डिजिटल प्रिंटिंग मशीन आणायला सुरुवात केली आणि मग त्यांच्या असं लक्षात आलं की या तंत्रज्ञानाने नुसत्या कागदावरच नाही तर इतर विविध सामग्रीवर छपाई करणं शक्य आहे. नुसत्या लहान आकारात नव्हे, तर बाहेर उघड्यावर लागणारे महाकाय बॅनर, भिंतींवरील मोठ्या जाहिराती, मॉल्समधील शो-रूम्सच्या काचांवरील ग्राफिक्स, असे सर्व काम जे पूर्वी रंगारी करत, आता मोठ्या आकाराच्या डिजिटल छपाईने शक्य केले आहे. फोटो अथवा आर्टवर्क कॉम्प्युटरमार्गे जसेच्या तसे छापून तयार होऊ लागले आहे.

या सर्व बदलांबरोबर मुद्रकांनी स्वतःची मानसिकतासुद्धा बदलणं आवश्यक होत आहे. मुद्रणालयाने कारखान्याचे स्वरूप सोडून ऑफिसचा मुखवटा धारण करणं आवश्यक आहे. किंबहुना आता त्याचे स्वरूप ऑफिसपेक्षा जास्त दुकानप्रकारात गणले जाऊ लागले आहे. त्यातच आता नवीन तरुण पिढीकडे नवनवीन कल्पनांची खाणच असते. त्यांना या नव्या प्रकारच्या व्यवसायामध्ये भरपूर संधी मिळतील. लहान-मोठ्या उद्योगसमूहांची सेमिनार्स, पार्ट्या, घरगुती समारंभ, मंडळांचे वार्षिकोत्सव इत्यादी अनेक कार्यक्रमांत या आणि अशा साहित्याची आवश्यकता असते. काही ठिकाणी अशी गरजही निर्माण करावी लागते. हे सर्व काम आता 'प्रिंट शॉप' या संकल्पनेत साकार होत आहे. हे मर्म ज्यांनी जाणलं ते या धंद्यात टिकून राहिलेत.

दुबई सरकारच्या नवीन धोरणांमुळे आता नवीन व्यवसाय सुरू करणे फार कठीण व जिकिरीचे राहिले नाहीये. ज्याला स्वतःचा असा काही व्यवसाय सुरू करायचा असेल तर आता पूर्वीइतक्या अमाप भांडवलाची पण गरज पडत नाही. इथल्या सरकारने वैयक्तिक व्यावसायिक परवाने (Freelancer Licence) द्यायला सुरुवात केली आहे. यामुळे आता अनेकांनी इथे कन्सल्टन्सी अथवा ट्रेडिंगचे काम सुरू केलंय. याला खूप भांडवल लागत नाही. तुम्हाला सुरुवातीला स्वतंत्र ऑफिसची गरज नसते. अर्थात काही वर्षे कोणतेही मशीन न घेता फक्त एखादा चांगला कॉम्प्युटर घ्यायचा,



त्याच्या मदतीने आपले आपण गिऱ्हाईकाला पाहिजे तसे डिझाईन तयार करायचे आणि ते एखाद्या मुद्रण केंद्रातून तयार करून घ्यायचे. इथे आपल्या गिऱ्हाईकाला आपण तत्पर सेवा देऊन आपलेसे करून हळूहळू आपला धंदा वाढवायचा. मुळातच हे क्षेत्र एक सेवाक्षेत्र आहे हे मान्य करून मगच यामध्ये शिरकाव करावा, म्हणजे यश हमखास मिळणारच. ज्याप्रमाणे बहुतांश लोकांना सुट्टी असते तेव्हा हॉटेल्स, मॉल्स, वाहतूक, पर्यटन वगैरे सेवांमध्ये काम करणारे लोक नेहेमीपेक्षा अधिक काम करतात त्यासारखे आपण एक आहोत असे मनाशी ठरवले की आपण आपोआप यशस्वी, समाधानी व संपन्न होतो.

**– सागर ओक** (मुद्रणतज्ज्ञ)
sagar44@gmail.com

# बिझनेसचा कावळा

विनीत पानसरे






*स्वव्यवसायाच्या स्वप्नाने झपाटलेला एक तरुण! परदेशात येऊन जीवापाड मेहनत करून जिद्दीने स्वबळावर स्वव्यवसाय सुरू केला आणि यशाचे शिखर गाठले! त्याची ही कहाणी नवीन पिढीला नक्कीच मार्गदर्शक आहे.*

मला आठवते आहे की वयाच्या विसाव्या वर्षांपासूनच काहीतरी स्वव्यवसाय करायची मनोमन अगदी प्रबळ इच्छा होती. मुंबई व पुण्यामध्ये आयर्न एक्स्चेंज आणि थरमेक्स अशा कंपन्यांमध्ये काम करत असताना अनेक विक्रेते (सप्लायर्स) भेटायचे. त्यांना पाहून असे वाटायचे की आपण असे का करू शकत नाही? आयुष्यभर नोकरीच्या चक्रामध्येच राहणार आहोत का? कित्येकदा संध्याकाळी समविचारी मित्रांमध्ये ही चर्चा होत राहायची. तो विषय त्यात चर्चेत संपून जायचा.

असे बरीच वर्षे चालू होते. नंतर 'कुरकुंभ' येथे नवीन एमआयडीसी चालू होते आहे, तिथे एखादा प्लॉट घेऊन एखादी केमिकल फॅक्टरी टाकावी असे वाटू लागले. पण कशाची? काय बनवणार? भांडवल कुठून आणणार? नोकरी सोडल्यावर घरखर्च कसा चालणार? बायकोची नोकरी नाही त्यामुळे सेकंड इन्मक नाही. या सर्व विचारांनी मला पुन्हा मागे ओढले व मी मराठी साधा व सरळमार्गी माणूस पुन्हा एकदा आपल्या नोकरीत विरघळून गेलो. इमाने-इतबारे बंगलोर मध्ये दहा वर्षे काम केले. परदेशातील आमच्या कंपनीमध्ये नाव मिळवले, मानमरातब मिळवला. पण बिझनेसचा विचार काही मनातून जात नव्हता.

यालाच मी 'बिझनेसचा कावळा' म्हणतो. वाचकांच्या सोयीसाठी सांगायचे झाले तर प्रत्येकाला मृत्यूनंतर दहावा आणि तेरावा चुकलेला नाही. जोपर्यंत अपूर्ण इच्छा पूर्ण होत नाही तोपर्यंत कावळा पिंडाला शिवत नाही. हाच विचार मित्रांमध्ये प्रबळ होता की या आयुष्यात जर

बिझनेस केला नाही तर कावळ्याची शाश्वती नाही. हा कावळा इतका प्रबळ होता की वयाच्या ४२व्या वर्षी परदेशात येऊन बिझनेस सुरू केला व तो हळूहळू सात वर्षांत मजबूत केला.

दहा वर्षे बंगलोरमध्ये काम केल्यानंतर आमच्याच परदेशी कंपनीने दुबईमध्ये फॅक्टरी उभी करण्याचे ठरवले व मला इथे येण्याची संधी मिळाली. आखाती देशाचे आकर्षण फार पूर्वीपासून होते कारण येथे पगारातून होणारे सेव्हिंग जास्त होते असे खूप जणांकडून ऐकले होते. दुबईत येऊन तीन वर्षे नोकरी केली व कंपनीसाठी केमिकलची फॅक्टरी उभी केली.

या तीन वर्षांत कंपनीत नवीन मित्र मिळाले. पुन्हा तेच विषय! बिझनेस करायचाच! एक गोष्ट तेव्हा लक्षात आली की आखाती देशात धंदा करणे भारतापेक्षा सोपे आहे कारण येथील सरकारचे धोरण हे उद्योजकांना प्रोत्साहन देणारे आहे. भारतातील स्थिती मात्र अजिबात प्रोत्साहन देणारी नाही.

२१ वर्षे नोकरी केल्यानंतर आणि नोकरीत सर्व काही उत्तम प्रकारे चालू असताना हा बिझनेसचा आटापिटा कशाला? असे बऱ्याच जणांनी विचारले. पण आईवडील व बायकोचा पाठिंबा असल्यामुळे २१ वर्षे जपलेली नोकरी सोडली व बिझनेसच्या तलावात उडी मारली.

आम्ही केमिकल्स वितरणाचा व्यवसाय सुरू केला. प्रथम चार भागीदार होतो (भारतीय). पाचवा एक नावापुरता स्थानिक भागीदार होता. सहा महिन्यांचा पगार बाजूला ठेवला व बायकोला सांगितले की सहा महिन्यांत जर नोकरी जमली नाही तर पुन्हा नोकरी पकडीन. परंतु ती वेळ आली नाही. कावळ्याच्या मागे देव उभा होता. २१ वर्षांची नोकरी सोडण्याचे दुसरे कारण म्हणजे सर्व काही व्यवस्थित चालू होते. आयुष्यात काहीतरी चॅलेंज पाहिजे होता. चार भारतीय भागीदारांच्या चार डोक्यांनी धंदा चालू होता. वितरण व्यवस्थित चालू होते. काही कठीण अडचणी आल्या; पण त्यावर मात करून वाटचाल पुढे चालू होती. बरेच काही शिकायला मिळाले! चार डोकी – चार विचार! एकत्र काम करून यश मिळवायचे एवढेच ध्येय होते. भागीदारीत कसे काम करायचे हे एक मोठे शिक्षण होते माझ्यासाठी! क्रिकेट आणि नवरा हे एक उत्तम उदा. म्हणून वापरता येईल यासाठी! धंद्यातील भागीदारी हे नाते नवरा-बायकोच्या नात्यापेक्षा फारसे वेगळे नाही असे गेल्या सात वर्षांत माझ्या लक्षात आले आहे. तसेच क्रिकेट मध्ये बॅटिंग जशी रोटेट करावी तसेच भागीदारीचे क्रिकेट आहे!

पुढे लक्षात आले की चार जणांचे क्रिकेट जर अवघड झाले म्हणून २०११ मध्ये २ x २ असे बाहेर पडून पुन्हा शून्यातून कंपनी उभी केली. यावेळी फरक एवढाच होता की कमावलेले भांडवल होते व भागीदारीचा व धंद्याचा अनुभव होता.


पुन्हा एकदा नवीन ऑफिस, नवीन माणसे जमा करून धंदा सुरू केला. पण देवदयेने ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिला व धंदा उत्तमप्रकारे उभा राहिला! परत एका नवीन नावाने वितरण उद्योग चालू झाला व आम्ही स्थिरावलो! तसा बिझनेसमध्ये तणाव व उद्योग कायमच बरोबरीत चालतात. त्यामुळे तणावाचा उल्लेख जास्त करत नाही.

आता सांगतो एका स्वप्नाबद्दल! परदेशी जागतिक कंपनीत काम करताना तीन ठिकाणी फॅक्टरी उभारणीची कामे केली. त्या तीनही फॅक्टऱ्या बंगलोर, दुबई व चीनमध्ये आजही चालू आहेत. कार्यरत आहेत. आमचेही एक स्वप्न होते की आपलीही एक स्वतंत्र फॅक्टरी असावी म्हणजे वितरणावर पूर्णपणे अवलंबून राहायला नको. 'ओम शांती ओम'मध्ये शाहरूख खानने सांगितल्याप्रमाणे 'किसी भी चीज को आप दिलसे मांगते हो तो सारी कायनाथ उसे आपको मिलवाने के पीछे लग जाती है' त्याप्रमाणे एक सुसंधी समोरून चालून आली. एका मोठ्या ओमानी कंपनीने आम्हाला स्वतःहून विचारणा केली व एक केमिकल फॅक्टरी उभारण्याचा प्रकल्प आमच्यासमोर ठेवला. आम्हा दोघा भागीदारांना याचा एवढा आनंद झाला की तो शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. पण हे आव्हान स्वीकारून पुन्हा एकदा नेटाने कामाला लागलो व दोन वर्षांत एक फॅक्टरी 'जाबल अली' येथे टाकली. अनेक अडचणी आल्या. कंत्राटदार इजिप्शियन होता. त्याने बराच त्रास दिला; पण अखेर सर्व अडचणींवर मात करून ऑगस्ट २०१५ मध्ये फॅक्टरी चालू केली व उत्पादन चालू केले.

आता पुढचे आव्हान असे की फॅक्टरी तर झाली, पण उत्पादनाच्या नवीन ऑर्डर्स मिळवणे आवश्यक! आता विविध ग्राहकांना पकडून हे काम जोरात चालू आहे व हळूहळू उत्पादन पण वेग घेत आहे. देव पाठीशी आहे व बायका-मुलांची पण साथ आहे त्यामुळे हे आव्हानही पार पाडू शकू असा विश्वास आहे.

सरळपणाने दुसऱ्याचा हेवेदावे न करता, वाईट चिंतन न करता, कायम साधी राहणी व विचारसरणी ठेवूनही आयुष्य सुखी व समाधानी होऊ शकते आणि यासाठी वरकमाईची जरूर लागत नाही, असे माझे ठाम मत आहे!

– विनीत पानसरे
vinit.pansare@gmail.com








# मनीषाचे मनीषाज् किचन

सचिन चितळे

दुबई! वाळवंटातील नंदनवन! अत्याधुनिक सुखसोयींनी नटलेले हे शहर खाद्यपदार्थांच्या बाबतीत तरी कसे मागे असेल? इथे जगाच्या कानाकोपऱ्यातून वेगवेगळ्या देशांची, जातीची, धर्माची माणसे आली आहेत व येताना त्यांनी आपल्या पाककृतीसुद्धा बरोबर आणल्या आहेत. अरबी खाद्यपदार्थांबरोबर इराणी, मोरक्कन, लेबनीज, Continental, इटालियन, चायनीज, थाय, मेक्सीकन, फ्रेंच, इंडियन– त्यात पंजाबी, साऊथ इंडियन, मारवाडी, गोवन पदार्थ मिळतात. अर्थातच आपले चविष्ट महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थही मागे नाहीत. अनेक मराठी उपाहारगृहे आहेत त्यातीलच एक म्हणजे 'मनीषाज् किचन'!



साधारण २००० साली ज्यावेळीस मनीषा तिच्या दुसऱ्या बाळाला घेऊन दुबईला तिच्या संसारात परत आली, त्यावेळी तिच्या ध्यानीही नव्हतं की आता पुढे आपल्या करिअरचे काय करायचे? व्यवसायाने कमर्शिअल आर्टिस्ट असलेल्या मनिषाला जोपर्यंत दोन्ही मुलं थोडी मोठी होत नाहीत तोपर्यंत घरात लक्ष देणे गरजेचे होते.

मुलांचे संगोपन करून उरलेला वेळ कसा घालवायचा या संभ्रमात असलेल्या आणि पाककलेची अतिशय आवड असणाऱ्या मनीषाने सहज म्हणून घरात कॅटरिंग करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीपासूनच तिच्या हाताची चव 'क्लिक' झाली. एवढेच नव्हे, तर २००२–२००४ सालामध्ये तिने प्रथमच, मागील काहीही अनुभव नसताना, दिवाळी फराळाची तब्बल २५०–३०० किलोची निर्मिती स्वतःच्या एक बेडरूमच्या घरातून केली आणि तिला तिच्या करिअरचा निश्चित मार्ग सापडला.

तिला खऱ्या अर्थाने 'ब्रेक' मिळाला तो तिला २००४ साली दुबई महाराष्ट्र मंडळाच्या मिळालेल्या सत्यनारायणाच्या पूजेच्या प्रसादाच्या ऑर्डरने. त्यावर्षीच्या श्री. प्रदीप अग्निहोत्री ह्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या कमिटीने जे सहकार्य दिले, त्या सर्व संध्यांचे मनीषाने चीज केले आणि मग तिच्या या उपक्रमाला खऱ्या अर्थाने व्यावसायिक स्वरूप आले. सुरुवातीला असलेली ३०–४० जणांच्या कॅटरिंगची क्षमता, वाढत्या मागणीमुळे वर्षभरातच ७०–८० जणांवर जाऊन पोहोचली.

राहत्या एक बेडरूमच्या घरातील कॅटरिंगची भांडी, धान्याचा पसारा, पँट्रीवजा असलेले किचन, ह्यांपैकी कुठलीही गोष्ट तिच्या या पाककलेच्या ध्यासातील अडथळा बनण्यात असमर्थ ठरली. आयुष्यातील प्रत्येक अडचणींवर मात करायचा तिला जणू नशाच चढली होती. स्वतःच्या गाठिशी व्यावसायिक कॅटरिंगचा नसलेला अनुभव, मदतीला असलेली; पण सतत बदलणारी माणसे, मोठी होणारी मुले, त्यांचं शिक्षण किंवा नवऱ्याची अबुधाबीची नोकरी, यांपैकी काहीही तिला तिच्या ध्येयापासून दूर ठेवू शकले नाही. जेवढे अडथळे





आले तेवढा मनीषाचा कॅटरिंग करायचा निर्धार पक्का होऊ लागला.

लोकांकडून तिच्या पाककलेला मिळणारा प्रतिसाद बघून मनीषाने स्वतःचे महाराष्ट्रीयन रेस्टॉरंट चालू करायची मनीषा (मनातील इच्छा) बोलून दाखविली आणि तिच्या नवऱ्याने म्हणजे सचिनने, तिच्या या हौसेला औद्योगिक स्वरूप द्यायचा विचार केला. त्यासाठी लागणारे अर्थसहाय्य जमविण्यासाठी विविध गुंतवणूकदारांशी बोलणीही चालू केली. पण एक स्त्री आणि तीसुद्धा मुलंबाळं असलेली, त्यामुळे कोणीही तिच्यासोबत गुंतणूक करण्याचे धाडस दाखविले नाही. जे कोणी पुढे आले त्यांनी थोड्या बोलणीनंतरच माघार घेतली.

पण मनीषा आणि सचिनने हार न मानता स्वतःच, लागणारा पैसा कसा उभा करता येईल याचा विचार करायला सुरुवात केली. रेस्टॉरंटसाठी लागणारी योग्य जागा बघायला करामा आणि बरदुबई एरियात चालू केले. बजेट फार नव्हते आणि मनासारखी जागा मिळणेही कठीणच होते. शेवटी सहा-सात महिन्यांच्या प्रयत्नांनंतर, करामामधील शेख हमदान कॉलनीमध्ये एक जुने रेस्टॉरंट विकायला आहे असे कळले. प्रत्यक्षात जाऊन जागा बघितली आणि त्याच्या मालकाला ते दोघे भेटले. जागा अपेक्षेपेक्षा मोठी असल्याने अर्थात थोडी बजेटच्या बाहेरही होती. पण म्हणतात ना ज्यावेळेस तुमची चांगली वेळ येते, त्यावेळेस देव वेगवेगळ्या रूपाने तुमच्या मदतीला येतो. त्या रेस्टॉरंटचे मालक श्री. सुरेश यांनी त्यांची आर्थिक अडचण जाणून, विक्रीचे पैसे भारतात आणि तेसुद्धा रुपयांत स्वीकारण्याची मुभा दिली.

ही सुवर्णसंधी दवडू न देता आणि त्याचा फायदा घेण्यासाठी, त्यांनी त्यांचा पुण्याचा फ्लॅट विकण्याचा धाडसी निर्णय घेतला. गाठीशी जमलेले पैसे आणि त्यांचे मित्र-मंदार दामले, आनंद जोशी आणि रेस्टॉरंट क्षेत्रातील अनुभवी श्री. दिगंबर राणे यांनी दिलेल्या सहकार्याच्या बळावर जानेवारी २०१२ मध्ये 'मनीषाज किचन'ची वेल कारामाच्या कर्मभूमीत रोवली गेली.

मनीषा समोरील खरे आव्हान आता होते, ते म्हणजे रेस्टॉरंट या क्षेत्रातील काहीही अनुभव नसताना, त्यासाठी लागणारी तयारी, क्षेत्रातील अनेक दिग्गजांच्या मार्गदर्शनाखाली, स्वतःच शिकत शिकत करण्याचा निर्णय घेतला. विविध सरकारी परवाने, मंजुरी, लागणारी भांड्यांची खरेदी इत्यादी स्वतः जातीने करायचे ठरविले. आपल्या व्यवसायाच्या सर्व अंगांची माहिती असणे मनीषाच्या दृष्टीने गरजेचे होते आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यामुळे पी.आर.ओ.वर वाचणारा वेळ आणि पैसा. ही सर्व जबाबदारी तिने कुशलतेने पार पाडली.

आज 'मनीषाज् किचन'च्या रूपाने मनीषाची नुसती इच्छा पूर्ण झाली नाही, तर त्या २०१२ साली रोवलेल्या वेलीला आज शारजाहची शाखाही निर्माण झाली आहे. दोन्ही शाखा रुचकर, शुद्ध शाकाहारी; परंतु केवळ महाराष्ट्रीय पाककृती नाही तर इतर प्रांतीय आणि काही 'मनीषाज् ओन मराठी फ्युजन' पाककृतीचा सुगंध, संपूर्ण अमिरातीत दरवळत ठेवून आहेत. मनीषाला अजूनही वेगवेगळ्या नवीन कलाकृती सादर करायच्या आहेत. तीच तिची पुढची मनीषा आहे.

दुबई शाखेने साडेतीन वर्षं, तर शारजाहने आठ महिने पूर्ण केले आहेत. कुठलेही प्रमुख जाहिरात माध्यम न वापरता, केवळ मुखप्रचाराद्वारे, त्यांची कीर्ती केवळ आखातात सीमित न राहता, भारतात आणि जगातल्या काही देशांतही पोचली आहे.

अधिक माहितीसाठी त्यांच्या manishaskitchen.com वेबसाईटला अवश्य भेट द्या किंवा +971-4-3706904 वर संपर्क करा.

**- सचिन चितळे**
sann71@gmail.com





# Professional Journey

## सुहास/प्रीती रेगे

महाराष्ट्रात राहिलेला मराठी माणूस हा नेहमीच आपल्या comfort zone मध्ये राहिला आहे. नोकरी करणे व चाकोरीचे जीवन जगणे यातच त्याला धन्यता वाटते. परंतु आता मात्र विसाव्या शतकापासून आपल्या या मराठी माणसात फरक पडलेला दिसून येतो आहे. अगदी दुबईचे उदाहरण घ्यायचे झाले तर येथे तुम्हाला बरीचशी मराठी लोकं सर्व इंडस्ट्रीमध्ये व्यवसाय करताना आढळून येतात.

त्यातीलच आम्हीसुद्धा एक मराठी दांपत्य! १९८१ साली आम्ही दुबईत आलो. चार-पाच वर्षे नोकरी केली व मार्केटचा आढावा घेतला. १९८७ साली स्वतःची 'Advertising Agency' (जाहिरात संस्था) सुरू करायचे ठरवले.

दुबई किंवा पूर्ण गल्फमध्ये आपणास व्यवसाय सुरू करायचा असेल तर सर्वात मोठे आव्हान म्हणजे Local Sopnsor मिळवणे. ते सुद्धा ५१% partnership तुम्हाला त्याच्या नावावर लिहून द्यावी लागते. त्यात त्याची Contribution शून्य! धंदा मिळवणे, चालवणे व आर्थिक गुंतवणूक ही सर्व तुमची जबाबदारी! येथील नियमानुसार आपल्याला इथे स्वतंत्र ऑफिस घेणे जरुरीचे आहे. तसेच ऑफिसमध्ये काम करणारा employee हा आपल्या कंपनीच्या visa वर असणे जरुरीचे आहे.

सुरुवातीपासून आम्ही नवीन client मिळवून त्यांना चांगली service देऊन हळूहळू कंपनी set करायला सुरुवात केली. आमचा strategic approach व personalised



**नेहमीची पाऊलवाट सोडून advertising सारख्या भिन्न क्षेत्रात प्रवेश करून, स्वतःचे पाय घट्ट रोवून यशस्वीपणे उभे राहणाऱ्या सुहास आणि प्रीती रेगे यांच्या जाहिरात संस्थेची माहिती त्यांच्याच शब्दातून!**

service व त्याहून महत्त्वाचे म्हणजे आमचे creative work यामुळे लवकरच आम्ही सर्व client's चा विश्वास संपादन केला.

Media releases, Below the line, Above the line, Designing, Brand identity, Exhibition stall, Press releases, Production इत्यादी सर्व Proffessional services आम्ही तेव्हा ऑफर करत होतो. त्यामुळे client च्या दृष्टीने खूप सोयीस्कर होते. सुरुवातीला हे सर्व जड, कठीण वाटणारे आव्हान हळूहळू सहज वाटायला लागले. जेव्हा आमची व्यावहारिक आणि आर्थिक उन्नती होऊ लागली तेव्हा घेतलेला निर्णय योग्य वाटू लागला.

जसजसा बिझनेस वाढू लागला तसतसे clientच्या बाबतीत आम्ही पण selective होऊ लागलो. Establish company's व Brands वर काम करू लागलो. (i.e. Bank of Baroda, Wallstreet Exchange, Siemens, Samsung, Gold Centre) ह्यानंतरचे मोठे चॅलेंज म्हणजे मिळवलेले clients टिकवणे! जसे दुबई एक business hub म्हणून त्याचा विकास होऊ लागला तसतशा येथे बऱ्याच Local व International agencies establish होऊ लागल्या. त्यामुळे आम्ही आमचा aaproach change केला. आम्ही आमच्या service मध्ये Digital Advertising वर जास्त भर दिला. आम्ही client साठी Website designing, SEO, SEM तसेच Community management, Digital Media सारख्या सर्व्हिसेस उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे आमच्या एजन्सीची Position चांगली झाली व एजन्सीला वेगळेच स्थान मिळाले. त्याच सुमारास जागतिक आर्थिक मंदी आल्यामुळे सर्व बिझनेसना त्याचा फटका बसायला सुरुवात झाली. त्यात सर्व कंपन्यांनी Advertising budjets कमी करायला सुरुवात केली.

अशा या कठीण प्रसंगी एक चांगली गोष्ट घडली ती म्हणजे आमचा मुलगा सागर हा अमेरिकेतूनFilm Makingची Degree घेऊन आला व तेथील Industry चा अनुभव घेऊन आम्हाला Join झाला. सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन त्याने एजन्सीची नवीन Strategy तयार केली. त्याने Branded Content, Film Making, Animation, Info Graphics इत्यादी Film related services introduce केल्या.

या नवीन केलेल्या बदलामुळे आम्ही थेट Multinational Brands (i.e. Lipton Ice Tea, Johnson & Johnson, Total Lubricants, Emirates NBD Bank इत्यादी) clients बरोबर काम करण्याची संधी मिळू लागली. आमच्या या प्रवासात आम्हाला वारंवार प्रश्न विचारला जातो की Branded content film म्हणजे काय? याचे सरळसोपे उत्तर म्हणजे एखाद्या ब्रँडची माहिती interesting story telling (गोष्टीच्या स्वरूपात) film बनवली जाते. अशा बनवलेल्या films U-tube व Digital media वर प्रसारित केल्या जातात. या film ची production cost सुद्धा Tv commercial filmच्या ५०% budject मध्ये होऊ शकते. तसेच U-tube वर प्रसारित केल्यामुळे महाग Tv-channels च्या प्रसारणाचा खर्च वाचतो.

अशा प्रकारे प्रथम आम्ही सौदी मार्केटसाठी Lipton Ice Tea या Brand साठी अरेबिक भाषेतून films बनवल्या. या films ना U-tube वर 3.5 million views मिळाले. या फिल्म आमच्या कंपनीसाठी यशस्वी झाल्या.



दुसरे यशस्वी उदाहरण सांगायचे झाले तर दुबईतील Emirates NBD Bank साठी आम्ही केलेली फिल्म! या बँकेने त्यांचा नवीन brand launch केला. 'SHAKE & SAVE'! यासाठी आम्ही त्यांना mich videoची idea दिली. त्यासाठी music track तयार करण्यापासून final production सर्व inhouse handle करून ही film बनवली व त्यासाठी आम्हाला New York Academyचे MIDAS पारितोषिक मिळाले. तसेच 'DUBAI LINK' या संस्थेचे पारितोषिक मिळाले.

प्रत्येक कंपनी ही त्यात काम करणाऱ्या लोकांच्या सहकार्यांमुळेच यशस्वी होते. तसेच प्रत्येक कंपनीला चांगली माणसे मिळवणे व ती टिकवणे हे एक मोठे आव्हान असते. आज आमची एजन्सी चांगले Clients, Brands handle करत असल्यामुळे staff लाही नवीन गोष्टी शिकायला मिळतात व आम्हालाही talented staff मिळायला मदत होते.

आज आमचे २५०० स्क्वे. फुटांचे स्वतःचे ऑफिस आहे. त्यात इंडस्ट्रीमधील 20 professionals काम करीत आहेत. आमचे पुढील ध्येय हे आहे की agency इतकी पुढे आणायची की पुढे वर्तमानात आम्ही चागंल्या international organizations बरोबर tie-up करू शकू.

हा हा म्हणता आमच्या एजन्सीला २५ वर्षे पूर्ण झाली. तेवढ्याच उमेदीने आम्ही यशस्वी कारकीर्द पुढे चालू ठेवली आहे. सर्वात शेवटी स्वानुभवातून एक गोष्ट सांगू इच्छितो ती म्हणजे, आयुष्यात कोणतीही गोष्ट risk घेतल्याशिवाय साध्य होत नाही. कोणतेही काम करताना स्वतःचा आपल्या कामावर विश्वास हवा. तसेच willpower strong हवी, मेहनत तर हवीच! हे जर गुणधर्म तुमच्यात असतील तर यशापासून तुम्हाला कधीही हार पत्करावी लागणार नाही!

**– सुहास / प्रीती रेगे**
suhas@liwa.tv / priti@liwa.tv

Since 1994
हेमंत झुटींग
**दिपावली आणि नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा**
*खमंग वडापाव, रुचकर साबुदाणावडा, बटाटा चिवडा, स्वादीष्ट मिठाई, लज्जतदार जिलेबी आणखी खूप काही....*
*खूप वर्षांची यशस्वी वाटचाल*
AVON
AVON
PURE VEGETARIAN
RESTAURANT L.L.C.
Old Gold Souk (Sona Bazar), Deira
Tel.: 04 2251827, P.O.Box: 04 25235, Dubai U.A.E.

# वाळवंटातील वाटचाल

मिलिंद देशमुख





दुबईसारख्या अद्ययावत शहरात स्वतःचा व्यवसाय असणे हे स्वप्न असलेल्या, शिक्षण, अनुभव आणि परिश्रमाच्या बळावर यशस्वीपणे स्वप्नपूर्ती करणाऱ्या श्री. मिलिंद देशमुख यांचे अनुभव त्यांच्याच शब्दांत...!

**यू.ए.ई.** – युनायटेड अरब एमिरेट्स, जगाच्या नकाशावर टीचभर असणारा हा देश दुबई (सात एमिरेट्सपैकी एक) मुळे नावलौकिक मिळवतो आहे. १९७० नंतर झपाट्याने प्रगती झालेल्या दुबईमध्ये अत्याधुनिक इमारती, मॉल्स, सुंदर रस्ते दिसू लागले. जगातील सर्वांत उंच इमारत 'बुर्ज खलिफा' तर प्रवाशांचे मुख्य आकर्षण आहे.

अशा या अद्ययावत शहरात स्वतःचा व्यवसाय असणे हे एक स्वप्नच होते. इंजिनीअर झाल्यावर सुरुवातीचा काही काळ भारतात नोकरी केली. १९९३ मध्ये जेव्हा भारत सोडून सौदी अरेबियात structural डिझाईन इंजिनीअर म्हणून रुजू झालो तेव्हा खरंच पुढे जाऊन असे काही घडेल याची कल्पना नव्हती. पण निश्चितपणे आयुष्यात चांगले काही तरी करायचा ध्यास होता... स्वप्ने होती. त्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी १९९५ मध्ये बहारीनमधील चांगली






नोकरी सोडून एम.बी.ए. करण्याकरता पुण्याला परतलो. पुणे विद्यापीठातून 'मार्केटिंग' विषयात पदवी मिळवल्यावर परत बाहेर देशात नोकरी शोधण्यासाठी प्रयत्न सुरू केले. प्रथम काही महिने मस्कतमध्ये सेल्स इंजिनीअर म्हणून नोकरी केल्यावर दुबईतल्या एका चांगल्या कंपनीत नोकरी मिळाली. पण त्यांच्या व्हिएतनाम शाखेसाठी. व्हिएतनामचे नाव यापूर्वी ऐकले होते ते म्हणजे त्यांचे अमेरिकाबरोबर झालेल्या युद्धासंबंधी. नवीन देश, नवीन जबाबदारी. पण ते पेलण्याचे ठरवले व १९९० मध्ये 'सायगाव' साऊथ व्हिएतनामला रुजू झालो. इथे फार मोठा अडथळा होता तो म्हणजे भाषेचा, फार कमी लोकांना इंग्रजी भाषा बोलता येते. त्यामुळे मीटिंगला जाताना दुभाष्याचा लवाजमा बरोबर लागायचा. त्यात क्लायंट जर अजून दुसऱ्याच देशाचा असेल तर फारच मजा. म्हणजे आधी मी इंग्रजीत बोलणार मग मग माझी दुभाषी (व्हिएतनाम मध्ये मुख्यत्वे स्त्रियाच काम करतात) ते व्हिएतनामीज् भाषेत समोरच्या दुभाषीला सांगणार... ती क्लायंटला त्याच्या भाषेत (समजा कोरीअन) सांगणार... मग तो बोलणार... परत भाषांतर... मग माझी दुभाषी मला इंग्रजीत सांगणार. म्हणजे आमच्या संभाषणाला किती वेळ लागत असेल याची कल्पना आलीच असेल!

२००० साली अबुधाबी शाखेत ट्रान्सफर झाली. सगळीकडे कमी-अधिक प्रमाणात फॅमिली बरोबर होती. देश बदलताना नवीन व्हिसा बनवण्यासाठी त्यांना भारतात काही महिने परत जावे लागत होते. अबुधाबीत आल्यावर यू.ए.ई. देशाची ओळख होऊ लागली. इथले हवामान, स्थानिक लोक, त्यांची संस्कृती, कामानिमित्त विविध देशांतून आलेले लोक, इथले कायदे इ. या शहरात सेल्सचा चांगला अनुभव मिळाला.

२००३ साली अखेर दुबईतल्या एका चांगल्या कंपनीत नोकरी मिळाली. चांगले काम व मेहनतीचे फळ मिळत होते. जनरल मॅनेजर म्हणून बढती मिळाली. त्याच सुमारास स्वतःचा व्यवसाय सुरू करावा असे वाटू लागले होते. तशी पावले उचलायला सुरुवात पण झाली होती. त्यामुळे नोकरीतच राहावे (मुख्यत्वे बढती मिळाल्यावर) का व्यवसायात पडावे ही द्विधा मनःस्थिती होती. कंपनीच्या मालकाबरोबर चांगले संबंध होते. त्यामुळे त्याला या गोष्टीची कल्पना दिली. तुम्ही जर तुमच्या कामात चांगले असाल, प्रामाणिक असाल तर समोरची व्यक्ती पण तुम्हाला समजावून घेते आणि तसेच झाले. मालकाने नोकरी न सोडण्याचा सल्ला दिला; पण त्याबरोबर स्वतःचा व्यवसाय सुरू करायला पण परवानगी दिली.

माझ्यासारखेच दोन होतकरू तरुण होते ज्यांचे व्यवसाय सुरू करायचे स्वप्न होते. आम्ही तिघांनी मिळून २००६ मध्ये कमीत कमी भांडवलात व्यवसाय सुरू केला. यू.ए.ई. कायद्याप्रमाणे एक स्थानिक अरबी स्पॉन्सरर घेतला. एक छोटे ऑफिस भाड्याने घेऊन कमीत कमी स्टाफ घेतला व कामाची सुरुवात केली. जसजसा जम बसत गेला तसतशी आलेली मिळकत व्यवसायात गुंतवत गेलो. तिघांनी तीन डिपार्टमेंट्स वाटून घेतली होती. मी अर्थात सेल्स सांभाळत होतो. माझी मात्र नोकरी व व्यवसाय दोन्हीही सांभाळताना तारेवरची कसरत होत होती. पण तुम्हाला जर काही घडवायचे असेल तर तेवढे सोसावेच लागते. चार वर्षे ही कसरत केल्यावर २०१० साली नोकरी सोडून मी पूर्ण वेळ व्यवसायात पडलो.

धंद्यात जम बसतो न बसतो तोच २००८ साली जागतिक मंदी आली. जगातल्या सगळ्याच व्यवसायांना

त्याचा फटका बसला. मार्केटमध्ये नवीन जॉब्स् मिळवणे कठीण होते. यू.ए.ई.त येऊन मला आठ वर्षे झाली होती. विविध क्लायंट्स, कन्सल्टंट, सरकारी संस्था यांच्याशी कामानिमित्त संपर्क आला होता. सगळ्यांशी चांगले संबंध होते. त्यामुळे कंपनीला मंदीतही काही प्रतिथयश कंपन्यांची कामे मिळाली व ती चांगल्या प्रकारे पूर्ण केल्यामुळे कंपनी नावारूपाला आली.

दुबईत जम बसल्यानंतर हळूहळू दुसऱ्या देशांमध्ये कामे केली. आफ्रिका, अफगाणिस्तान, उझबेकीस्तान, ओमान इ. अफगाणिस्तानमध्ये काम करणे अतिशय जिकिरीचे होते. गेली अनेक वर्षे युद्धाच्या छायेत असणाऱ्या या देशात तुम्ही कसे काय काम करणार असा अनेकांना प्रश्न पडला. Helmand प्रांतात ब्रिटिश फोर्सेसच्या मिलिटरी बेससाठी काही स्टील बिल्डिंग्ज करून द्यायच्या होत्या. आमची टीम तिथे जाऊन पोहोचली. काम पूर्ण झाले. कामाची पाहणी करण्याकरता एकदा मी पण जाऊन आलो. त्या सफरीचा अनुभव मी कधीही विसरणार नाही. यू.ई.ए.तल्या Fujairah विमान-तळावरून एका कार्गो विमानाने कॅम्ब बॅस्टीन या मिलिटरी बेसकडे माझा प्रवास सुरू झाला. कार्गो विमान असल्याने बसण्याची व्यवस्था यथातथाच होती. बाकीही काही सोयी नव्हत्या. विमानात युक्रेन देशाचा crew होता. कॅम्पवर पोहोचल्यावर एका पोर्टा केबिनमध्ये राहण्याची सोय होती. रात्रभर Apachi हेलिकॉप्टर्सची ये-जा सुरू होती. काही मीटर अंतरावरच ही धावपट्टी असल्याने पोर्टा केबिन चांगलीच हादरायची. हवेमध्ये सतत सहा गनशिप असलेली हेलिकॉप्टर्स विशिष्ट उंचीवर उडत राहून २४ तास सभोवतालच्या परिसरावर लक्ष ठेवून संरक्षण पुरवायची. कडक सुरक्षा व्यवस्था होती. तरी पण त्या वातावरणात एक भीतीची लहर मनाला चाटून गेली.

ताश्कंद, उझबेकीस्तानमध्ये पण अतिशय प्रतिकूल (उणे २० तापमान) वातावरणात काम करून आम्ही 14000 sq.mt.ची कॉपर ट्यूब फॅक्टरीची उभारणी पूर्ण केली.

धंद्याचा पसारा वाढल्यानंतर ऑफिस मोठ्या जागी हलवले. आता सुमारे हजार लोकांची जबाबदारी आहे. महिन्याला पगार वेळेत झाले पाहिजे हे टेन्शन असते; पण त्याचबरोबर इतक्या जणांना आपण रोजीरोटी देऊ शकतो हे समाधानही मिळते. व्यवसाय म्हटला की कमी-जास्त होणारच. काहीना काही अडचणी येणारच. त्या सोडवताना त्रास निश्चितच होता.

व्यवसायासाठी लागणारे मुख्य गुण म्हणजे ध्येय, ध्यास, दूरदृष्टी, चिकाटी. याबरोबरच गरजेचे आहे ते म्हणजे योग्य माणसांची निवड. व्यवसाय हा एका माणसाचा खेळ नाही. तुमच्यात टीम स्पिरिट असणे फार गरजेचे आहे. सतत पुढच्या धोक्यांचा, जोखमीचा विचार करून योग्य ती पावले उचलणे गरजेचे असते. पगार, सप्लायर्सची देणी ही कुठल्याही परिस्थितीत द्यावीच लागतात. मग भले तुमचा क्लायंट तुम्हाला पेमेंट वेळेत देवो वा न देवो.


मराठी माणसाने धंद्यात पडायला पाहिजे. प्रामाणिक, मेहनती, भाषेवर प्रभुत्व-धंद्यासाठी लागणारे हे अनुकूल गुण मराठी माणसात उपजतच असतात. पण तरीसुद्धा धंद्यात पडायची भीती वाटते कारण चौकट सोडायची तयारी नसते. पिढ्यान् पिढ्या मराठी मध्यमवर्गाला महिन्याच्या शेवटी येणाऱ्या सुरक्षित पगाराच्या रकमेची सवय लागलेली असते. याउलट व्यवसायातील आर्थिक अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी मनाची मोठीच तयारी करावी लागते. या सगळ्या जोखमीचे फळ असते ते म्हणजे व्यावसायिक नफा. बाजारपेठेतल्या तेजी आणि मंदी या चक्रांमध्ये व्यावसायिक कधी कधी हतबलही होऊ शकतो. या सगळ्या प्रसंगात आपले मानसिक धैर्य राखून येणाऱ्या प्रसंगांना तोंड देण्याची तयारी हवी. यामुळेच व्यवसाय करताना तुमच्या अंगभूत गुणांचा खरा कस लागतो. नोकरीत असताना कंपनीसाठी वाट्टेल ते कष्ट घेण्याची आपली तयारी असते; पण हेच कष्ट स्वतःच्या व्यवसायासाठी उपयोगात आणले तर गगनभरारी मारता येते. जसे पाण्यात पोहण्यासाठी पहिली उडी मारताना पहिली भीती असते ती काढल्यावर मात्र आपण पोहण्याचा आनंद उपभोगू लागतो तसेच व्यवसायाचे. अगदी टाटा, बिर्ला, अंबानी यांच्याइतके यश मिळणार नाही; पण व्यवसायात उडी घ्यायला मराठी माणसाने धाडस केलेच पाहिजे.

कंपनीला आता नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या सगळ्या वाटचालीत वेगवेगळ्या देशातल्या व्यक्तींशी व्यवसायानिमित्त परिचय झाला व स्नेह जुळला, विविध महत्त्वाच्या प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळाली. दृष्टिकोन व्यापक, उदार झाला. हीच माझ्या आयुष्यातली सगळ्यात मोठी कमाई!

**- मिलिंद देशमुख**
okmilind@gmail.com

# रंगांची दुनिया...!

अजय म्हसकर



पुण्यात जन्मलेला आणि मुंबईत वाढलेला एक मराठमोळा तरुण मी! पार्ल्याच्या टिळक विद्यालयातून शालेय शिक्षण झाले. नंतर Mechanical Engineering मधील शिक्षण केले. त्याच सुमारास दिल्लीला जावे लागले. कारण वडिलांची दिल्लीला बदली झाली. त्यामुळे सर्व कुटुंबाने दिल्लीला प्रयाण केले. माझे वडील gazzetted ऑफिसर होते आणि CPWD मध्ये Electrical Engineer होते.

माझ्या करिअरची सुरुवात दिल्लीला नॉर्थ इंडियात झाली. सुमारे नऊ वर्षे मी नॉर्थ इंडियातील प्रसिद्ध अशा अनेक कंपन्यांचे मार्केटिंगचे काम केले, पण मन स्वस्थ बसत नव्हते. काहीतरी वेगळे करावे, यातून बाहेर पडावे असा विचार सारखा अस्वस्थ करत होता. असलेल्या नोकरीत मन लागत नव्हते. तिथे पुढे करिअरच्या दृष्टीने वाढ होईल असे काहीच दिसत नव्हते. आहे ती नोकरी सोडावी; पण पुढे काय हा प्रश्न मनाला सारखा भेडसावत होता.

१९७५/८० चा काळ होता तो. दुबईविषयी सर्वकडे जबरदस्त क्रेझ वाढत चालली होती. तिथे मिळणारा पैसा, त्यातून होणारे सेव्हिंग हे सर्वच मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या तरुणांना खुणावत होते. काहीतरी बदल तर नोकरीत हवा होता, पण दुबईला जावे की नाही अशा संभ्रमात मन होते.

मनाच्या या अशा दोलायमान अवस्थेत असतानाच माझा मित्र श्री. सतीश रेगे याने मला दुबईविषयी सुचवले. तो दुबईत नोकरीसाठी आधीच गेला होता. खरं म्हणजे त्या काळात दुबईविषयी बऱ्याच उलट-सुलट गोष्टी ऐकू येत होत्या. त्यामुळे दुबईला जायचे की नाही अशा द्विधा मनःस्थितीत बरीच लोकं असायची; पण मला या गोष्टीची काळजी करायचे काहीच कारण नव्हते. कारण माझा जिवलग मित्र स्वतः तिथे नोकरी करत होता, त्यानेच माझ्यासाठी जॉब शोधला होता त्यामुळे एजंट लोकं फसवतात वगैरेची मला काळजी नव्हती.

दुबईत श्री. विजय तलवार यांच्या Terrazo Tiles या कंपनीत मला नोकरी मिळाली. मुंबईला Nitco Tiles म्हणून जी कंपनी आहे, त्या कंपनीची Terrazo दुबईतील शाखा होती. मुंबईच्या शाखेत आम्हाला ट्रेनिंग दिले आणि वीस उमेदवारांपैकी दोन जणांची निवड केली. त्यांपैकी मी एक होतो. अशा प्रकारे १९७९ मध्ये आमची स्वारी पुणे-मुंबई-दिल्ली- असा प्रवार करत अखेर दुबईला येऊन स्थिरावली.



**लहानपणापासून रंगांच्या दुनियेत रममाण झालेला तरुण म्हणजेच अजय म्हसकर! जसजसा तो मोठा होत गेला तेहा त्याचे रंगांचे हे वेड एवढे वाढत गेले, की त्याने आपला व्यवसायही रंगांशी निगडित केला आणि परिश्रम व चिकाटी यांच्या बळावर दुबईतील व्यवसायात यशस्वी होऊन आपल्या जीवनातही सुंदर रंग भरले. आपल्या व्यवसायाची माहिती सांगताना तो म्हणतो–**

इथे मी सात वर्षे काम केले. या कंपनीची Trade House म्हणून एक sister company होती शारजाला. Trade House चे मालक होते अब्दुल रेहमान बुखातीर! ते शारजा क्रिकेट स्टेडियमचे मालक होते आणि शारजा international matches चे ते संस्थापक होते. शारजाच्या क्रिकेट मॅचेसमध्ये त्यांची बरीच गुंतवणूक होती. इंडियातील माझी क्रिकेट करिअर व येथे काही मॅचेसमध्ये मी दाखवलेले प्रावीण्य बघून मला Trade House मध्ये नोकरी मिळाली.

कालांतराने या कंपनीत मी राजीनामा दिला आणि international chain असलेल्या 'Cloisall' या लेबनीज कंपनीत paint division मध्ये contract manager म्हणून जॉब स्वीकारला. प्रसिद्ध Paint Manufacturers (UK, France आणि Japaneses Brands) यांची ही कंपनी एजंट होती. अशा प्रकारचे यूएईतील प्रसिद्ध प्रॉजेक्ट्स एकट्याने पूर्ण करायची मला संधी मिळाली आणि त्यामुळे माझ्यातील आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली आणि यातूनच माझ्या मनात विचार डोकावू लागला आणि स्फूर्ती मिळाली की आपण स्वतःची कंपनी का सुरू करू नये?

घरच्यांचा पाठिंबा आणि देवाची कृपा ह्यांच्या बळावर अखेर १९९१ मध्ये मी माझी स्वतःची 'Paintex Building Maintenance' या नावाची कंपनी सुरू केली. सुरुवातीला छोटेसे ऑफिस होते, मी स्वतःच कामे आणायचो आणि दुबईतच कामाला माणसे मिळायची, त्यांना घेऊन सुरुवात केली. हळूहळू कंपनी वाढू लागली. त्यानंतर construction projects ना maintenance द्यायला सुरुवात केली.

माझा हा जो व्यवसाय आहे तो पूर्णतः Engineering Consultants च्या पाठिंब्यावर आणि मान्यतेवर अवलंबून असतो. माझ्या सुदैवाने मला काही Maharashtrian Consultant भेटले. (आज दुबई मध्ये अनेक मराठी consultant आहेत आणि मराठी माणसाला ही खरोखर अभिमानाची गोष्ट आहे.) त्यांनी मला वेळोवेळी पाठिंबा दिला आणि मदत केली. त्यांच्या जॉबचे काम मला दिले. या सर्वांच्या नावांचा उल्लेख मला माझ्या लेखात करावाच लागेल कारण त्यांचा मिळालेला पाठिंबा मी कधीच विसरू शकत नाही. अशोक वर्तक, रमेश धस, अशोक पारकर, विलास रेगे, शशी लेले, अशोक कोरेगावकर, अजय सरण या सर्वांचे construction industry मध्ये आणि दुबईच्या प्रगतीमध्ये मोठे योगदान आहे. आज ऑफिसमध्ये पाच लोक आणि site वर २५ लोकं काम करतात. काही उल्लेखनीय प्रकल्प म्हणजे– Towers in Mankoul, Model Vilas in Arabian Ranches, Golf Course Resort, Raffels School in Jumairah, Winchester School, Indian School, Indian Club, Labour Camp in DIP इत्यादी अनेक प्रकल्प पूर्ण झाले.

दुबईत उद्योग करताना चांगले–वाईट दोन्ही अनुभव आले. माझा व्यवसाय पूर्णतः कामगारवर्गावर अवलंबून आहे. चांगले कामगार मिळवणे आणि ते टिकवणे हे कोणत्याही उद्योगाच्या वाढीसाठी अतिशय आवश्यक असते. पुण्यात मला दोन माणसे ओळखत होती. तिथे ती अगदी माझ्या हातापाया पडली की आम्हाला दुबईत घेऊन जा, तिथे नोकरी द्या. मी त्यांना दुबईत आणले. त्यांना ट्रेनिंग दिले. त्यांनी व्यवसायातील सर्व खाचाखोचा शिकून घेतल्या. दहा वर्षे माझ्याकडे काम केले आणि माझा व्यवसाय जेव्हा वाईट परिस्थितीला तोंड देत होता तेव्हाच त्यांनी नोकरी सोडली. कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना न देता. इतकेच नव्हे तर त्यातील एका supervisor ने दुबईत परत येऊन माझे clients आणि माझे workers घेऊन similar business सुरू केला. आपण ज्यांच्यावर विश्वास ठेवतो त्यांनीच



अशाप्रकारे पाठीत खंजीर खुपसला तर नक्कीच धक्का बसतो व खूप वाईटही वाटते. हे अशा प्रकारचे प्रसंग दुबईत अनेक कंपनीत घडतात.

दुबईत खूप चढ-उतार आले, आजही येत आहेत. २००८ मध्ये दुबईलाही जागतिक आर्थिक मंदीचा धक्का बसला, पण तरीही हे नक्की आहे की उत्तम उद्योगपती हा दुबईत यश आणि पैसा हे दोन्ही मिळवू शकतो. भारतीय माणसाच्या दृष्टीने दुबई हे location आणि place म्हणून लहान-मोठ्या उद्योगधंद्याच्या दृष्टीने सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. अर्थातच पूर्वीचे दुबईचे दिवस हे नक्कीच golden days म्हटले पाहिजेत. जसजशी दुबईची प्रगती झाली तसतशी दुबई बदलत गेली. येथील कायदेकानून, लोकसंख्या, महागाई इत्यादी प्रत्येक गोष्टीत खूपच फरक झाला आहे. दुबईत नोकरी करत असताना व आता स्वतःचा बिझनेस करत असताना मी अनेक गोष्टी शिकलो. वेगवेगळी लोकं, वेगवेगळ्या सिस्टीम्स, वेगवेगळे प्रॉब्लेम्स दररोज समोर येतात आणि त्याला हसतमुखाने तोंड द्यायचे. कोणतीही गोष्ट नवीन असली, कठीण असली तरी जीवनात कधीच हार मानू नका. चांगले असेल ते स्वीकारा व वाईट असेल त्याचा त्याग करा. जीवनातील चढ-उतारांना शांतपणे, धैर्याने सामोरे जा.

आज मागे वळून बघत असताना मला आनंद होतो व अभिमान वाटतो, की दुबईत येण्याचा माझा निर्णय योग्य होता. मी आज जो काही आहे तो भारताबाहेर पडल्यामुळेच! त्यामुळे माझे vision वाढले, आत्मविश्वास वाढला, जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला!

पण तरीसुद्धा मनाच्या एका खोल कप्प्यात कुठेतरी एक बोच जाणवते- देशापासून, आपल्या माणसांपासून, महाराष्ट्राच्या मातीपासून दूर आल्याची- जय नमो!


शेवटी काहीतरी कमावण्यासाठी काहीतरी गमवावे लागतेच ना?

**- अजय म्हसकर**
amhaskar60@hotmail.com





# इलेक्ट्रॉनिक विश्व



**सुनील सबनीस**




**मागे वळून बघताना गेल्या २०-२५ वर्षांत आजही आपण दुबईत आहोत याचे समाधान वाटते. उलट हाच देश माझ्या उन्नतीला कारणीभूत आहे. तेव्हा शेवटच्या श्वासापर्यंत इकडेच राहावे अशी इच्छा आहे. कारण खूप छान आणि विविध देशांतील माणसांना मी अतिशय जवळून भेटलो आणि त्यांच्यासाठी काम केले ह्याचा मला अभिमान वाटतो. खरोखर ह्या देशाने उत्कर्ष मिळवला तो शिस्तबद्ध राहिल्यानेच आणि आमच्याही अंगात तो आता चांगलाच मुरला आहे.**

''सदा सर्वदा देव सान्निध्य आहे,
कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।।''

हे समर्थांचे मनाचे श्लोक मी पूर्णपणे अनुभवले तो काळ होता १९८३-८४. मी सुनील सतीश सबनीस Dsc करून St. Xavier Institute मधून Radio Engineering चा Diploma घेतला आणि माझ्या मोठ्या भावाचे Vaishali TV Centre हे सारस्वत कॉलनीजवळचे दुकान सांभाळत उदरनिर्वाह चालू होता. मोठा भाऊ त्यावेळेस Qtar ला Sanyo कंपनीत Technician म्हणून कामासाठी परदेशी असे; पण खऱ्या अर्थाने Vaishali TV Centre नावारूपाला आणले ते मला जीव लावणारे माझे ग्राहक! अतिशय सुखासमाधानात आमचे चालू होते. परंतु भाऊबंदकी म्हणा अथवा प्रापंचिक संकटे! माझ्या भावाने नोकरी सोडून इथे आल्यावर मला दुकानातून बेदखल केले आणि तू तुझे वेगळे बघ म्हणाला, परंतु 'नुपेसी कधी राम दासाभिमानी' तद्वत माझ्या छोट्या भावाच्या मित्राने लगेचच अरे, तू दुबईला येतो का? Hotel Ambassader मध्ये Radio Technician ची Post मोकळी आहे अशी Offer दिली. तेव्हा मीही मागचे-पुढचे काहीही न पाहता ती स्वीकारली आणि १९८५च्या डिसेंबरमध्ये दुबईत दाखल झालो.

खरे तर स्वतःचा धंदा करणारा मी इकडे नोकरी



करताना जरा अवघडत होतो, पण माझे आणि लुल्ला कुटुंबीयांचे (HTL Ambassaderचे सर्वेसर्वा) ह्यांचे घरगुती संबंध असल्याने मला हळूहळू सवय होत गेली. त्यातच माझी बायको व मुलगा मला दुबईत आणण्यास लुल्या अंकलनी मदत केल्याने माझे बस्तान पुन्हा बसण्यास सुरुवात झाली. हॉटेलमध्ये बऱ्याचदा गुरुवार-शुक्रवार सत्संग असायचे आणि त्याचे नियोजन करताना पुष्कळ मोठमोठ्या दुबईतल्या Who's who ची ओळख झाली आणि त्यांच्या Villas मधून पण मी छोटी-मोठी Private कामे करू लागलो तीसुद्धा आमच्या लुल्ला अंकलच्या आग्रहावरूनच! हळूहळू अशा कामांची मागणी वाढू लागली. दुबईपण झपाट्याने वाढत होती. त्यातच Low Current Systems म्हणजे Cable TV Close Circuit Camera Installation, Public Address Systems, Intercom, Door Access Controls, Gate Barrier SMA TV अशा अनेक नवीन कामांची भर पडत गेली आणि लुल्ला अंकल स्वतः तू हे सर्व कर म्हणून प्रोत्साहन देत होते. जवळजवळ एक तप मी माझी नोकरी सांभाळून Privately हे जॉब संध्याकाळी करत असे. अर्थातच मला हॉटेलमधून लवकर निघण्याच्या सवलती मिळत होत्या नाहीतर हे शक्यच नव्हते. माझी पत्नी आणि मुलेही न कुरकुरता मला Weekendला कामाला जाऊ देत होती. त्यामुळेच हे Possible होत होते. अशातच श्री. पागरानी Emirates Contracting चे मालक ह्यांनी Partnership मध्ये धंदा काढू या का? असे विचारले आणि माझ्या आयुष्याचे चित्रच बदलले. त्यातच माझा मित्र श्री. विलास रेगे ह्यांनीसुद्धा त्याच्या कंपनीतील बरीच कामे मला देऊ केली आणि मग १९९६ साली माझी स्वतःची Vision Star Electronics नावारूपाला आली! धंदा करण्याचे बाळकडू घेतले होते त्यामुळे माणसे गोळा करणे, त्यांना बांधून ठेवणे मला फारसे जड गेले नाही, पण इथे प्रत्येकजण पैसे कमवायला आला असल्याने आज ना उद्या तो सोडून जाणार हे मात्र आजही मनाला बोचते. कारण मी प्रत्येकात emotionally गुंतून राहतो; तरीपण या वाळवंटात माझी छोटी कंपनी दुबईच्या प्रगतीची भागीदार आहे याचा मला आनंद आहे.

२००८-२००९ मध्ये दुबईला मोठ्या आर्थिक संकटाने घेरले व प्रॉपर्टी मार्केट एकदम घसरले. त्याचे चटके सर्वांनाच लागले; पण मी सहीसलामत राहिलो याचे सारे श्रेय माझे Clients आणि परमेश्वरालाच देतो. गेली २० वर्षे माझ्या प्रत्येक अडीअडचणीत मला समजून पाठबळ देणारा माझ्या वडिलांसारखा माझा लोकल पार्टनर Mr. Rashid Modh. हा तर माझा मोठा आधारस्तंभच आहे. आता मागे वळून बघताना गेल्या २०-२५ वर्षांत आजही आपण दुबईत आहोत याचे समाधान वाटते. उलट हाच देश माझ्या उन्नतीला कारणीभूत आहे. तेव्हा शेवटच्या श्वासापर्यंत इकडेच राहावे अशी इच्छा आहे. कारण खूप छान आणि विविध देशांतील माणसांना मी अतिशय जवळून भेटलो आणि त्यांच्यासाठी काम केले याचा मला अभिमान वाटतो. खरोखर या देशाने उत्कर्ष मिळवला तो शिस्तबद्ध राहिल्यानेच आणि आमच्याही अंगात तो आता चांगलाच मुरला आहे. चांगली-वाईट अशी दोन्ही माणसे पाहिली आणि शिकत गेलो, पण काही माणसे आणि कंपनी ज्यांच्यामुळे मी आज आहे ती काही नावे खाली नमूद करतो ते केवळ उपकारासाठी नाही तर त्यांच्याबद्दल मला वाटणाऱ्या गर्वासाठी! पुढच्या काळात Home Automation चे युग येईल त्यातही माझी छोटीशी कंपनी चमकती चांदणी राहावी हीच त्या परमेश्वराकडे विनम्र विनंती.

जयहिंद ! जय महाराष्ट्र ! जय दुबई !

VSE Prestigians Clients & Companies

1. SH. MAKTOMS VILLA & FARM HOUSE (SMATV & PA SYS)
2. DUTCO. GRP. OF CO. PROJECTS AND OWN MR. OTHMAN BEL SAHALATS VILLA.
3. MR. ARIF AC NAQUIS VILLA PROJECT AUTOMOBILES.
4. ALNABOUDA AUTOMOBILES SHOWRROM & CEO MR. RAJARAM'S VILLA.
5. LATE SIR MORRIS FLANAGNN'S VILLA.
6. DXB A/PORT CARGO TERMINAL BLDG.
7. SH. MAKTUOM INT'S A/PORT.
8. MANYAVAR SHOWROOM.
9. OPTION RESTAURANT.
10. DXB SEAFARES CENTRE.
11. ARABTECH GRD. OF CO.
12. JUMEIRA BEACH CLUB - MEXICAN REST. 'ALMEO'.
13. BIN DASMAL GRP.
14. MEMBAR CONTRACTING.
15. ALARIF CONTRACTING.

- सुनील सबनीस
ssabnis@gmail.com




# Eventful दुबई

विवेक कोल्हटकर / मानसी खरे

दुबई एक लहान देश; पण आज जगभरात दुबई माहीत नाही असे खचितच कोणी सापडेल.


येथे काही पिकत नाही व काही बनत नाही तरीदेखील जगातील महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये अग्रगण्य अशी गणना होते. ही प्रगती दुबईने अवघ्या काही वर्षांत साधलेली आहे. दुबईचे यश हेच एक जागतिक आश्चर्य आहे.

हे कसे शक्य झाले? या देशाचे वर्णन 'मोस्ट हॅपनिंग प्लेस इन द वर्ल्ड' असे करतात. अक्षरशः वर्षातील ३६५ दिवस येथे काहीना काही प्रकारचे इव्हेण्ट्स चालू असतात असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

बरीच वर्षे दुबईत वास्तव्य असलेल्या आमच्या सर्वांच्या रक्तातच इव्हेण्ट कल्चर भिनलेले आहे, पाण्याचा गुण म्हणा हवं तर. या अशा दुबईनामक आश्चर्याला साक्षी ठेवून ग्यालोप इव्हेण्ट्सचा जन्म झाला. Inovate Differnciate & Communicate ही आमची tagline आहे. 'गरज ओळखा गरज पुरवा' हे सूत्र धरून 'PAGE TO STAGE' अशी कामाची पद्धत.

दिवाळी/पाडवा यांसारखे पारंपरिक उत्सव, राष्ट्रीय उत्सव, इंग्लिश/हिंग्लिश नाटके/मराठी सिनेमा, Bollywood Entertainment Programme, शास्त्रीय संगीताच्या मैफली, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नृत्याविष्कार, Trade Exhibitions, Corporate Training Programme, कला-क्रीडा स्पर्धा, थीम पार्टीज अशा विविध प्रकारच्या इव्हेण्ट्सचे आयोजन आतापर्यंत ग्यालोपने केले आहे .

भारताचा राष्ट्रीय उत्सव 'मिले सूर मेरा तुम्हारा' या शीर्षकाखाली विविध संकल्पना घेऊन साजरा करतो . यावर्षीची संकल्पना होती Independence To Interdependence. अक्षरशः दुबईच्या whose who यांच्या उपस्थितीत आपल्या बांधवांच्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे





**मानसी खरे**
**Director**

**दिवाळी/पाडवा यांसारखे पारंपारिक उत्सव, राष्ट्रीय उत्सव, इंग्लिश/हिंग्लिश नाटके/मराठी सिनेमा, Bollywood Entertainment Programme, शास्त्रीय संगीताच्या मैफली, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नृत्याविष्कार, Trade Exibitions, Corporate Training Programme, कला-क्रीडा स्पर्धा, थीम पार्टीज अशा विविध प्रकारच्या इव्हेण्ट्सचे आयोजन आतापर्यंत ग्यालोपने केले आहे .**



**विवेक कोल्हटकर**
**Creative advisor**

ओसंडून वाहणारे प्रेक्षागृह असे चित्र होते .

कार्यक्रमाची संकल्पना व सादरीकरण यावर खूश होऊन येथील दूतावासनी भारताचे लोकप्रिय माननीय पंतप्रधान श्री. मोदी यांच्या UAE येथील भेटीत सादर केलेल्या 'Welcome मोदीजी'मध्ये Mile Sur mera Tumhara या कार्यक्रमातील काही भाग सादर करण्याचा सन्मान आम्हाला दिला. आमच्या eventsच्या कार्यकीर्दीतील हा अत्युच्य आनंदाचा क्षण होता.

'Winning Way With Harsha & Anita Bhogle' आणि 'लोकमान्य' या चित्रपटाचे सादरीकरण हेदेखील या वर्षातील मनाचे तुरे ठरले.

अर्थात या प्रवासात बरेच काही शिकलो, शिकतो आहे. सर्वात मोठी शिकवण म्हणजे if anything can go wrong then it will हे धरून अथपासून इथंपर्यंत नियोजन व plan A / B / C रेडी ठेवणे. माणसे चुकून व मशीन बंद पडून अनेक वेळा बाका प्रसंग निर्माण झाले होते.

एका कार्यक्रमातील कलाकारांना हॉटेलवरून हॉलमध्ये आणण्यासाठी हॉटेलची खास स्पेशल लिमोसिन ठरविली होती. निघाले वेळेवर. पण गाडीचा चालक नवखा होता, रस्ता चुकला. आम्ही कलाकारांची हॉलवर वाट पाहतो आहे आणि हा रस्ता शोधत घिरट्या घालतो आहे. अनुभवाने आयत्या वेळेच्या निर्माण झालेल्या समस्यांसाठी आम्ही एक



spare गाडी व येथील संपूर्ण माहिती असलेला चालक तयार ठेवतो ते कामाला आले आमच्या. चालकाने हॉटेलच्या driverला सांगितले... आहे तिथेच थांब. चालकाने कलाकारांना उशिरा का होईना हॉलवर आणले. अर्थात तो पर्यंत सत्कार व आयोजकांची ओळख असा कार्यक्रम आम्ही उरकून घेतला. कलाकार गाडीतून सरळ स्टेजवर आले.

एका वादकाची अनोखी रीत– कुंकू लावल्याशिवाय स्टेजवर प्रवेश करीत नाही. आयत्यावेळी कुंकू शोधणे... मेकअपमधली कलर पावडर कुंकू म्हणून वापरली.

एका प्रमुख पाहुण्यांना कामामुळे उशीर झाला. सभागृह गच्च भरलेले. बाका प्रसंग. आमच्या निवेदिकेने आयोजकांच्या मदतीने एवढे सांभाळून घेतले व कार्यक्रम सुरू केला. अर्ध्या तासाने प्रमुख पाहुणे आले, निवेदिकेने त्यांचा सहभाग इतक्या छानपणे करून घेतला की कोणाच्याही लक्षात आले नाही.

एक little champs यांचा गाण्याचा कार्यक्रम होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्याची प्रथा आहे. येथे कडक कायद्याप्रमाणे काड्यापेटी स्टेजवर आणून देत नाहीत. मोठ्या प्रयत्नाने परवानगी घेतली. पण आयत्यावेळी अवेळी आलेल्या पावसाने सर्द झालेल्या काड्यापेटीने दगा दिला. पाहुणे स्टेजवर. पण काड्यापेटी पेटेना. प्रेक्षकांनी उडालेल्या भंबेरीची मजा घेतली. एक आवाजदेखील आला, अहो! लवकर दीपप्रज्वलन करा. नाहीतर little champs मोठे होतील. मग काय आयत्यावेळी निवेदकाने मार्ग काढला, हॉलचे लाईट बंद केले व क्षणात लावले, जाहीर केले की दीपप्रज्वलन संपूर्ण हॉलमध्ये दिवे लावून केले आहे. कलाकार मुलेही तयार होती. त्यांनी पडद्याआडून 'दिवे लागले रे, दिवे लागले' या प्रसिद्ध गीताच्या ओळी आळवल्या. प्रेक्षकगृहात एकदम हास्यस्फोट झाला व अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम सुरू झाला.

म्हणतात ना 'Do whatever you can but show must go on man'.

जितके प्रगत तंत्रज्ञान तितका धोका जास्त. माइक/laptop/system धोका देतात तेव्हा ३/३ back up व alternative plan तयार ठेवावा लागतो.

दुबईमध्ये आज एवढी स्पर्धा व आकर्षणे आहेत की आपला स्वतःचा असा प्रेक्षक वर्ग निर्माण करणे, टिकवणे व वाढवणे ही एक मोठी परीक्षा आहे. म्हणूनच गरज ओळखा व ती उत्तम रीतीने पुरवा हा एकच उपाय आहे व तो innovate, differentiate & communicate या तीनही सूत्रांचा अवलंब करून प्रत्येक कार्यक्रम हा एक उत्तम अनुभव देण्याचा प्रयत्न आम्ही करतो आणि त्यामुळेच प्रेक्षकांचा सतत पाठिंबा मिळाला आहे.

Meet Greet / lucky draw / रंजक प्रश्नोत्तरे अशा वेगवेगळ्या नावीन्यपूर्ण संकल्पना राबवून प्रायोजकांना अपेक्षित असलेला प्रतिसाद अर्थात footfall/वाढती चौकशी/visibility सारख्या मोजपट्टीवर आम्ही खरे उतरलो आहोत आणि प्रतिसाद वाढविण्यासाठी आम्ही social mediaचा कौशल्याने वापर करून घेतो.

अर्थात परमेश्वराचे आशीर्वाद व GALLOP मित्र परिवार, प्रायोजक आणि मायबाप प्रेक्षक यांचे उदंड प्रेम याच ताकदीवर GALLOP ची घोडदौड सुरू आहे.

विनंती हीच लोभ आहेच. तो राहावा व वाढवा.

**– प्रसाद खरे**
khareprasad@yahoo.com



# ऋणानुबंध
# अरबी आणि मराठी भाषेचे

श्रीपाद गोखले



**दुबई येथे २०१० मध्ये संपन्न झालेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनात श्री. श्रीपाद गोखले यांनी केलेले भाषण.**

आपणा सर्वांचे माझ्यातर्फे दुबईमध्ये पुन्हा एकदा स्वागत म्हणजेच अरबी भाषेत 'अहलन वसहलन. नुरहीन बिकुम.' माझे नाव श्रीपाद गोखले. १९६२ साली मी इंजिनीअर झालो व सहा महिन्यांत दुबईत आलो. ग.दि. माडगुळकरांचे 'जो आला तो रमला' हे शब्द दुबईच्या अगदी यथार्थ आहेत. माझेच पहा ना. ४८ वर्षे दुबईत घालविल्यानंतरही भारतात परत जाण्याचा माझा पत्ता नाही.

एक छंद म्हणून मी अरबी भाषेचा गेली अनेक वर्षे अभ्यास केला आहे. पण अरबी भाषेचा तज्ज्ञ-विज्ज्ञ असण्याचा माझा अजिबात दावा नाही. दावा हा शब्द मुद्दाम वापरला, कारण मुळात हा शब्द अरबी आहे. असे शेकडो अरबी शब्द मराठीत सौख्यभरे नांदत आहेत, पण यासंबंधी अधिक विस्ताराने नंतर बोलूया.

साहित्य व भाषा हे तुम्हा सर्वांचे जिव्हाळ्याचे विषय आहेत. त्यामुळे या अरब देशात आल्यानंतर ही अरबी भाषा कशी असेल, तिची जडणघडण कशी असेल याबद्दल तुम्हाला नक्कीच जिज्ञासा असेल. आणि म्हणूनच मराठी भाषेच्या पार्श्वभूमीवर अरबी भाषेची काय वैशिष्ट्ये आहेत याची ओळख करून देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. अर्थात वेळेचे बंधन आहेच.

सर्वप्रथम सांगितले पाहिजे की अरबी ही अतिशय प्राचीन व समृद्ध अशी भाषा आहे. ख्रिस्तपूर्व काळापासून अरबी भाषेत महत्त्वपूर्ण लिखाण झाले आहे. अरबीत प्रचंड शब्दसंपत्ती आहे. जगातल्या २१ देशांत ही भाषा बोलली जाते. जगात मराठी बोलणारे सुमारे १० कोटी लोकं आहेत त्याउलट ३४ कोटी लोकं अरबी भाषा बोलतात. संयुक्त राष्ट्र संघाच्या ज्या सहा अधिकृत भाषा आहेत त्यात अरबी एक आहे.

मराठी ही Indo European समुदायातली एक भाषा आहे. अरबी भाषा ही Semitic भाषेचा जो गट आहे त्याचा भाग आहे. ज्यू लोकांची हिब्रू भाषा ही याच गटातील. त्यामुळे अरबी भाषेतील व्याकरणाचे नियम, वाक्यरचना ही मराठी पेक्षा एकदम निराळी आहे. एक छोटेसे उदाहरण देतो- आपण मराठीत म्हणतो मी पुस्तके वाचले... म्हणजे आधी कर्ता, मग कर्म व नंतर क्रियापद असा क्रम असतो. अरबीत हाच क्रम उलट असतो. ...वाचले मी पुस्तक असा असतो. अर्थात मराठीतसुद्धा वाचले मी पुस्तक असे म्हटले तरी अर्थ लक्षात येईल, पण कानाला ते बरे वाटत नाही.

मराठीत आपण जोडाक्षरे वापरतो, पण अरबीत आपल्या उत्तर भारतीयांप्रमाणे जोडाक्षरे नाहीत. मराठीत

३७ मूळाक्षरे आहेत तशी अरबीत २८ मूळाक्षरे आहेत. पण अरबी भाषेचा उगमच वेगळा असल्यामुळे त्यातील बरीच मूळाक्षरे मराठीत नाहीत.

मराठीत दोन 'श' आहेत. एक शहामृगातला व दुसरा बाबूजी म्हणजे सुधीर फडके यांचा आवडता पोटफोड्या 'ष'! त्याचप्रमाणे अरबीत दोन 'ह' आहेत. एक साधा व दुसरा मुहम्मदमधील ह! त्याचप्रमाणे दोन 'क', दोन 'स' आहेत. 'द'च्या जवळपास असणारी तीन अक्षरे आहेत. एक दौतीतला द, दुसरा इंग्रजीतला द आणि तिसरा द हा जगातील इतर कोणत्याही भाषेतील. 'द' या उच्चाराचे कोणतेही मूळाक्षर नाही म्हणून अरबी लोकं याला अभिमानाने दादचे पुत्र असे म्हणतात. या दुहेरी किंवा तिहेरी उच्चारांची अदलाबदल झाली तर अर्थाचा अनर्थ होऊ शकतो. उदाहरणार्थ रकद म्हणजे तो स्तब्ध राहिला, रकद म्हणजे तो झोपला, रकद म्हणजे तो धावत होता.

मराठीमध्ये बाराखडी ही १२ स्वरांची असते. उदाहरणार्थ, 'क'ची बाराखडी... क का कि की कु कू के कै को कौ कं कः अरे वा मला बाराखडी आली की! अरबीत मात्र बाराखडीच्या ऐवजी नऊ खडी असते. कारण अरबीत के को कः हे उच्चार अजिबात नाहीत. इतर भाषेतील के किंवा ने असे लिहायचे झाले तर ते की किंवा नी असे लिहिले जातात. तसेच 'को नो' हे 'कू नू' असे लिहावे लागतात. कारण ए व ओ हे उच्चारच अरबीत नाहीत. आणखी एक विस्मयाची गोष्ट म्हणजे प आणि ग ही अक्षरे अरबीत नाहीत. म्हणून आपला 'प' हा 'ब' होतो व 'ग' हा 'क' होतो.

या सर्व विवेचनावरून तुमच्या लक्षात येईल की जेव्हा परकीय भाषेतील नवे शब्द जेव्हा अरबीत लिहावे लागतात, उदाहरणार्थ, visiting cards वर तेव्हा त्यात आश्चर्यकारक बदल होतात. मगाशी सांगितल्याप्रमाणे ए व ओ हे उच्चार अरबीत नाहीत आणि मराठीत तर एकारांत नावांचा सुळसुळाट आहे. एक उदाहरण तुमच्या समोरच आहे. माझे नाव अरबीत लिहायचे झाले तर त्याची उपपत्ती येणेप्रमाणे... गचा क झाला, को नसल्यामुळे त्याचा कू झाला, ख तसाच राहिला, लेचा ली झाला. म्हणजे फार पूर्वी जसा धचा मा झाला होता तसे. माझे नाव अरबीत कुरवली असे लिहावे लागेल. जमेची बाजू एवढीच की गोखले या नावाला मराठीत काही अर्थ नाही. पण माझे अरबी नाव अर्थपूर्ण आहे. कुरवली म्हणजे अरबीत 'माझी झोपडी'! गणपती बाप्पाचे नाव अरबीत कनबती बाप्पा असे होईल. Prescott या इंग्रजी माणसाच्या नावाची बरीसकुत एवढी दुर्दशा होईल.

मराठी भाषेतील कठीण व्यंजने ट ठ ड ढ ण ही अरबीत नाहीत. त्यामुळे हातोडीचा आवाज आपल्याला ठक ठक वाटतो तोच अरबी माणसाला ताख्व ताख्व असा येईल.

अरबी आणि मराठीत एक मूलभूत फरक आहे. जर लक्ष देऊन ऐकलंत तर फार अजब प्रकार आहे. समजा एखाद्या अमराठी माणसाला तुम्ही मूळाक्षरांचे उच्चार व देवनागरी लिपी शिकवलीत तर अमराठी माणूस तो मजकूर अस्खलितपणे वाचू शकेल; पण त्याला अर्थ समजणार नाही.

अरबी भाषेमध्ये अ इ उ हे ऱ्हस्व स्वर न लिहिण्याचा प्रघात आहे. वास्तविक या ऱ्हस्व स्वरांसाठी त्यांच्या भाषेत फतहा, कसरा व दम्मा अशी चिन्हे आहेत. पण ही चिन्हे प्राथमिक शाळेच्या पुस्तकाशिवाय कुठेही वर्तमानपत्र, मासिके इथे वापरली जात नाहीत. याचा अर्थ तो अरबी मजकूर वाचण्यासाठी त्या मजकुराचा अर्थ संदर्भावरून माहीत असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, कल्पना करू या की इजिप्तमधल्या एका गावात एक अरबी माणूस राहतो; पण त्याने दुबई हे नाव कधीही ऐकलेले नाही, दुबई काळी की गोरी हे त्याला माहीत नाही, अशा माणसाला दुबई हे नाव शहरात सर्वत्र जसे लिहिले जाते तसे, त्याची मातृभाषा अरबी असून, त्याला ती लिहिता-वाचता येत असूनही, ऱ्हस्व स्वर नसल्यामुळे दुबई हा शब्द दुबी, दबि, दीबी, दबाई असा होईल. त्यामुळे नक्की काय शब्द हे त्याला ठरवता येणार नाही.

मराठी ही पानाच्या डावीकडून उजवीकडे लिहिली जाते याउलट अरबी ही उर्दू, फारसी, सिंधी या भाषांप्रमाणे उजवीकडून डावीकडे लिहिली जाते. तुम्ही म्हणाल हे आम्हाला माहीत आहे, त्यात नवीन काय? तर नवीन असे आहे की लिहिताना एखादी संख्या मध्ये आली तर ती मात्र मराठी प्रमाणेच डावीकडून उजवीकडे लिहिली जाते.

अर्थातच ही पद्धत सोयीस्कर नाही कारण मधेच संख्या आली तर अंदाजाने किती जागा लागेल याचा विचार करून लिहावे लागते. कमी जागा असेल तर जागा अपुरी पडते व जास्त जागा असेल तर ती मोकळी राहते. परत संख्या संपली की उजवीकडून डावीकडे मजकूर

लिहायचा. ही अशी तर्क विसंगत पद्धत का आली या विषयी माझे अनुमान असे आहे की जगात आतापर्यंत जे मोठे शोध लागले त्यापैकी शून्य व दशांक पद्धतीचा शोध अग्रगण्य आहे. हा शोध भारतात लागला. अरब लोकांनी आत्मसात केला व जगभर प्रसार झाला. ही पद्धत त्यावेळी त्यांना एवढी धक्कादायक व विस्मयकारक वाटली असावी की लिपीच्या नियमानुसार त्यात काहीही फेरफार न करता त्यांनी ती जशीच्या तशी उचलली असावी. त्यामुळे संख्या देवनागरी लिपीनुसार डावीकडून उजवीकडे लिहिल्या जातात.

दुबईत बऱ्याच वर्षांपूर्वी पु.ल. देशपांडे आले होते. बोलता बोलता ते मला म्हणाले की मला दोन अरबी शब्द येतात ते Alcohol आणि Algebra. वास्तविक अरबी शब्द आहेत– कलह आणि जिबर! पण त्यांचे इंग्रजीकरण करताना उगीच AL हा प्रत्यय लावला गेला. इंग्रजीत THE म्हणजे अरबीत El! यावर पु.ल. म्हणाले की या शब्दाचा अर्थ अल्कोहोल content म्हणजे काहूल एवढाच आहे. हा अल शब्द आडनावाच्या मागे लावला जातो. उदाहरणार्थ, दुबईच्या राज्यकर्त्यांचे नाव अल मक्तुम, अबुधाबीच्या अल नाहियान, शारजाच्या अल कासिमी! माझे आहे अल कुरवली!

आधी उल्लेख केल्याप्रमाणे शेकडो अरबी शब्द आपण मराठीत सहजतेने वापरतो. ते आपल्या एवढे अंगवळणी पडले आहेत की ते अरबी शब्द आहेत हे आपल्याला माहीतच नाही. आता प्रश्न पडतो की हे शब्द अरबीतून मराठीत आले की मराठीतून अरबीत? असे निश्चितपणे म्हणता येईल की हे बहुतेक शब्द अरबीतून मराठीत आले असावेत. याचा पुरावा म्हणजे ते मराठीत एकांड्या शिलेदाराप्रमाणे अलिप्त आहेत. पण अरबीत त्याच शब्दांची नाम विशेषणं, क्रिया विशेषणं अशी अनेक रूपे पाहायला मिळतात. उदाहरणार्थ, करार हा शब्द आपण मराठीत नेहमी वापरतो; पण त्याला आगापिछा नाही. पण अरबी भाषेत कुरर, युर्की, मुकिर्रर, मुकरर व करार अशी कुंडली मांडलेली आहे.

हे शब्द मराठीत कसे आले? ते हिंदी व मराठी यांच्या माध्यमातून आले असावेत किंवा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर अरबी लोकांची व्यापाराच्या निमित्ताने वर्दळ होती. त्यामुळे काही शब्द थेट अरबीतून मराठीत आले असणार. कोकणात घोंगडीला बुरणूस म्हणतात व वातीच्या दिव्याला कंदील म्हणतात. हे दोन्ही शब्द अरबी आहेत. मराठीत आणि या अर्थी 'व' हा शब्द वापरतो. अरबीत पण 'व' हा शब्द वापरतात. पण हिंदी उर्दू मध्ये या शब्दांचा वापर नाही म्हणून माझ्या विधानाला पुष्टी मिळते.


पूर्वीच्या काळी दुभाषी लोकं भाषांतर करताना कल्पना–शक्तीचा भरपूर वापर करत असावेत. त्यामुळे शब्दाचा मूळ भाषेतील अर्थ बाजूला राहून दुसराच अर्थ रूढ होऊ शकतो. उदाहरणार्थ, सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता Plato म्हणून होऊन गेला. त्याचे अरबी भाषेत नाव 'अफलातून' असे होते. पण मराठीत या शब्दाचा अर्थ काहीतरी वेगळे, लोकविलक्षण असे दिसले तर आपण वापरतो.

अरबीत खरिफ व रब्बी ही दोन हेमंत व वसंत ऋतूंची नावे आहेत. पण मराठीत ही नावे पिकांच्या संदर्भात आहेत. एखादा माणूस कामात गर्क आहे असे आपण म्हणतो. अरबी शब्द 'घरिक' म्हणजे बुडालेला यावरून हा आला असावा.

वर्मावर बोट ठेवणे हा आपल्याकडे वाक्प्रचार आहे. अरबीमध्ये वरम म्हणजे– सूज किंवा दुखापत! किमया हा रसायनशास्त्र म्हणजे काहीतरी अद्भुत बनवणारे शास्त्र असा होता. मराठीत व्रात्य मुलाला काय इब्लिस कार्टे आहे असे म्हणतो. मराठीत इब्लिस म्हणजे सैतान! मराठीत एखाद्याला वाली उरला नाही असे म्हणतो, तर अरबीत वाली म्हणजे प्रांताधिकारी! जेवढा अधिक सखोल विचार करावा तेवढे अधिक दुवे लक्षात येतात. उदाहरणार्थ, भूमिती व इंजीनिअरिंग. या दोन्ही शब्दांदा अरबीत हंटसा म्हणतात. हिंद म्हणजे भारत हा या शब्दांचा उगम आहे आणि ऐतिहासिक विषयात भारत केवढा प्रगत होता याची पावतीच आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे अरबी व मराठी या दोन्ही भाषांचा उगम जरी वेगवेगळा असला तरी दोन्ही भाषांचा संपर्क खूप आला आणि त्या समृद्ध झाल्या. हे ऋणानुबंध आपण जपले पाहिजेत.

जाता जाता एक नम्र सूचना– एखाद्या अरबी माणसाने तुम्हाला थोर म्हटले तरी हुरळून जाऊ नका. कारण अरबीत थोर म्हणजे शाब्दिक व लाक्षणिक या दोन्ही अर्थांनी– ''बैलोबा''!

– श्रीपाद गोखले
manage@emirates.net.ae





# स्थित्यंतरे


**प्रशांत कुलकर्णी**



**दुबईचे जीवन हे लंबकाप्रमाणे दोलायमान आहे. लपत-छपत, चोरून पूजापाठ करण्यापासून ते सरकारकडून मंदिरासाठी जागा मिळविण्यापर्यंतचा प्रवास वर्णन केला आहे प्रशांत कुलकर्णी यांनी...!**

दुबईतले स्पोर्ट्स स्टेडियम खचाखच भरले होते. जिकडे-तिकडे उत्साहाच्या वातावरणात तिरंगा लहरत होता. भारतातील सर्व प्रांतांतील, सर्व धर्मातील व सर्व वर्गातले लोक पंतप्रधानांच्या भाषणाच्या प्रतिक्षेत प्रथमच एकत्र आले होते. या स्टेडियमला क्रिकेटच्या सामन्या व्यतिरिक्त अशी गर्दी पाहायची सवय नाही आहे अन् राजकीय पुढाऱ्यांच्या भाषणासाठी तर मुळीच नाही.

मुळात इथे अशी राजकीय पार्टीच नाही. इथे आहे ती वंशपरागत चालत आलेली राजेशाही. पण इथल्या राजाने अशा सार्वजनिक सभेत भाषण केल्याचे ऐकिवात नाही. इतर प्रसंगी संवाद साधला जातो. भाषण केले जाते. पण त्याला राजकीय स्वरूप फार क्वचितच दिले जाते. निवडणुका नाही त्यामुळे विरोधी पक्षच नाही. विरोधकांवर टीका करायची संधी पण नाही. त्यामुळे एका देशाच्या पंतप्रधानांचे भाषण ऐकायला एव्हढी गर्दी होऊ शकते यावर इथल्या नागरिकांना पण आश्चर्य वाटत असावे. पंतप्रधानांचे भाषण रंगत असतानाच त्यांनी भाषणात अबुधाबीच्या राजाचे मनापासून आभार मानले व घोषणा केली की, अबुधाबीच्या राजाने भारतीय



समाजाला मंदिर बांधण्यासाठी जमीन देण्याची तयारी दर्शवली आहे. ही बातमी ऐकताच ह्यावेळी स्टेडियम मध्ये उपस्थित असलेल्या, टी.व्ही.वरून त्यांचे भाषण ऐकत असलेल्या संयुक्त अरब अमिरातील हजारो भारतीयांच्या आनंदाला उधाण आले, ऊर भरून आला. सकाळपासून सोशल मीडियावर जी बातमी वाऱ्यासारखी पसरत होती ती कन्फर्म झाली. या देशाच्या बाहेर असणाऱ्या भारतीयांना कदाचित या बातमीचे अप्रूप वाटणार नाही. पण गेली चार–पाच दशकं इथे राहणाऱ्या भारतीयांना मात्र या बातमीने समाधानाची एक लहर येऊन गेली.

मंरिदाची घोषणा होत असतानाच मी मात्र दुपारपासून भारतीय टीव्ही चॅनेल वर तावातावाने चाललेली चर्चा साठवत होतो. सर्वच राजकीय पार्ट्यांचे प्रतिनिधी त्वेषाने एकमेकांवर तुटून पडले होते. त्यांना विषयच चॅनेलनी तसा पुरवला होता. एखादा मांसांचा तुकडा कुत्र्यापुढे टाकल्यावर त्यांच्यात त्याचा लचका तोडण्यासाठी जी स्पर्धा होते तसे दिसत होते. विषय होता 'पंतप्रधानांची अबुधाबीतील Shaikh Zayed Mosque ला दिलेली भेट.

या विषयावर एवढे तावातावाने बोलण्यासारखे काय आहे? असे माझ्यासारख्या गेली पाव शतक अबुधाबीत काढलेल्या परदेशस्थ भारतीयाच्या मनात येणे साहजिकच होते. अबुधाबीतील दर्शनीय स्थळांमध्ये या Mosque च्या दर्शनासाठी येतात. आम्ही आतापर्यंत कैक वेळा आमच्या इथे येणाऱ्या पाहुण्यांबरोबर तिथे गेलो आहे. त्यावेळी या Mosque चे सौंदर्य अनुभवताना कधीही असा विचार मनाला शिवला नाही की ही मस्जीद आपल्या धर्माची नाही. किंबहुना तिथे येणाऱ्या टुरिस्टच्या मनात देखील अशा विचाराचा स्पर्श होत नसेल. (ताजमहाल बघताना येतात का आपल्या मनात असले विचार?)

मग आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी या ठिकाणाला भेट दिल्यावर एवढा गहजब का? हा विचार माझ्या सारख्या इथे राहणाऱ्या अनेक भारतीयांच्या मनात विचारांचे काहूर माजवून गेला. चर्चेत दडलेले राजकारण समजत होते नाही असे नाही. पण या राजकारणाने आपल्या देशाच्या प्रधानमंत्र्यांची परदेशातील प्रतिमा मलीन होत आहे याचे भानच या पक्ष प्रतिनिधींना राहिले नव्हते. धर्मावरून चाललेली चर्चा रंगात आली असताना माझे मन मात्र भूतकाळात शिरले होते.

फार मागे जायची गरज नव्हती. इंटरनेटचा जमाना सुरू होण्यापूर्वी किंवा टेलिव्हीजनवर रोजच्या मालिकांमध्ये रमबाण होण्याची सवय लागण्यापूर्वीचे दिवस होते ते.

दुबई–अबुधाबीत रोजचे वर्तमानपत्र मटा–लोकसत्ता वगैरे दुपारी एक वाजेपर्यंत मिळायचे व आठवड्यातून एकदा 'लोकप्रभा'चा अंक हाती पडायचा. वाचनाची भूक



शमवण्यासाठी या अंकांची चातकासारखी वाट पाहिली जायची. (वार्षिक सुट्टीवरून परत येताना भारतातून आणलेली पुल व वपुंची पुस्तकेही अधुनमधून साथ द्यायला असायचीच) तर सणावारांच्या दिवसांत 'लोकप्रभा'चे विशेषांक निघायचे. विशेषतः गणपतीच्या वेळी जो विशेषांक निघायचा त्यावरील मुखपृष्ठावरील गणपतीच्या चित्रासह आतील गणपतीची चित्रे मार्करनी काळी करून ठेवलेली असायची. भारतातून आलेली वर्तमानपत्रे व मासिके ही इथे आधी Censor व्हायची मगच शहरात वितरीत करायला त्या त्या एजन्सीकडे जायची. (नुसती देवाचीच नाही तर प्लेबॉय किंवा तत्सम मासिकांमधील 'देवियाँ'ची उत्तान चित्रे देखील अशीच Censor व्हायची. म्हणजे देव आणि देवियाँ मध्ये देखील ते भेदभाव करीत नसत!)

असे वातावरण असताना गणेशोत्सवात गणपतीची मूर्ती भारतातून आणण्याकरिता मोठे प्लॅनिंग करावे लागायचे. घरोघरी गणपती बसायचे नाही. अशावेळी मंडळाच्या गणपती दर्शनाला अलोट गर्दी व्हायची. इकडे शाळांना उन्हाळ्याच्या



सुट्ट्या जुलै-ऑगस्ट मध्ये असतात. त्यामुळे बहुतेक कुटुंब त्यासुमारास भारतात सुट्टीसाठी जातात. गणपतीचे आगमन व शाळा उघडण्याचे दिवस जवळपास एकच असल्याने त्यासुमारास जे कुटुंब भारतातून परत येत असत त्यांच्यापैकी एकावर गणपतीची मूर्ती आणण्याची जबाबदारी सोपवायची. लाह्या व थर्माकोलनी पॅक करून मूर्ती व्यवस्थित बॉक्समध्ये घालून घेऊन यायची. मूर्ती आणताना मनात धाकधुक असायचीच. जर विमानतळावर कस्टम मध्ये चेकींग झाले तर? तेव्हा Screening / Scanning हे प्रकार नव्हतेच. मग ते कुटुंब ज्या फ्लाईटने येणार, बहुतेक एअर-इंडियाच असायचे कारण तेव्हा गल्फ एअर आणि एअर-इंडिया शिवाय मुंबईला येणारे फ्लाईट नव्हतेच. एअर-इंडियात काम करणारे आपले कोणीतरी असायचेच. मग त्याला सांगून 'त्या फ्लाईट'च्या वेळेला त्याची ड्यूटी ॲडजेस्ट करून तो कर्मचारी विमानतळावर हजर होईल याची काळजी घेतली जायची. मग तो स्टाफ म्हणून ती मूर्तीची बॅग कस्टम मधून सहज सोडवून घ्यायचा. तोपर्यंत मात्र मनातल्या मनात गणपतीचा धावा करत विमानतळाच्या बाहेर पडेपर्यंत त्या कुटुंबाच्या जीवात जीव नसायचा.

मूर्ती आल्यावर मात्र यावर्षी गणपतीची स्थापना कुठे करावी यावर खल चालायचा. शक्यतो शहरातील मध्यवर्ती गर्दीचे ठिकाण टाळून कुणाच्या तरी व्हिला मध्ये वा पहिल्या, दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या कोणाच्या तरी घरी गणपतीची स्थापना व्हायची. पहिला वा दुसरा मजला यासाठी की दर्शनासाठी होणारी गर्दी ही तिथल्या स्थानिकांच्या लक्षात येऊ नये व गर्दीही आटोक्यात ठेवता यावी. वयोवृद्ध व लहान बाळांना घेऊन येणाऱ्या स्त्रियांच्या व्यतिरिक्त इतर भक्तगणांना बिल्डिंगमधील लिफ्टचा वापर करायचा नाही ही सक्तसूचना स्वयंसेवकांना दिलेली असायची. त्या इमारतीमध्ये राहणाऱ्या इतर देशांच्या रहिवाशांना त्रास होऊ नये याची काळजी घेतली जायची. तरीही एखादा रहिवासी 'ही एवढी गर्दी कसली?' अशी चौकशी करायला लागला तर 'बर्थडे सेलीब्रेशन' किंवा 'पार्टी' असे थातुरमातुर उत्तर देऊन प्रश्नाला बगल दिली जायची. दर्शनानंतर त्या इमारतीच्या आसपास गप्पा मारत उभे राहणाऱ्या बाया-बापड्यांना इथे गर्दी करू नका! अशी विनंती करावी लागायची.

गणपतीची आरती म्हणताना देखील चढ्या आवाजात सूर वाढवणाऱ्या भक्तांना सक्त ताकीद दिली जायची. आपला धर्म तर पाळायचा पण तोदेखील ज्या देशात आपण राहतो त्या देशाचे नियम पाळून यावर सिनीयर मंडळींचा कटाक्ष असायचा.

गणपतीचे विसर्जनही असेच लपत-छपत करावे लागायचे. सूर्य अस्ताला गेल्यावर बीचवर एखादी निर्जन जागा आधीच हेरून ठेवलेली असायची. मग फक्त एका गाडीतून निवडक चार-पाच जणांनी विसर्जनाला जायचे. गाडीतून जाताना गणपतीची मूर्ती एखाद्या बॉक्स मध्ये तिन्ही बाजूंनी कव्हर करून वरच्या बाजूला फक्त उघडी राहील याची काळजी घेतली जायची.

कधी कधी विसर्जनाला पोर्ट मध्ये काम करणाऱ्या गुजराती मच्छीमारांची मदत घेतली जायची. सूर्यास्ताच्या सुमारास त्यांच्या दोन छोट्या पडावातून काहीजणं जायचे. समुद्र किनाऱ्यापासून थोडे दूर हे पडाव एकमेकांना समांतर उभे केले जायचे व 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात

गणरायचे विसर्जन केले जायचे. तर कधी मोठ्या बोटीतून टाळ, मृदुंगाच्या साहाय्याने 'विठुच्या गजरात' गणपतीला निरोप दिला जायचा. पण हा गजर सुरू व्हायचा तो मात्र बोट किनाऱ्यापासून थोडी दूर गेल्यावरच.

परदेशात गेल्यावर आपला धर्म, संस्कृती यांचे पालन तर करायचे पण या देशाच्या नियमांचे उल्लंघन न करता. त्यांच्या धर्माचाही मान ठेवायचा व आपला धर्मही सांभाळायचा अशा द्विधा मनःस्थितीत दोन दशकापूर्वीची पिढी होती.

पण गेल्या काही वर्षांत हे चित्र पूर्ण बदलल्याचे दिसते आहे. दुबईतील मंदिराजवळच्या गल्लीतील हास्पूजांच्या दुकानात गणपतीच्या मूर्ती सर्रास विक्रीसाठी ठेवलेल्या दिसतात. एक-दोन भारतीय खाद्यपदार्थ विक्रीच्या किराणा दुकानात देखील गणपतीच्या मूर्ती मिळतात. दुबईमध्ये आज घरोघरी हजाराहून अधिक ठिकाणी गणपतीची स्थापना केली जाते. काही जणांच्या घरातले देखावे तर बघण्यासारखे असतात. त्यासाठी भारतातून कलाकारांना आमंत्रित केले जाते. हे सर्व जरी चार भिंतींच्या आत होत असले तरी पूर्वीची भीती-अस्वस्थता त्यात नसते. चार भिंतींच्या आत तुमचा धर्म तुम्ही पाळा मात्र तो सार्वनिक करून रस्त्यावर आणू नका. असा अप्रत्यक्षपणे संदेश इकडच्या सत्ताधाऱ्यांनी या गोष्टीकडे कानाडोळा करतच जणू दिला आहे. दुबईमध्ये विसर्जनाला तर Creek side ला दोन पोलीसच मार्गदर्शन करत असतात. गाडीतून मूर्ती घेऊन तिथे जायचे व समुद्रात विसर्जन करायचे वा 'आब्रा' नावाच्या छोट्या बोटीतून समुद्रात थोडे आतमध्ये जाऊन विसर्जन करायचे. या आब्रा जरी इराणी मालकाच्या असल्या तरी चालवणारे इतर देशी असल्याने आब्रामध्ये recorded गाणी पण लावली जातात. मग अशा वातावरण निर्मितीमुळे भारावलेल्या भक्ताला खिशाला थोडी चाट पडली तरी चालते!

गणेशोत्सवा बरोबरच काही स्टेडियममध्ये वा हॉलमध्ये नवरात्रीत गर्बाही खेळला जातो. बागेमध्ये वा बीचवर म्युनिसिपाल्टीची परवानगी घेऊन होळीचे रंग उधळले जातात. दिवाळीच्या वेळी दुबईतील भारतीयांच्या घराघरातील बाल्कनीतून लावलेल्या दिव्यांच्या दिपमाळा व आकाश कंदिल हे मायदेशाची आठवण करून देतात. फटाक्यांना अधिकृतरित्या बंदी असली तरी कायदा तोडून पळवाटेने आणलेले फटाक्यांचे आवाज अधुनमधून कुठेना कुठे तरी येत असतातच.


सोन्याच्या व्यवसायात असलेले गुजराती समाजाचे प्राबल्य, कापड उद्योगात असलेला सिंधी समाजाचा प्रभाव व गेले चार-पाच दशकांहून अधिक काळ त्यांचे येथील वास्तव्य हे आता येथील सरकारने देखील स्वीकारले आहे. इतर वेळेस काटेकोरपणे नियमांची अंमलबजावणी करणारे सरकार सणांच्या बाबतीत थोडी शिथीलता दाखवतात. यामागे बदलत्या काळानुसार त्यांच्यात झालेला बदल आहेच पण पुरोगामी विचार बाजूला सारून जागतिक परिस्थितीचा अंदाज घेत सावधपणे टाकलेली पावले पण आहेतच. इथल्या अर्थ व्यवस्थेला ऊर्जा देण्याचे काम हे सण करत आहेत.

व्यवसायानिमित्त वा नोकरी-धंद्यानिमित्त इथे स्थायिक झालेल्या भारतीयांची दुसरी-तिसरी पिढी इथे प्राथमिक शिक्षण घेऊन भारतात पदवीपर्यंत व त्यानंतर परदेशात पदवीनंतरचे शिक्षण घेत आहेत. शिक्षणानंतर काही जण परदेशातच राहणे पसंत करतात तर काहीजण ज्यांना भारतात कायम वास्तव्यासाठी परतायचे नाही ते इकडे परत येतात. फक्त अडीच-तीन तासांच्या अंतरावर असलेला भारत त्यांना मग जवळचा वाटतो. इथे कितीही वर्षे राहिले तरी इथले नागरिकत्व मिळणार नाही याची त्यांना खात्री आहे. या देशात जरी जन्म झाला तरी भारतीय पासपोर्ट हीच त्यांची ओळख असणार आहे. तेव्हा त्यांना भारतीय नागरिकत्व ठेवणे भाग आहे. नव्हे ते त्यांच्या हिताचे देखील आहे. भारतीय नागरिकत्व कायम ठेऊन इथले स्वच्छ, सुखासीन, हाय सोसायटी आयुष्य जगण्याची त्यांची दुहेरी धडपड सुरू आहे. पण मनाची मात्र ते द्विधा मनःस्थिती होऊ देत नाहीत. नोकरी-धंद्यातून निवृत्त झाल्यावर भारतात परत जायचेच आहे ही खूणगाठ ते मनाशी बाळगून आहेत. त्यामुळे दरवर्षी भारतात येऊन मित्र-नातेवाईकांना भेटून, मालमत्ता-संपत्ती भारतात सुरक्षित ठेवून भारताशी असलेली नाळ ते पक्की करत आहेत. ज्यांना भारतात परतायचेच नाही ते दोन-तीन वर्षांनी होणारा Residence-Employment Visa renew करतोय वा इथून अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या देशाची वाट धरतोय.

मी भारतीय, मन भारतीय, शरीर भारतीय, संस्कार भारतीय या परंपरात राहणाऱ्या भारतीयांनी या देशाला आपलेसे केले आहे. पण इथल्या स्थानिकांनी त्यांना मनापासून स्वीकारले आहे का? गरज म्हणून? हा प्रश्न शेवटी अनुत्तरीच राहतो.


– प्रशांत कुलकर्णी

coolkarnipr@gmail.com





एक जीव मराठी मातीतला,
दुबईच्या मराठी मातीत
रुळला, रमला, स्थिरावला,
वृद्धिंगत झाला,
दुबईशी ऋणानुबंधाचे
नाते जमले... आणि म्हणूनच
या जीवाला वाटते...
परदेशात, दुबईच्या वाळवंात
येऊनही... माझ्यासारख्या
मराठी जीवांचं
काहीच हरवले नाहीये!

# काहीच हरवलं नाहीये...!

## प्रकाश केळकर

खूप वर्षं झाली... किती झाली हे मोजण्यापेक्षा माझा 'आरे-तुरे'वरून 'अहो, काका' झाला आणि मी ज्यांना 'अहो काका-काकू' म्हणायचो त्यांचे आता आजी-आजोबा... होय, खरंच... बरीच वर्षे झाली!

एक ब्याग, उरात धडधड आणि पायात पुणं सोडून निघाल्याचं मणभर ओझं घेऊन विमानात बसल्यावर दाटून आलेला गळा आणि डोळ्यांच्या लाल कडा लपवण्याचा



निष्फळ प्रयत्न मी करत कमरेचा पट्टा आवळत होतो आणि शेजारून आवाज आला... ''काय? दुबईला नोकरीला का? पहिल्यांदाच?''... गडगडाटी हसत त्या गृहस्थानं हस्तांदोलनासाठी हात पुढे केला... ''शैलेश... शैल्या म्हणशील तर फारच उत्तम''... आणि पुढेच तीन तास मी पुणं, घर, मित्र आणि बरंच काही विसरून गप्पांच्या मैफलीत बुडालो... त्या नगरीच्या वेशीतच काय अवकाशातही पोचण्याआधी मला तिच्याबद्दल प्रेम वाटायला लागलं... दुबईमध्ये पाऊल ठेवल्याआधीच पहिला मित्र मिळाला आणि तो पण कट्टा टाकून गप्पा मारणारा... पुण्यातील जीवनातील चार मूलभूत गरजा, म्हणजे अन्न-वस्त्र-निवारा आणि कट्टा... पहिल्या तिनांचा प्रश्न सोडवण्यासाठी मी दुबईला निघालो होतो आणि चौथी भागण्याची खात्री विमानातल्या त्या तीन तासांत मिळाली...

दुबई... इथे माणूस माणसाला पारखा असेल, इतर कोणत्याही मोठ्या शहरासारखा कोरडा असेल, वाळवंटाची रुक्षता सगळीकडे दाटली असेल, अशा बुरसट आणि ऐकीव कल्पनांना उधळून लावत उभी असलेली मायानगरी, ऑफिसच्या चौकोनात आणि घराच्या आयतात आपलं त्रिकोणी कुटुंब घेऊन वर्षानुवर्षे जगणारासुद्धा इथे येऊन बाहेरच्या वर्तुळात रममाण होतो... वर्तुळाचा परीघ वाढवत जातो. अठरापगड माणूस आणि जगभरातल्या शेकडो नागरिकांच्या वास्तव्यानं फुललेलं हे खरंखुरं 'ग्लोबल व्हिलेज'... माझ्यासारख्या कित्येक जणांना इथं टेकायला पार मिळाला, मित्रांचा, गप्पा, मैफलींचा, नाटक, गाण्यांचा आधार सापडला... त्रिज्या वाढतच गेली... वर्तुळाचा परीघ रुंदावत.

सोशल सर्कल नावाचं वलय परदेशातल्या वास्तव्याचं माहेरघर बनून जातं ते इथं... मंडळाचे कार्यक्रम, नाटकाच्या तालमी, काव्य साहित्याच्या गप्पा, गाण्याच्या मैफली (आणि इतरही काही विशेष मैफली...!) हे सगळं इथं रोज ताजेतवाने करणारे आणि असंख्य मित्र मिळवून देणारे भरगच्च कार्यक्रम रोजनिशीतले बनून जातात आणि जीव इथेच रमायला लागतो... पन्नास वर्षांपूर्वी आलेल्या बुजुर्गांपासून ते अलीकडे नोकरीला लागलेल्यापर्यंत सगळ्यांनाच ही मायानगरी मग आपल्या प्रेमळ बंधनात अडकवून टाकते आणि 'दोन-चार वर्षं राहू, पैसे जमले की परत जाऊ' असं म्हणून आलेली मंडळी वर्षानुवर्षे इथलीच होऊन जातात... त्यांची 'आपली... घरची जवळची' असं म्हणायच्या मंडळींची यादी वाढतच जाते आणि हळूहळू हेच घर वाटायला लागतं... पुण्या-मुंबईहून सुट्टीवरून परत आल्यावर 'ब्याक होम'चं 'फिल गुड' यायला लागतं... आणि मग तो आणि ती 'दुबईकर' होऊन जातात.

काय नाहीये दुबईमध्ये?... भाकरीच्या पिठापासून ते शेंदेलोण मिठापर्यंत माल पुरवणारी दुकानं... कांदेपोहे थालीपिठापासून मोदक, श्रीखंडापर्यंत चवीनं खायला देणारी उपाहारगृहं... सत्यनारायण पोथीपासून गणपतीच्या मूर्तीपर्यंत भक्तिभावाने नटलेले देवळाजवळचे इराणी... मोठमोठ्याने आरत्या म्हणून घरोघरी गणेशउत्सवाला धावणारे भावुक... दासबोधपासून सत्संग, योगाभ्यास, वेदपठण करणारे ग्रुप... नाटक-गाण्याच्या वेडाने दिवसभर काम संपवून रात्री-बेरात्री तालीम करणारे कलावंत... दऱ्या, डोंगर, समुद्र जवळ करणारे साहसी, स्वच्छंदी... आणि हे सारे सारे इथं आपलं म्हणून घेऊन आलेले आपलं जग निर्माण करणारे असंख्य उत्साही... सगळे असेच एक दिवस नोकरी-धंद्यासाठी या वाळवंटात उतरले आणि इथंच या दुबईला आपलंसं करून राहिले माझ्यासारखे... आनंदी.

दुबई नगरीबद्दल देश विदेशांत बरंच काही ठाऊक असेल... इथली झगमगती श्रीमंती, भारावून-संमोहून टाकणारी लखलखती चंदेरी मायापुरी, उत्तुंग इमारती, चमचमणारी सोन्याची दुकानं, आ वासून पाहत राहावं अशी भरभराट आणि बरंच काही... पण मला विचारलं तर ही जोडणारी, आपलंसं करून टाकणारी, आपला वर्तुळाचा परीघ मोठा करत आनंदी जगायला लावणारी इथं राहणारी आपली माणसं हे तिचं खरं विशाल रूप आहे...


या देशाटन करून आलेल्या आणि हेच आपलं आता घर म्हणून इथं राहिलेल्या मंडळींच्या मनात जर डोकावून पाहाल तर... माझ्या मनातलं एक काव्य नक्की तिथेही ऐकू येईल...

पहिल्या पहिल्यांदा वाटायचं,
भाकरी-पिठल्यात अडकलेलं
मित्र परिवारात गुरफटलेलं
माझं मन...
कसं काय इथं रुळायचं?
पण हळूहळू सगळंच कसं फक्कड जमलं
नकळत जमून गेलेल्या विड्याच्या पानासारखं.
भाकरी-पिठल्याच्या जोडीला
खबूस आवडू लागला
गुलाबजामच्या बाजूला
बकलावा दिसू लागला
मित्र होतेच... झाले दसपट येथे,
जिवलग दृढ आणि आपले
ज्यांनी मलाही केले आपलेसे.
सह्याद्रीतली भटकंती
वादी, वाळवंटात रुळली
दोन भटक्या जीवांची
बेमालूम मिसळ झाली.
नोकरीतील ताणाचे तासन् तास,
हरवले साहित्य नाट्य संगीतात,
अन् उडाली वर्षे घेऊन...
दिस, आठवडे अन् मास.
एक जीव मराठी मातीतला,
रुळला, रमला, स्थिरावला,
वृद्धिंगत झाला... दुबईच्या मराठी वाळूत.
देवा... असाच राहो,
प्रेम, आपुलकी, जिव्हाळा
...ऋणानुबंध...
दुबई एक ऋणानुबंध.

– **प्रकाश केळकर**
pgk912@gmail.com


ग्रंथाली


# कोलाज
**अमेरिकेच्या अंतरंगाचा**
**डॉ. लतिका भानुशाली**
**डॉ. गजानन सबनीस**



**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

अमेरिकेच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, ऐतिहासिक जीवनाचा हा कोलाज आहे. हे रूढ अर्थाने अमेरिका या देशाचे भौगोलिक प्रवासवर्णन नाही. हे पुस्तक म्हणजे अमेरिकेत ४०-५० वर्षे वास्तव्य करून त्या देशात स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेल्या स्थलांतरितांचा जीवन इतिहास तर आहेच. पण त्याचबरोबर भारतातील वेगवेगळ्या क्षेत्रात अति महत्त्वाचे काम करणाऱ्या आणि अमेरिकेला वरचेवर भेट देणाऱ्या लोकाचा अमेरिकेसंदर्भात असलेला परखड दृष्टिकोन व्यक्त करणारे वास्तववादी पुस्तक आहे. विविध मुलाखतींच्या माध्यमातून अमेरिका या देशाचे अंतर्बाह्य चित्र स्पष्ट करणारा आगळवेगळा प्रयोग म्हणजे कोलाज : अमेरिकेच्या अंतरंगाचा!





# मराठी ग्रंथप्रेमींचा परदेशातील वाचनकट्टा

**सीमा पाध्ये / स्वाती पानसरे**

१९८० चा काळ होता. मराठी माणसे दुबईत बऱ्यापैकी स्थिरावली होती. नोकरी-धंद्याच्या वेळेव्यतिरिक्त एकत्र जमण्यासाठी महाराष्ट्र मंडळाची स्थापना झाली होती. मंडळ बाळसे धरू लागले होते. सभासद वाढतच होते. तऱ्हेतऱ्हेचे सांस्कृतिक कार्यक्रम साजरे होत होते. नाटके, संगीताच्या मैफली सजत होत्या. कधी स्थानिक कलाकार तर कधी मुंबई-पुण्यातून प्रोफेशनल नाटके आणली जात होती. मोठमोठ्या गायक-गायिकांचे कार्यक्रम इथे होत होते. सणवार साजरे होत होते, पण तरीही कुठेतरी पोकळी जाणवत होती.

ही पोकळी होती वाचनाची! मराठी माणूस वाचनाचा वेडा आहे. कादंबरी, कथासंग्रह, दिवाळी अंक म्हणजे मराठी माणसाचा जीव की प्राण! त्याचे हे पुस्तकप्रेम जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी त्याला स्वस्थ बसू देत नाही. दुबईतील मराठी माणूस तरी कसा मागे असेल?

प्रथम दुबईत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स हे मराठी पेपर काही पेपर विक्रेत्यांकडे मिळू लागले. पण नुसते पेपर वाचून वाचनाची तहान भागेना! लोक सुट्टीहून येताना वाचनासाठी थोडीफार पुस्तके घेऊन येत. यातूनच विनय-मधुरा कुंटे यांच्या मनात लायब्ररी सुरू करायची कल्पना आली. प्रथम लायब्ररी घरी सुरू केली. पण नंतर लवकरच फिरती लायब्ररी सुरू झाली. गाडीच्या डिकीत पुस्तके



**दुबईच्या रखरखीत वाळवंटात, थंडगार पाण्याच्या झऱ्याप्रमाणे मनाला थंडावा देणारे वाचनालय हे मनोरंजनाचे मोठे साधन होते. या वाचनालयाची सुरुवात प्रथम विनय व मधुरा कुंटे यांनी केली. नंतर ह्या परंपरेची धुरा सीमा पाध्ये व स्वाती पानसरे ह्यांनी आपल्या खांद्यावर घेतली. या वाचनालयाचा प्रवास सीमा पाध्ये व स्वाती पानसरे ह्यांच्याच शब्दांत –**



घालून ठरावीक दिवशी, ठरावीक वेळी, ठरावीक ठिकाणी मधुरा–विनय गाडी घेऊन थांबायचे. सभासद तिथे येऊन पुस्तके बदलून घेऊन जायचे. कादंबरी, कथासंग्रह, चरित्रे, धार्मिक पुस्तके, असे विविध मराठी साहित्य दुबईकरांना मिळू लागले. दिवाळी अंक म्हणजे तर मेजवानीच! रखरखीत वाळवंटात थंडगार पाण्याचा झराच सापडला जणू!

अशाप्रकारे बरीच वर्षे विनय–मधुरा कुंटे यांची 'फिरती लायब्ररी' सुरू होती. नंतर ते कायमचे भारतात परत गेले. त्यामुळे काही वर्षे लायब्ररीत खंड पडला. पण पुढे लायब्ररीची ही धुरा आपल्या हातात घेतली सीमा पाध्ये यांनी!

**सीमा पाध्ये सांगतात –**

आपले अनुभव सांगताना त्या म्हणतात, तशी वाचनाची आवड लहानपणापासून होती. १९९१ साली आम्ही जेव्हा दुबईत पहिले पाऊल टाकले, तेव्हा प्रथम मराठी पुस्तकांची लायब्ररी कुठे आहे का याची चौकशी सुरू केली. कुंटे यांची फिरती लायब्ररी मिळाली व ती सुरूही केली, पण लवकरच ती बंद झाली. आता काय वाचायचे हा प्रश्न पडला. त्याचवेळी माझ्या दिराला अबुधाबीत जॉब मिळाला. दरवर्षी तो दुबईत दिवाळी अंक आणायचा. त्याचे वाचून झाले की तो मला पाठवायचा! माझे वाचून झाले की मी माझ्या मैत्रिणींना द्यायची. माझ्याकडे आणखीही बरीच पुस्तके होती. ती बघून मैत्रिणींनी सुचवले तू लायब्ररी का सुरू करत नाही, आम्ही सभासद होऊ! त्यांचे बोलणे ऐकून मला हुरूप आला. त्यावेळी सुट्टीत भारतात आले तेव्हा जवळजवळ १५० पुस्तके घेऊन दुबईत परत आले. १ नोव्हेंबर २००० साली आमच्या ओल्ड पाकिस्तानी कॉन्सिलेट येथील 'लिली यानेस'च्या घरात माझी मैत्रीण वैशाली कर्णिक आम्ही दोघांनी मिळून लायब्ररी सुरू केली.

त्यावेळचे महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रसाद पाठारे व श्री. राजन वेलिंग यांनी उद्घाटन केले. देवाची पूजा करून नारळ फोडला पण त्यादिवशी एका मैत्रिणीशिवाय कोणीही आले नाही! ती मैत्रीण होती स्वाती खांबेटे! ती माझी पहिली सभासद!

नंतर दोन–तीन आठवडे कोणीच आले नाही. मी खूप नाराज झाले. पण त्यावेळी नवऱ्याने– गिरीशने धीर दिला. तो म्हणाला, अग कोणी नाही आले तर नाही; पण ती पुस्तके तुला तरी निदान वाचायला होतील ना! पुढे काही कारणाने माझी मैत्रीण भागीदारीतून बाहेर पडली व मी एकटीनेच लायब्ररी चालवायचा निर्णय घेतला. महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात जाहिरात करायची परवानगी मिळवली. एका कार्यक्रमाच्या वेळी हॉलमध्ये प्रत्येक खुर्चीवर लायब्ररीची जाहिरात ठेवली. त्यामुळे खूप सभासद मिळाले. माझ्या ओळखी वाढल्या. ही लायब्ररी चालवण्यात माझा स्वार्थ दडलेला होताच, की परदेशात लोकांच्या ओळखी होतील व तसेच झाले.

कोणी सभासद आले की गप्पा होऊ लागल्या. माझा वेळही चांगला जाऊ लागला. दुबईत कोणी नवीन आले व त्याला काहीही माहिती हवी असेल तर ती माझ्याकडे मिळू लागली. उदा. बेबी सिटर, पूजा सांगणारे गुरुजी, वेगवेगळ्या क्लासेसचे नंबर मी सर्वांना द्यायचे. माझे मिस्टर गमतीने लायब्ररीला चौकशी खिडकी म्हणायचे.

मी लायब्ररी सुरू करायला माझ्या मिस्टरांनी– गिरीशनी मला खूप मदत केली. जसे– पुस्तक भारतातून मागवण्यापासून ते पुस्तकांना कव्हर्स घालण्यापर्यंत! कधी काही कामासाठी मी बाहेर गेले तर लायब्ररी ते सांभाळायचे. सर्व म्हणतात की यशस्वी पुरुषाच्या मागे एक खंबीर स्त्री नेहमी उभी असते, मी म्हणेन, मी लायब्ररी सुरू करण्यासाठी

माझे मिस्टर खंबीरपणे माझ्या मागे उभे होते.

माझ्या पुस्तकांच्या संग्रहात ‘तस्लिमा नसरीन’ यांचे ‘लज्जा’ हे एक पुस्तक होते. ते पाहून एका सभासदाने सल्ला दिला की हे पुस्तक इथे ठेवू नका. अडचणीत याल. खरं म्हटले तर इच्छा नसताना मी ते पुस्तक भारतात परत पाठवले व वादग्रस्त लेखकांची पुस्तके इथे आणायची नाहीत असा निर्णय घेतला!

दरवर्षी भारतात आले की ५०–६० पुस्तके घेऊन यायची. असे करत करत ६०० पुस्तके माझ्याकडे जमली. दर दिवाळीला ३०–३५ दिवाळी अंक मी कुरिअरने मागवायचे. अर्थात माझे मिस्टर कुरिअर कंपनीत कामाला होते म्हणून बरेच सोपे झाले. दरवर्षी दिवाळीला सभासदांना ‘कालनिर्णय’ कॅलेंडर भेट म्हणून द्यायला सुरुवात केली. परदेशात ही कल्पना सर्वांना फारच आवडली. शारजाच्या लोकांना दर आठवड्याला पुस्तक बदलायला दुबईत येणे शक्य नव्हते, मग त्यांना महिन्याची पुस्तके एकदम देण्यास सुरुवात केली. त्यामुळे ती लोकही खूश झाली. आम्ही सात–आठ मैत्रिणी मिळून मग book club सुरू केला. माझ्या लायब्ररीत एखादे पुस्तक घेऊन, वाचून मग सर्वांनी त्यावर चर्चा करायची. प्रत्येकाने आपले मत मांडायचे. उलट–सुलट चर्चा व्हायची, विचाराला चालना मिळायची व मैत्रिणींचे भेटणे व्हायचे. परदेशात असताना आपली माणसे भेटतात ही भावनाच मनाला सुखकारक असते!

एक किस्सा आठवला तो असा– उकिडवे नावाचे एक सभासद होते. त्यांचा भाऊ इथे दुबई पाहायला आला. त्याने माझ्या लायब्ररीतील पुस्तके वाचली व ‘माहेर’ मासिकात नोंद केली ती अशी की, दुबईसारख्या वाळवंटात थंड पाण्याचा झरा वाहताना दिसला तर जसे वाटेल तसे मला लायब्ररी पाहून वाटले. मला वाटते, त्याच्यापेक्षा मोठी पोचपावती काय पाहिजे नाही का?

माझा नवरा कौतुकाने सर्वांना सांगतो– आमचे दुबईत वास्तव्य १८ वर्षांचे! सुरुवातीला त्यांची ओळख गिरीश पाध्ये अशी होती. नंतर सहा–सात वर्षांनी आदितीचे बाबा अशी व्हायला लागली. कारण आमची मुलगी आदिती महाराष्ट्र मंडळाच्या बऱ्याच कार्यक्रमात भाग घ्यायची. पण नंतर लायब्ररी सुरू झाल्यानंतर आता ‘त्या लायब्ररीवाल्या पाध्येबाई आहेत न त्यांचे मिस्टर’ अशी होऊ लागली!

मी दुबई सोडून भारतात येण्याचे ठरवले तेव्हा सर्व सभासदांची प्रतिक्रिया अशीच होती की, आता मराठी पुस्तके कुठे वाचायला मिळणार?

१ नोव्हेंबर २००० ते ३१ मे २००८ असा माझा लायब्ररीचा प्रवास खूपच छान होता. आठवले तरी मन भरून येते.

सीमा पाध्ये दुबई सोडून भारतात परत गेल्या कायमच्या, पुन्हा एकदा लायब्ररी बंद झाली. खरं म्हटलं तर या काळापर्यंत इंटरनेटचा प्रसार जगभर झाला होता. कोणतेही पुस्तक, वर्तमानपत्र नेटवर वाचायला मिळत होते. पण तरीही खुर्चीवर, सोफ्यावर पाय लांब करून बसून, किंवा बेडवर लोळत पडून एखादे पुस्तक वाचण्यात किंवा कोरा करकरीत दिवाळी अंक हातात घेऊन वाचण्यात जी मजा आहे ती नेटवर वाचण्यात कुठे? वाचनाचे समाधान मिळण्यासाठी हातात पुस्तकच हवे! म्हणून लायब्ररी बंद



पडली तेव्हा दुबईतील ग्रंथप्रेमी अस्वस्थ झाले... आणि त्यांच्या मदतीला धावून आल्या स्वाती पानसरे! लायब्ररीची धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली!


**स्वाती पानसरे सांगतात–**

नमस्कार मंडळी!

तुम्हाला काही जणांना कदाचित माहीतही असेल की मी दुबईमध्ये मराठी पुस्तकांचे घरगुती वाचनालय चालवते. अर्थात घरामधूनच! या वाचनालयाचा जन्म कसा झाला हे मी सांगू इच्छिते! याचे श्रेय मी सीमा पाध्ये यांना देते. कारण परदेशातील वाचनालयाची कल्पना त्यांची! मी फक्त ती पुढे चालू ठेवली इतकंच! मंडळी हा वाचनकट्टा म्हणजे काही व्यवसाय नाही. आम्ही २००५ साली नवऱ्याच्या बदलीमुळे बंगलोरहून दुबईला स्थलांतरित झालो. अवघ्या हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या ओळखी होत्या.

सर्व काही नवीन! अशा नवीन वातावरणाशी जुळवून घेताच सीमाच्या लायब्ररीची माहिती मिळाली. मला स्वतःला वाचनाची आवड होतीच व त्यानिमित्ताने चार ओळखी होतील या विचाराने मी त्यांच्याकडे जायला सुरुवात केली.

साधारणतः २००८ मध्ये सीमा स्थलांतरित झाल्यावर माझ्या वाचनात खंड पडला. पण पुढील एक वर्षभर मनात सारखा विचार येत होता की हा कट्टा चालवण्याचे सत्कार्य आपण का बरे करू नये? एक समाजसेवा व चार ओळखीही होतील. साधारण त्याच काळात मिस्टरांनी येथे स्वतःचा व्यवसाय सुरू केला. त्यामुळे असे लक्षात आले की आपण काही आपल्या देशात लवकर परत जाणार नाही. मुलेही मोठी होत होती. वाचनाची आवड स्वस्थ बसू देत नव्हती.



स्वतःला गुंतवून ठेवण्यासाठी आणि आपल्या आवडीचा लोकांनाही फायदा होईल या विचाराने मी परदेशातील माझा वाचनकट्टा सुरू केला. २००९ साली माझ्या वाचनालयाचा श्रीगणेशा झाला.

प्रथम सर्वात मोठे आव्हान होते की चांगली पुस्तके आणून त्यांची साठवण करणे. पुण्यातील ललित वितरण संस्था वाचनालयांना पुस्तके पुरवतात असे मला माहीत होते. त्यांनी मला पहिल्या पुस्तक साठवणीत खूपच मदत केली. पहिला पुस्तकांचा सेट माझ्या बाबांनी मला भेट म्हणून दिला. अजूनही दरवर्षी ते मला दिवाळी अंक वेळेत पोहोचवतात. त्यामुळे आमच्या वाचकांना ऐन दिवाळीत दिवाळी अंकांचा आनंद लुटता येतो.

वाचनकट्टा सुरू करण्यापूर्वी मी सीमा पाध्ये यांना भेटले. त्यांनी सभासदांची लिस्ट दिली. फोन नंबर दिले. त्यामुळे सभासदांना कळवणे मला खूप सोप्पे गेले. या वाचन कट्ट्यामुळे खूप मैत्रिणी मिळाल्या. त्यांचे आई-वडील किंवा सासू-सासरे दुबईत येतात तेव्हा वाचायला पुस्तके मिळाल्यामुळे त्यांचा वेळही चांगला जातो. ते जेव्हा हे सांगतात, वाचनालयाचे कौतुक करतात तेव्हा खूपच समाधान वाटते.

माझी एक वाचक भगिनी सुचित्रा मला नेहमी म्हणते की तुझ्या पुस्तकांमुळे मी आज इथे टिकून आहे. कारण पुस्तक हे मनोरंजनाचे फार मोठे साधन आहे. आणखी एक वाचक जे ड्रायव्हिंगच्या मधल्या वेळात गाडीत पुस्तक ठेवून वाचायचे. आणखी एक वाचक भगिनी घरी काही वाईट घडले होते त्यामुळे तिचे मन स्थिर नव्हते. रात्री झोप येत नव्हती. पण वाचनामुळे तिचे मन दुसऱ्या विषयात रमले, मनावरचा ताण हलका होण्यास मदत झाली, हे ऐकून खूपच बरे वाटले. आपल्या या उपक्रमामुळे लोकांना फायदा होतोय हे पाहून समाधान वाटते.

या उपक्रमामध्ये कधी कधी थोडासा त्रास होतो ते कधी कधी वाचक वेळेवर पुस्तक परत करत नाहीत तेव्हा! मग त्यांना वारंवार आठवण करून द्यावी लागते. अर्थात असे अनुभव कमी येतात!

आता ही लायब्ररी चालू ठेवणे हे एक आव्हान झाले आहे. कारण दुबईतील ७० ते ९० या कालखंडात आलेली लोकं रिटायर्ड झाल्यामुळे भारतात कायमची परत गेली आहेत. हा खरा वाचकवर्ग होता. आता नवीन पिढी- ई-पिढी आली आहे. वाचनाची आवड कमी होऊ लागली आहे. ऑनलाईन वाचन होऊ लागले आहे, ई-बुक्स आली आहेत. पूर्वी पुस्तके बदलण्यासाठी एक दिवस व वेळ ठरवली होती; पण आता आधी फोन करून कधीही या अशी सवलत पण दिली आहे जेणेकरून वाचनाचे वेड कमी होणार नाही. माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य त्यांना कितीही गैरसोय झाली तरी तक्रार करत नाहीत.

असे आमचे १५० पुस्तकांचे वाचनालय आता ५०० पुस्तकांचे झाले आहे. उत्तरोत्तर मराठीप्रेमींचे, हातात पुस्तक घेऊन वाचण्याचे वेड पुढील पिढीतही पोहोचू दे एवढीच ईश्वराला प्रार्थना!

**- सीमा पाध्ये / स्वाती पानसर**

seemapadhye65@gmail.com / spansare@hotmail.com





# दुबईच्या अंतरंगात...

शिल्पा मोहिते-कुलकर्णी



अनेकवेळा नव्या व्यक्तींची ओळख होते, पण व्यक्तिमत्त्व उलगडण्यास, समजण्यास आणि ते उमजण्यास वेळ लागतो... तसेच झाले अगदी... जागतिक शहर म्हणून दुबईची ओळख खरंतरं मुंबईत राहात असल्यापासूनच होती. कदाचित तिथे प्रत्यक्ष राहण्याची संधी मिळाल्यावर त्यानंतर त्या शहराच्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. पण सरत्या दशकभरात इथल्या मुक्कामात जाणवले की, आता हे शहर नव्हे तर या शहराचे व्यक्तिमत्त्वही आपल्याला काहीसे उमजू लागलेय... या व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे लख्खपणे दिसताहेत आणि कळत-नकळत त्या व्यक्तिमत्त्वाचे गुण आपल्यातही भिनताहेत... भिनताहेत हा शब्दप्रयोग जाणीवपूर्वकच! कारण,व्यक्तिमत्त्वातून लख्खपणे दिसते अन् जाणवते ती ॲटिट्यूड... अन् नेमकी हीच ॲटिट्यूड मला या शहराने दिलेली गिफ्ट आहे. असे वाटते... ॲटिट्यूड या शब्दाला 'व्यावहारिक बोली'भाषेत काहीशी नकारात्मक छटा आहे. पण शहराने दिलेली ॲटिट्यूड यामध्ये माझ्यातील एका भारतीयाची, माझ्यातील व्यावसायिक ॲप्रोचची अन् वेळ आली तर प्रखरतेने प्रकाशित होणारी अस्मिता दडली आहे असे मला वाटते.

त्यामुळेच, दहा वर्षांपूर्वी या शहरात आलेली मी





आणि आजची मी यातील भेद मला स्पष्टपणे मांडता येतो. दहा वर्षांचा येथील कालावधी हा माझ्या करिअर किंवा अन्य गोष्टींपेक्षा या शहराने माझ्या व्यक्तिमत्त्वावर काय आणि कसे पैलू पाडले, याचा हा खरंतर प्रवास आहे आणि या लेखाच्या संधीद्वारे माझ्या येथील वास्तव्यातील अनुभवाचा हा छोटासा बटवा रिता करण्याचा प्रयास यानिमित्ताने मी करणार आहे.

खरंतरं हे शहर जेमतेम माझ्या वयाएवढे... अर्थात चाळीशीचे. पण अमेरिका आणि ब्रिटनपेक्षाही दुबई, सिंगापूर या शहरांच्या नावाचा उच्चार झाल्यानंतर भारतीय लोकांच्या डोळ्यांत जी एक कुतूहलमिश्रित 'सोनेरी' चमक दिसते ना, तसेच माझेही व्हायचे. अर्थात परदेशात जाऊ, नोकरी करू, स्थिरावू असा काही आयुष्याचा रोडमॅप ठरलेला नव्हता. पण करियरच्या प्रवासाने स्वतःला ट्रॅकऐवजी रन वेवरच नेऊन ठेवले आणि नव्या संधी आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी पंखांचा पसारा विस्तारला. जरी मुंबईच्या संस्कृतीचे संस्कार असले तरी दुबईत जायचे जेव्हा ठरले, तेव्हा अर्थातच एकदम नव्या सांस्कृतिक, आर्थिक सेटअपमध्ये जायेच दडपण होतेच. पण, तिथे गेल्यावर दुबई म्हणजे मुंबईची पुढची आवृत्ती हे त्या शहराचे व्यक्तिमत्त्व अगदी चटकन उलगडले.

कॉस्मोपोलिटन शहर म्हणून मुंबईचा लौकिक अगदी ती अस्तित्वात आल्यापासूनचा. महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक मुंबईत येतात, स्थिरावतात... कदाचित दुबई हे शहर त्याचीच पुढची आवृत्ती. जगाच्या कानाकोपऱ्यातून जागतिक व्यापार केंद्र मानल्या जाणाऱ्या या महाकाय शहरात लोक येतात. जोपर्यंत हात चालू शकतात आणि संधी उपलब्ध आहेत तोवर इथे काम करतात आणि पुन्हा नव्या दमाच्या लोकांकरिता संधी उपलब्ध करून इथून माघारी वळतात. याचे कारण अर्थातच आपल्याला ठाऊक असेल. ते म्हणजे, या शहरात आपल्याला जोवर नोकरी किंवा काही उद्योग आहे तोवरच वास्तव्य करता येते. इथे नागरिकत्व मिळत नाही. विंचवाचे बिऱ्हाड घेऊनच इथला संसार ! त्यामुळे नोकरी लागली की इथूनच निवृत्ती हा विचार दूरचीच बाब. याचा प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष फायदा असा की, प्रत्येकाला आपल्या कौशल्याला कायमच नवी धार लावावी लागते. यामुळेच चलता है, होईल रे, करू रे, बघू रे... या शब्दांचा पोकळपणा इथे उमगला!

जागतिक व्यापार केंद्र म्हणून लौकिक असलेल्या या आंतरराष्ट्रीय शहराचा मुख्य गुण म्हणजे येथील वेग आणि स्पर्धा. मूळ मुंबईकर असल्यामुळे वेगाचा संस्कार जन्मजात आहे. पण इथल्या स्पर्धेमध्ये एक गुणात्मक फरक आहे तो असा की, २० लाखांच्या आसपास लोकसंख्या असलेल्या या शहरात साडेनऊ लाखांच्या आसपास परदेशी नागरिक आहेत. दोन-पाच नव्हे तर २५ ते ३० देशांतील लोकांचे इथे वास्तव्य आहे. आजूबाजूचे स्पर्धक हे अमेरिकी, युरोपियन, रशियन, लेबनीज, चीनी, पाकिस्तानी असे सहकारी असतात. आपल्या देशातून बेस पक्का करून कौशल्य जोखण्यासाठीच इथे आलेले असतात. त्यामुळे त्यांच्यासोबत एखाद्या प्रकल्पावर काम करताना 'मागील पानावरून पुढे' असा ॲप्रोच न ठेवता वेळोवेळी आपल्या कौशल्याला नव्या अभ्यासाची धार लावणे ही अपरिहार्य गोष्ट आहे.

विविध देशातील नागरिक, त्यांची कौशल्ये, जडणघडण याचा एकीकडे अभ्यास जेव्हा मनाने करण्यास सुरुवात केली तेव्हा, जसे आपण इतरांना जोखतो-तपासतो तसेच आपल्यालाही असेच जोखले जात असेल, याची भावना मनाला कायम स्पर्शून जाते.

दुबई शहर हा जागतिक संधींचा पट असल्याने

आपल्या प्रत्येक कृतीचा अर्थ, संबंध किंवा एखाद्याने आपल्याला जोखणे, याचा संबंध हा थेट आपल्या देशापर्यंत लागू होण्याची शक्यता असते. त्यामुळे 'भारताचे ब्रँड ॲम्बेसेडर' याचे पक्के भान डोक्यात बाळगावे लागते. गेल्या दहा वर्षांत जितके स्पर्धात्मक शिकायला मिळाले, तितकेच या देशाच्या संस्कृतीचे नवनवीन कंगोर बघायला मिळाले.

अरेबिक समाजाला गोपनीयता प्रिय आहे. त्यामुळे त्यांची संस्कृती, रीतिरिवाज जाणून घेणे सोपे नाही. तरीही 'कल्चरल इंडिकेटर' म्हणून ज्या खुणा प्रकर्षाने जाणवलेल्या त्या इथे मांडण्याचा प्रयास करत आहे.

वेशभूषेपासून, माणसांच्या आणि शहराच्या व्यक्तिमत्त्वापर्यंत आणि दिनचर्येपासून सामाजिक जीवनापर्यंत साऱ्यातून या कल्चरल इंडिकेटरच्या खुणा अगदी ठळकपणे प्रदर्शित होत राहतात.

**वेशभूषा** : विमानातून बाहेर आल्यानंतर इमिग्रेशन विभागात प्रवेश करतो, त्यावेळी विमानतळावरील भव्यतेसोबतच त्या विभागातील विविध काऊंटरवर बसलेले अन् दिमाखदार पद्धतीने पारंपरिक अरबी वेश परिधान केलेले कर्मचारी आपल्याला मनात भरतात. दुबईत पहिल्यांदा



गेले तेव्हा याच कल्चरल इंडिकेटरची खूण सर्वात आधी मनावर ठसली होती. त्यांच्या वेशभूषेचा बाज आणि देहबोली अन् व्यक्तिमत्त्वातून प्रतिबिंबित होणारा आब बघून खरंतर थोडं दपडून जायला होते. पण जेव्हा पारंपरिक वेशभूषा हीच दैनंदिन वेशभूषा म्हणून दिसते त्यावेळी स्वाभाविकच त्या देशाबद्दल, लोकांबद्दल आणि त्यांच्या वेशभूषेबद्दल अधिकच आकर्षण अन् कुतूहल वाढते. इथल्या पुरुष आणि स्त्रियांच्या पारंपरिक आणि दैनंदिन अशा वेशभूषेबद्दल ढोबळमानाने सांगायचे तर पुरुष साधारणपणे पांढरा शुभ्र डौलदार असा नखशिखान्त 'कफनी'सदृश वेश परिधान



केलेले दिसतात. याला 'कंधुरा' किंवा 'डिश-डेश' असे म्हणतात, तर महिला ज्या काळ्या पेहरावात दिसतात, त्याला 'अबाया' असे म्हणतात. पण त्यांच्या कपड्यातील वैविध्य इथेच संपत नाही.

प्रथमदर्शी एकसुरी वाटलेल्या पेहरावातही किती छटा आहेत हे हळूहळू लक्षात आले. वेगवेगळ्या आखाती देशात गेल्यानंतर सगळीकडेच जरी लोक कंधुरा परिधान करत असले तरी त्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. कतार, बाहरिनमध्ये कंधुऱ्याला शर्टासारखी कॉलर, तर कुवेतमध्ये एक बटण असलेली बंद कॉलर, तर सौदीमध्ये दोन बटणे बंदची कॉलर व शर्टासारखे स्लीव्ज् अशा पद्धतीची रचना दिसते. दुबईमध्ये इमाराती पद्धतीत कॉलर नसते आणि त्याचे फिटिंगही थोडे ढिले किंवा सुटसुटीत असते. या कंधुऱ्याचा साधारणपणे पांढराच रंग दिसत असला तरी, या पांढऱ्या रंगात १५ छटा (शेडस्) उपलब्ध आहेत. शिवाय पांढऱ्याशिवाय तब्बल ६०० रंगात कंधुरा शिवता येतो. लक्षणीय गोष्ट म्हणजे, पुरुषांचा कंधुरा तुम्हाला कधीच घाण, मळलेला किंवा सुरकुतलेला असा दिसणार नाही. असं म्हणतात की एका अरब पुरुषाच्या कपाटामध्ये या कंधुराचे एकावेळी किमान ३० सेटस् तयार असतात आणि किमान २० सेटस् हे लाँड्रीमध्ये ड्रायक्लिनिंगसाठी दिलेले असतात.

टापटीप आणि नीट, नेमकेपणाचे आणखी एक उदाहरण सांगायचे तर, त्यांच्या डोक्यावरचा रेखीव पद्धतीने (सिमेट्रिकली) परिधान केलेला स्कार्फ, त्याला 'घतरा' असे म्हणतात. घतरा घालायच्या बऱ्याच पद्धती आहेत. अर्थात, पद्धत कुठलीही असली तरी त्या पद्धतीत प्रावीण्य दिसून येते. तो सरकू नये म्हणून वर घातलेले कॉन्ट्रास्ट रंगाचे (पण, बहुतांश वेळा काळ्याच रंगाचे) 'अगाल', एक युनिक फॅशन स्टेटमेंटची प्रचीती देते.

आपल्याला वरकरणी वाटतो तितका हा वेश सरधोपट नाही. विशेषतः घतऱ्याच्या खाली घातलेल्या टोपीवरील कलाकुसर केलेली बारीक नक्षी त्यांच्यातील सौंदर्याबाबत

असलेली संवेदनशीलता प्रतिबिंबित करते.

अत्तर हाही इथल्या फॅशनचा एक अविभाज्य घटक आहे, पण हे अत्तर तेलयुक्त असल्याने कपड्यांना डाग पडू शकतात. यासाठी इमाराती पुरुष गंधुर्याला छोटा गोंडा म्हणजे तरबूश लावतात. तरबूश अत्तरात भिजवून टाइसारखा लावता येतो आणि कंधुऱ्याची शुभ्रता कायम राखली जाते!

महिलांच्या साचेबद्ध कपड्यातही डिझाईनचे अनेक उत्कृष्ट नमुने पाहायला मिळतात. 'संयुक्त अरब इमिराती' अर्थात यूएई हा एक पुरोगामी देश आहे. संस्कृती न सोडता अभिव्यक्तीची मारलेली झेप त्यांच्या अप्रतीम 'अबयां'मध्ये दिसून येते. काळाबरोबर इथल्या स्त्रियांनी एक सर्वसामान्य काळ्या 'अबाया'ला आज त्याचा मूळ बाज कायम राखत पूर्णपणे ट्रान्सफॉर्म केले आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. अबया हा ड्रेसच्या बाहेर घालायचा रोब असतो, या अबायाच्या आत इथले स्थानिक 'जेलबिया' घालतात. लांब गाऊनसारखा असणारा हा जेलबिया वेगवेगळ्या आकर्षक रंगात येतो. काहींवर सुरेख प्रिन्टस्, तर काहींवर क्लिष्ट भरतकाम केलेले असते. वेगवेगळ्या प्रसंगासाठी वेगवेगळे जालेबिया असतात. लग्नासाठी अथवा विशेष समारंभासाठी असलेले जालेबिया अतिशय सुरेख आणि भरजरी असतात. अबायांमध्ये बहुतांश डिझाईन्सना किनार असते ती इस्लामिक पद्धतीच्या कलाकुसरीची. बारकाईने केलेले कुशल नक्षीकाम जर निरखून पाहिले तर नक्षीकामाचा उत्कट नमुना पाहिल्याची अनुभूती मिळते. या नक्षीकामात सोनेरी रंगाचा किंवा उत्तम क्रिस्टलचा विशेष वापर अनुभवण्यास मिळतो. ज्यातून त्यांच्या सोन्याची हौस अधोरेखित होते.

डोकं आणि केस कव्हर करण्यासाठी महिला शेला वापरतात. हा तलम अशा कपड्याचा असतो आणि वजनाने अत्यंत हलका. बुरखा हा शब्द परिचयाचा आहे, पण काही आखाती देशांमधे, वयस्कर स्त्रिया एक युनिक बुरखा / बुरगा वापरतात. जो सोनेरी किंवा तत्सम मेटलच्या मुखवट्यासारखा दिसतो. प्रत्यक्षात तो कापडाचा बनवतात, हे कापड भारतातून आयात केले जाते, त्याला निळा किंवा जांभळा विशेष डाय लावला जातो आणि त्याला चमक येईपर्यंत एका काचेच्या बॉलने त्याला पॉलिश केले जाते.

इथल्या वातावरणामुळे जरी कपड्यांचे बेसिक स्वरूप सारखेच वाटले तरी नीट पाहिल्यावर दिसते ती वैविध्यता. प्रत्येक अरेबिक स्त्री व पुरुषाच्या पेहराव्यात दिसते ते एक अनोखे मिश्रण, त्यांचे संस्कृतीबद्दलचे प्रेम, त्यांचे स्वतःचे युनीक व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे आगळवेगळं फॅशन स्टेटमेंट.

**अत्तर** : अत्तर किंवा पर्फ्यूमला अरेबिक संस्कृतीमधे विशेष महत्त्व आहे. मूलतः इटालियन शब्द पर्फ्यूमरे म्हणजे चक्क धुराच्या माध्यमातून पुढे पर्फ्यूम म्हणून प्रचलित झाला.


प्राचीन काळी एका विशिष्ट झाडाचा वाळवलेला सुगंधी चीक ज्याला आपण धूप म्हणूनही ओळखतो, तो जाळून येणारा धूर आपल्या प्रार्थना घेऊन स्वर्गात जातो अशी आख्यायिका होती. फक्त हिंदूच नव्हे तर मुस्लिम आणि ख्रिस्ती समाजातही धार्मिक प्रसंगांना सुगंधी धूप जाळण्याची प्रथा होती. तंत्रज्ञान जसे प्रगत होत गेले, हाच पर्फ्यूम आधी essential oils, म्हणजे तैलरूपात आणि मग त्यात आल्कोहॉल मिश्रित spray च्या रूपात दिसू लागला. आज तुमच्या-माझ्यासारख्या सर्वसामान्य लोकांसाठी पर्फ्यूम




म्हणजे स्प्रे असे एक गणितच झाले आहे. पण अरब संस्कृतीने मात्र जुन्या पारंपरिक पर्फ्यूमचा वारसा खूप कलात्मकतेने जपलाय. सुवासिक तरीही बऱ्याच स्ट्राँग अशा या अत्तराचा वापर येथील लोक हात सैल सोडून करतात. अंगावरच नव्हे तर, कपड्यांवर, केसांवर, हातांवर आणि काहीजण चक्क चेहऱ्यावर अत्तर लावतात. जेणेकरून त्यांच्या आजूबाजूला, हस्तान्दोलन करताना आणि अरेबिक पद्धतीने गालावर गाल किंवा नाकावर नाक लावून हलके चुंबन देतानाही हा सुगंध दरवळतो.

अरेबिक पर्फ्यूमचा मुख्य घटक आहे धूप, जो ओमान आणि सोमालियामध्ये छोट्या झाडांवर डिंकाच्या स्वरूपात आढळतो. याशिवाय पर्फ्यूममध्ये जाई, अंबर, कस्तुरी, गुलाब आणि उद इत्यादी आढळतात.

कस्तुरीचा सुगंध अधिक काळ त्वचेवर दरवळण्यासाठी वापरला जातो. तर सौदी अरेबियामध्ये तैफच्या खोऱ्यात





मिळणाऱ्या गुलाबांपासून गुलाब तेल बनवले जाते, जे खास करून पुरुषांच्या पर्फ्यूममध्ये वापरले जाते. भारतात आसाममध्ये वाढणाऱ्या आगार झाडाच्या सालीपासून ऊद किंवा आउद मिळतो. ज्याचा तेलार्क अत्तरात वापरला जातो.

आगारवूडचे झाड दुर्मिळ आहे, एक किलो आगारवूड-मधून एक मिलीइतकेच तेल मिळू शकते. त्यामुळे त्याची किंमत सोन्याहूनही जास्त असते. जितके तेल जुने, अधिकाधिक महाग होत जाते. दुबईमधे काही तुरळक दुकानांतच १००-१५० वर्षांपूर्वीचे आगारवूड तेल पाहायला मिळते. गडद लालसर तपकिरी दिसणारे हे लाकूड काय गुणवत्तेचे वा किती किमतीचे असेल याची एका नजरेत पारख करणारे काही पारंपरिक परखीदेखील इथे आहेत.

अंगावर लावायच्या अत्तर आणि शुद्ध नैसर्गिक सुगंधी तेलाव्यतिरिक्त अजून दोन सुगंध, अरब संस्कृतींमध्ये दरवळतात, ऊद आणि बखहूर. कोळशाच्या जळणाऱ्या तुकड्यावर चिमूटभर बखहूर किंवा छोटी काडी उद टाकताच त्याचा सुगंध पूर्ण घरात पसरतो, आणि वातावरण अस्सल अरबी होऊन जाते. हा धूर अरबिक लोक त्यांच्या कपड्यांमधे, कपाटात आणि कधी कधी केसातसुद्धा घालतात.

प्रचंड उकाडा व दमट हवामान आणि त्यात पाण्याची कमतरता ही जरी अत्तर वापरायची सहज कारणे असली तरी, अरब संस्कृतीमध्ये अत्तरला फक्त गरज यापलीकडे स्थान आहे. सुगंध आजूबाजूचे वातावरणच नाही तर अंर्तमनसुद्धा शुद्ध करू शकतो अशी इथे मान्यता आहे.

**कला :** संगीत, नृत्य, कला आणि साहित्य हे कुठल्याही संस्कृतीचे महत्त्वाचे घटक असतात. कलेतून एखाद्या समाजाचे प्रतिबिंब दिसू शकते, त्या समाजाचा इतिहास, त्यांचा संघर्ष हेच नाही तर त्यांची भविष्याची स्वप्न हे सारे प्रतीत होते. ज्यांची गणना नैसर्गिक ऊर्मी म्हणून केली जाईल, त्यात नृत्य हा प्रकार वरच्या क्रमांकात मानावा लागेल.

दुबई शहराने सर्व देशांच्या कलाकारांना व्यासपीठ दिले आहे. मग ते बॉलीवूडचे चित्रपट असो वा देशोदेशीचे वेगवेगळ्या शैलीचे गायक आणि परफॉर्मन्स. सर्वांना दुबईने रसिक श्रोता/प्रेक्षक उपलब्ध करून दिलाय, पण हे करताना त्यांचे लोकसंगीत आणि लोकनृत्य त्यांच्या तरुण पिढीनेसुद्धा मनापासून जपले आहे. आजही ईद, नॅशनल-डे, लग्नसमारंभात आवर्जून पारंपरिक नृत्य केले जाते. या नृत्याची परंपरा खूप जुनी आहे.

वाळवंटाच्या खडतर जीवनात वेगवेगळ्या लढाया, संघर्ष ह्यांना सामोरे जाताना कधी या कलेने त्यांना थोडे मनोरंजन दिले असेल, तर कधी ही कला त्या संघर्षाची भाषा बनली असेल असे वाटते. योला, अय्यला किंवा हरबियाह् असे वेगवेगळे नृत्यप्रकार पाहायला मिळतात. हे सगळे प्रकार तत्कालीन युद्धाच्या गोष्टी किंवा युद्धानंतरचा विजय व्यक्त करणारे असले तरी प्रत्येकात एक वेगळी खासियत असते.

युद्धासाठी अरबिक शब्द, हरबपासून हरबियाह् हा शब्द आलेला दिसतो. या प्रकारात अरबिक पुरुष हातात एक काठी घेऊन एका तालावर नृत्य करतात. ही काठी तलवारींचे प्रतीक असते. युद्धाचे वातावरण निर्माण केले जाते. ढोल-ताशे आणि जल्लोष करून नृत्याची सुरुवात होते. दोन ओळीत भाग घेणारे उभे राहतात. प्रत्येक गटाचा एक मुखिया असतो जो त्यांचे मनोबल वाढवत, त्यांना प्रोत्साहन देत, नेतृत्व करत असतो. गाणी आणि त्यावरच्या ठेक्यात हल्ले, प्रतिहल्ले होत असतात.

शेवटच्या भागात, विजय साजरा करण्याची गाणी आणि नृत्य केले जाते. स्त्रियांच्या नृत्यकलेतून लकबदार, नाजूक नजाकती डोळ्यांचे पारणे फेडतात. पुरुषांच्या नृत्यात



समूहात नृत्य करतात.

आजूबाजूच्या देशातील नृत्यकलांनाही इथल्या संस्कृतीने आश्रय दिला आहे. इजिप्तमधून आलेला काहीसा मादक, पण तितकाच कौशल्यपूर्ण बेल्ली डान्स सर्वांना माहीत असेलच. तसेच टर्कीमधून इथे प्रचलित झालेला तनोरा डान्स आवर्जून पाहण्यासारखा आहे. सुफी संतांसारखा स्वतःभोवती गिरक्या घेत एक तनोरा नर्तक खऱ्या अर्थाने कलेतून मनोरंजनाबरोबर आध्यात्मिक अनुभव देऊन जातो.

नृत्य म्हटले की संगीत आणि काव्य आले. इथल्या कविता आणि गाण्यांमधे देवाची स्तुती, प्रेम, कुराणामधील संदर्भ, तर कधी वाळवंटातील संघर्षाच्या गोष्टी ऐकायला मिळतात.

भरपूर समुद्रकिनारा असल्याने तेलाचा शोध लागण्याआधी इथल्या स्थानिक लोकांची रोजगाराची साधने होती मासेमारी. आणि त्यातून पुढे आलेली पर्ल डाइविंग. दोन्ही कामांसाठी इथल्या लोकांना त्यांच्या नावांवर समुद्रात आत बराच वेळ काढावा लागत असे.

त्यांच्या लोकसंगीतातून अशा आशयाची गाणी देखील ऐकायला मिळतात. आपल्याकडच्या कोळीगीतांप्रमाणे समुद्राबद्दलचे प्रेम, आदर, घरी वाट पाहणारे कुटुंबीय, त्यांची आठवण ह्यांचा उल्लेख लोकगीतांमधे आढळतो.

तसेच खडतर जीवन आणि श्रमाचे काम असल्याने, एक ताल असलेली साधी सोपी गाणी ऐकायला मिळतात, जी कामे करता करता सहज म्हणता येऊ शकतात.

अरेबिक संस्कृतीमध्ये संगीत हा विषय थोडा विवादास्पद असला तरी कधी सर्वसामान्य माणूस भावना व्यक्त करताना तर कधी सूफी संत परमात्म्याच्या जवळ जाताना संगीताचा आधार घेताना इथेही दिसतो. विविध वाद्यांचा वापरही इस्लाम पूर्व काळापासून दिसतो. गिटार हे पाश्चात्त्य देशात खास आवडणारे वाद्य अरेबिक प्राचीन वाद्य कितारापासून प्रेरित आहे. याशिवाय अरेबिक संगीतात बासरी, डफ, कनून नावाची इजिप्शियन वीणा, संतूर अशी अनेक वाद्ये प्रचलित आहेत. पण अरेबिक संगीताला खरा अरेबिक बाज देणारे वाद्य म्हणजे ऊद.

ऊद हे एक तार वाद्य आहे. प्राचीन ऊद ४-५ तारी, तर आधुनिक ११ तारी असतो. कलिंगडासारख्या दिसणाऱ्या मोठ्या फुगीर बेसमुळे यातून येणारा आवाज दुमदुमणारा वाटतो, जो क्षणात वाळवंटाचे चित्र डोळ्यांसमोर उभे करणारा असतो. सुरुवातीला बऱ्यापैकी रुक्ष वाटलेल्या या अरब

जी सहजता आणि मोकळेपणा दिसून येतो, तसाच मोकळेपणा हा स्त्रियांच्या नृत्यातूनही दिसून येतो. 'समता' आणि 'समानता' या दोन्ही मुद्द्यांना अरबांच्या संस्कृतीत अनन्य-साधारण महत्त्व असून स्त्री आणि पुरुष यांच्यातील समानता अनेक ठिकाणी प्रतिबिंबित होते.

त्यातील नृत्य हा एक आविष्कार. स्त्रियांना अरबिक संस्कृतीमध्ये मानाचे पान दिले जाते. स्त्रियांना स्वतंत्र अभिव्यक्ती आहे हे तिथे केवळ संकल्पनेच्या नव्हे तर जाणिवेच्या पातळीवर लोकांना मान्य आहे. स्त्रियांच्या नृत्याला नाशत् असे म्हणतात. नाशत्चा अर्थ चैतन्य, आनंद. हे नृत्य कलात्मक तसेच काहीसे असामान्य आहे. ह्यात स्त्रिया आपले सुरेख पोशाख घालून समूह नृत्य करतात.

संगीताच्या ठेक्यावर हात-पायच नाही तर त्यांचे लांबसडक मोकळे केस विलक्षण नृत्य करताना दिसतात. लांब केस हे इथल्या स्त्रियांच्या सौंदर्याचे खास वैशिष्ट्य आहे, त्याला संगीताची आणि लयीची अशी काही किनार जोडली जाते की पाहणारा थक्क होऊन जातो.

पारंपरिक नृत्यांगना एक खास कलाकुसर केलेला लांब पोशाख तोब-अल-नशाल आपल्या सोबत समारंभाला घेऊन येतात, जो नृत्याच्या वेळी पारंपरिक पोशाखावर घातला जातो. हे नृत्य करताना किमान चार स्त्रिया असाव्यात असा नियम आहे. कदाचित हा एक सुरक्षिततेचा सल्ला असावा. तसेही बहुतांशी स्त्रिया आणि पुरुष वेगवेगळ्या



संस्कृतीमधे कलेचे एकाहून एक उत्तम नमुने पाहून पुन्हा एकदा विश्वास बसला, की कला ही केवळ एक अभिव्यक्ती नसून ती मनुष्याला इतर प्राण्यांपेक्षा वेगळे करते. त्यांच्यातील भावना, माणुसकी जागी ठेवते.

**सण** : भारतासारखा हजारो वर्षांचा इतिहास इथे नाही, तरी खूप विविधता असलेले सण इथे बघायला मिळतात. यूएई हा असा एक दुर्मिळ प्रांत आहे जिथे परंपरा आणि आधुनिकता ह्यांचा दुग्धशर्करा योग बघायला मिळतो. इस्लामिक परंपरेनुसार सगळ्यात महत्त्वाचे असे दोन सण– ईद अल फित्र म्हणजे रमझान महिन्याच्या सांगतेचा सण आणि ईद अल अधा हा त्यागाचा प्रतीक असलेला हज वरून परतलेल्या भाविकांचा सण. हे पारंपरिक सण जितक्या जल्लोषाने साजरे केले जातात तितक्याच जोशात यूएई नॅशनल–डेसुद्धा सणासारखा साजरा केला जातो.

याशिवाय अल दफ्रा फेस्टिवल, आर्ट ॲण्ड म्युझिक फेस्टिव्हल अशा सांस्कृतिक सणांनाही इथे राष्ट्रीय स्तरावर महत्त्व आहे. सणांमधे अरब संस्कृतीचे विविध पैलू समोर येतात. धर्माशी आणि परंपरेशी घट्ट बांधेलेली जीवनशैली, कलेची आवड, हौस मौज आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांची कौटुंबिक आणि सामाजिक बांधिलकी प्रकर्षाने सर्व सणांमधे जाणवते.

सणाच्या दिवशी शहरातील सर्व महत्त्वाची स्मारके सर्वसामान्यांसाठी खुली केली जातात. इथल्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. रस्ते, मॉल्स, मोठ्या इमारती सर्वांवर रोषणाई केली जाते. भव्य आणि तितकेच कलात्मक फटाक्यांचे शोज केले जातात. सगळं शहर सणाच्या आनंदात बुडून जातं. मग तो सण तुमच्या धर्माचा असो वा नसो, तुम्ही आपोआप या सोहळ्यात विलीन होऊन जाता.

कौटुंबिक बांधिलकीप्रमाणेच सामाजिक बांधिलकीही प्रत्येक सणात अधोरेखित केलेली दिसते. खासकरून रमझानच्या महिन्यात. आणि त्यानंतर येणाऱ्या ईदमधे खूप दान–धर्म केला जातो. याच काळात वर्षभर कमावलेल्या संपत्तीवर इस्लामिक संकल्पनेनुसार जकात देण्याची प्रथा आहे. हा एक प्रकारचा टॅक्स असतो, जो गरीबांच्या हितासाठी वापरला जातो.

रमझानचा पूर्ण महिना एक सोहळा असतो, एकीकडे रोज उपवास सोडताना होणाऱ्या इफ्तारमधे लोक एकमेकांना भेटत कौटुंबिक नात्यांमधे पुन्हा रंग भरत असतात, तर दुसरीकडे मस्जिदींमधे हजारो आश्रितांना कपडे, जेवण इत्यादींचे वाटप करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत असतात. बहुरंगी आणि बहुढंगी सांस्कृतिक पसाऱ्यात वावरताना काहीवेळा गोंधळाची परिस्थितीही निर्माण होते. पण, उत्तर शोधायलाही आजूबाजूची परिस्थितीच मदत करते. शेवटी मानवी मूल्ये सारखीच असतात, ती व्यक्त करायची पद्धत वेगवेगळी असू शकते.

बऱ्याच गोष्टी नवीन असतील, अपरिचित असतील... त्यांचा अर्थ जाणून घ्यावा लागेल. कधी आपल्यापेक्षा चांगल्या गुणांना ॲप्रीशियेट करावे लागेल, तर कधी आत्मसातही करता येईल. हे करत असताना फक्त जपायला लागते ती आपली आयडेंटिटी. मग अबाया घातलेलीही मीच अन् साडी नेसलेलीही मीच.

**– शिल्पा मोहिते–कुलकर्णी**
shilpa@w3mark.com

# मराठी रंगभूमी दुबईची




श्रीकांत/उमा राळे

**दुबईच्या महाराष्ट्र मंडळाच्या रंगभूमीला खरे मूर्त रूप दिले ते श्रीकांत राळे आणि उमा राळे या दांपत्याने! आपला अमूल्य वेळ व शक्ती खर्च करून, मंडळाचे सांस्कृतिक रूपच बदलले. बाळगोपाळांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचे मनोरंजन केले. लहान-मोठ्यांसाठी स्वलिखित किंवा व्यावसायिक नाटके सादर करून मराठी पावले मंडळाकडे वळवली! रंगभूमीचे प्रवासवर्णन श्रीकांत/उमाच्या शब्दांत!**

१९७० चा काळ होता. दुबईकडे येणारा लोकांचा ओघ वाढत चालला होता. खरं म्हणजे त्या काळात दुबईविषयी अनेक प्रकारचे उलटसुलट अनुभव, समज-गैरसमज ऐकू येत होते. दुबईत चोऱ्यामाऱ्या होतात, बायका सुरक्षित नाहीत, प्यायचे पाणी मिळत नाही, नोकरीसाठी एजंट लोकं फसवतात. एक ना अनेक! पण इतके असूनही दुबई सर्वांना खुणावत होती, दुबईबद्दलचे आकर्षण वाढत चालले होते, ते तिथल्या पैशामुळे! दुबईला सुवर्ण नगरी म्हणूनच ओळखले जायचे.

दुबईत प्रथम पाऊल टाकताना सर्वांच्याच मनात धाकधूक असायची, भीती असायची. कित्येक लोकं तर फॅमिलीला भारतात ठेवून, पैसे कमावण्यासाठी एकटेच इथे येत होते आत्ताची दुबई व ७०-८० मधील दुबई यात जमीन-आस्मानाचे अंतर होते. येथील कायदेकानून व्यवस्थित नव्हते, डोक्यावर सदैव भीतीची टांगती तलवार असायची. नोकरीचे टेन्शन असायचेच. बसेस-मेट्रो नव्हत्या. आपला देश, माणसं, भाषा, संस्कृती, सणवार, रीतीरिवाज सर्व सोडून माणसं इथे येत होती. मराठी पावलेही हिंमत करून देशाबाहेर पडत होती. सर्वांचा हेतू एकच होता, चार पैसे गाठीला बांधायचे व आपल्या देशात परत जायचे. काम, ऑफिस सांभाळून, इतर गोष्टींना, सामाजिक बांधिलकी स्वीकारायला कोणालाही वेळ नव्हता. त्यामुळे करमणुकीची काहीच साधने नव्हती. नाही टीव्ही, नाही सिनेमा, नाही क्लब, नाही महाराष्ट्र मंडळ! सामाजिक जीवनापासून पूर्णतः दूर!





पण लवकरच, इथे आल्यानंतर काही मराठी कुटुंबांनी– नाना शहाणे, माधव साठे, दादा गर्दे, दातीर, बाळासाहेब गोखले अशा काही मान्यवरांनी मिळून प्रथम गणपती घरी आणून घरगुती स्वरूपात गणेशोत्सव साजरा केला. हळूहळू एकेक सण साजरा होऊ लागला व महाराष्ट्र मंडळाची कल्पना पुढे आली आणि मंडळाची स्थापना झाली. बघता बघता मंडळ वाढू लागले. सभासदांची संख्या वाढू लागली. थोडेफार सांस्कृतिक कार्यक्रम साजरे होऊ लागले. मुख्य म्हणजे मंडळाच्या छत्राखाली मराठी माणसे एकत्र जमू लागली, एकमेकांना भेटू लागली. स्थानिक हौशी कलाकार नाटक सादर करीत. पण त्या काळात कार्यक्रमांचे प्रमाण खूपच कमी होते.

मराठी रंगभूमीच्या वेडाने झपाटलेले आम्ही जेव्हा ८०च्या सुमारास प्रथम दुबईत पाऊल टाकले तेव्हा आम्हाला सर्वात रुखरुख लागली ती आपल्या नातेवाईकांप्रमाणे आपल्या मुंबईच्या रंगभूमीला मुकणार याची! कारण लहानपणापासून आम्हा दोघांनाही मराठी रंगभूमीचे वेड होते. रंगमंचाच्या आठवणीने आमच्या डोळ्यांत पाणी उभे राहत होते. पण जसजसा काळ लोटू लागला तसतशी रुखरुख कमी होत गेली. कारण आम्हाला दुबईचा रंगमंच मिळाला. पहिल्याच वर्षी २० मिनिटांचा स्लॉट मिळाला. तेवढ्या वेळेत एकांकिका होणे शक्य नव्हते, म्हणून 'अशीच एक सकाळ' ही एक नाटिका सादर केली. त्याला प्रेक्षकांची जी 'वाहवा' मिळाली, तीच पुढच्या यशाची नांदी ठरली व तेथूनच आम्ही नाटकमय होऊन गेलो.


आम्ही आपले व्यवसाय सांभाळून त्याबरोबर आपला छंद जोपासायला सुरुवात केली व घरादारापासून लांब आलेल्या मराठी माणसाचे मन पण रिझविले गेले. प्रथम आम्ही मंडळातील बाळगोपाळांच्या नाटकाने सुरुवात केली. प्रथम 'बॉबीची गोष्ट', त्यानंतर 'म्हणे आम्हाला नाटक करता येत नाही', 'असेही एक रामायण', 'झाली काय गंमत', 'दुर्गा झाली गौरी' अशी अनेक नाटके एकामागून एक वर्ष सादर केली व मंडळाच्या सभासदांना रखरखीत वाळवंटात थंडावा मिळत गेला.

लहान मुलांची नाटके बसवणे म्हणजे खरोखरच दिव्य होते. दिवसभर आपापले व्यवसाय करून सायंकाळी नाटकाच्या तालमी होत. वय वर्षे २ ते १२ या वयोगटातील मुले! एका नाटकात ३०–३५! या सर्वांना एकत्र जमवणे, नाटकाच्या तालमीसाठी स्वतःचे घर वापरायला देणे, तेथे मुलांचा गोंधळ, आरडाओरडा, भांडण, शेजाऱ्यांच्या तक्रारी आणि सर्वात दिव्य म्हणजे मराठी बोलता न येणाऱ्या मुलांकडून मराठी संवाद पाठ करून घेणे म्हणजे तारेवरची कसरत होती. या नाटकांमुळेच मुले मराठी बोलायला शिकली व यात खूपच आनंद वाटायचा. नाटकाच्या दिवशीची धावपळ तर विचारूच नका. ३०–३५ मुलांना एकदम रंगमंचावर काम करायला सांगणे म्हणजे मोठी परीक्षाच होती. कोणी उशिरा येणार, कोणी घाबरणार, आयत्यावेळी स्टेजवर रडायला लागणार, काही व्रात्य मुले रडक्या मुलांच्या मुद्दामहून खोड्या काढणार, रुसगे–फुगवे, आयत्यावेळी टेन्शन यायचे; पण आता आठवले तरी हसून हसून पुरेवाट होते. यातूनच मुले कित्येक गोष्टी शिकतात पण! याचेच उदाहरण म्हणजे 'बॉबीच्या गोष्टी'तील बॉबी– अनघा राळे हिनेच 'दुर्गा झाली गौरी' हे नाटकही बसवले.

लहान मुलांच्या नाटकाला सर्व सभासदांनी–प्रेक्षकांनी दिलेला प्रतिसाद खरोखरच वाखाणण्याजोगा होता. दररोज वेळेवर मुलांना तालमीसाठी आणणे आणि सांगितल्या वेळेप्रमाणे मुलांना घेऊन जाणे, त्यांच्याकडून मराठीतील संवाद घरी पाठ करून घेणे, प्रत्यक्ष नाटकाच्या दिवशी नाटकासाठी लागणारी सर्व मदत करायला पालक नेहमीच तत्पर असायचे. सर्वांचा उत्साह बघून आम्हालाही आनंद वाटायचा व म्हणूनच थोडा फार त्रास सहन करावा लागला तरीसुद्धा एकामागून एक अशी बालनाट्ये आम्ही बसवत गेलो.

लहान मुलांच्या नाटकाने विश्वास दिला व मोठ्यांची नाटके बसवण्याचा निर्णय घेतला गेला.

मोठ्या माणसांची नाटके बसवणे हा एक आणखी वेगळाच अनुभव होता. आधी नाटकाची निवड करणे, त्यासाठी ते पुस्तक शोधणे, दुबईत कोणाकडे नसले तर ते भारतातून मागवणे, त्याच्या कॉपीज काढणे, कोणती भूमिका कोणाला द्यायची यावर विचारविनिमय, त्याला/तिला वेळ



आहे की नाही हे विचारणे (कारण प्रत्येक जण नोकरी-धंदा सांभाळून हौस म्हणून भाग घेत होता), नाटकाच्या तालमी कोणाकडे करायच्या, कारण महिना महिना तरी तालमी चालायच्या, दररोज रात्री किंवा सुट्टीच्या दिवशी दिवसभर, म्हणजे घरात तसे सर्व डिस्टर्ब व्हायचेच, पण नाटकाच्या हौसेपुढे काहीही ॲडजेस्ट व्हायचे, सर्वांकडून पाठांतर करवून घेणे, नाटकाचे दिग्दर्शन करणे, कित्येक नाटकांत आमच्यापैकी एकजण काम करायचो तर कधी दोघेही! मग तेव्हा तर बघायलाच नको! कोणालाही न दुखावता, ओरडता, खुबीने गोड बोलून त्यांच्याकडून काम करवून घेणे म्हणजे मोठी कलाच होती.

नाटक बसत असतानाच एका बाजूला वेशभूषा, केशभूषा, यावर विचार चालू होई. कित्येक भूमिकांसाठी costumes मुंबई-पुण्यातून आणावे लागत. मेक-अप कोण करणार?, prompting कोण करणार? अशा अनेक छोट्या-मोठ्या गोष्टींचा विचार चालू होई. सर्वजण आपापल्या परीने मदत करायला सदैव तयार असत.

रंगमंच, नेपथ्य व्यवस्था विकास म्हात्रे, आरती म्हात्रे, प्रशांत मुळावकर ह्या त्रयींनी नेहमीच खूपच उत्तम प्रकारे सांभाळली आहे. प्रत्येक नाटकामध्ये त्या नाटकाच्या आवश्यकतेनुसार सेट उभे करणे, फिरता रंगमंच उभारून नाटकाला जिवंतपणा आणण्यामध्ये त्यांचा सहभाग फार मोठा आहे. दुबईच्या रंगमंचावर साकारलेले प्रत्येक नाटक यशस्वी करण्यासाठी काळवेळची पर्वा न करता मेहनत करून ह्या तिघींनी आम्हाला केलली मदत आम्ही कधीच विसरू शकत नाही. कारण प्रत्यक्ष नाटक व त्यासाठी आवश्यक ती रंगमंच सजावट ही दोन्ही हातात हात घालून जातात. दोन्ही गोष्टींचा जेव्हा मेळ घातला जातो तेव्हाच ते नाटक उत्तम होते.

आम्ही सादर केलेल्या सर्व नाटकांत भाग घेतलेल्या सर्व कलाकारांनी मनापासून मेहनत घेतली. आपला अमूल्य वेळ खर्च केला व नाटक यशस्वी केले. प्रत्येक नाटक जेव्हा बसवले गेले, त्यावेळी जणू एक कुटुंब बनायचे. अर्थातच कुटुंब म्हटले की त्यात रुसवेफुगवे, मानपान आलेच. चहाच्या पेल्यातील वादळे पण असायची; पण ती पेल्यातच शमायची. उग्र स्वरूप कधीही यायचे नाही. आज ह्या सर्वांच्या आठवणी आल्या तरी हसू येते. दिवसभर आपापले व्यवसाय सांभाळून दोन-दोन महिने नाटकांची तालीम करून रसिकांचे मनोरंजन करणाऱ्या ह्या कलाकारांनी घरादारापासून दूर आलेल्या मराठी मनाला नक्कीच दिलासा दिला.

'ती फुलराणी' हे महाराष्ट्रात गाजलेले नाटक दुबईतील स्थानिक कलाकरांना घेऊन सादर केले. ते नाटक अतिशय सुंदर प्रकारे साकार झाले. त्यातील विजय राणे यांनी साकारलेली भूमिका अविस्मरणीय होती. या नाटकाला प्रेक्षकांनी दिलेला उदंड प्रतिसाद पाहून आमचा आत्मविश्वास वाढला आणि यातूनच पुढे अनेक नाटके साकार केली.

आणि मग नाटकांची मालिकाच सुरू झाली. दरवर्षी एकतरी नाटक गणपती किंवा दिवाळीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने बसवले जाई. यानंतर 'शांतता कोर्ट चालू आहे', 'लेकुरे उदंड झाली', 'काळे बेट लाल बत्ती', अशी एकापाठोपाठ अनेक गाजलेली नाटके झाली. 'काळे बेट' या नाटकासाठी नेपथ्य आणि रंगमंच सजावट अप्रतिम साधली गेली होती. नाटकासाठी एक मजली किल्ला उभा केला होता. 'सख्खे शेजारी', 'नांदा सौख्यभरे', 'वाजे

पाऊल आपुले', 'अशी पाखरे येती', अशी एकापेक्षा एक सरस नाटके सादर केली. 'अशी पाखरे'चे बेफाम स्टेज–भिंत सरकून माजघर स्वयंपाक घरापर्यंतचा अविस्मरणीय असा सीन सादर केला. या सर्वच नाटकांचे नेपथ्य रंगमंच सजावट ज्या कलात्मकतेने सादर करून नाटकाला जो जिवंतपणा आणला त्याला तोड नाही.

'पोस्ट मार्टेम' हे पूर्णतः प्रायोगिक नाटक सादर केले गेले. पुण्याच्या सदाशिव पेठेतून costumes आणून, 'रायगडाला जेव्हा येते' हे वसंत कानेटकरांचे सुप्रसिद्ध नाटक अप्रतिमपणे सादर केले गेले. 'घाशीराम कोतवाल' या नाटकाला live music दिले स्थानिक कलाकारांनी. 'अंधार माझा सोबती', 'तीन पैशाचा तमाशा' या नाटकांना संगीतकार, गायक व नर्तक हे सर्व कलाकार स्थानिक होते. व.पु. काळे यांच्या कथांवर आधारित एकांकिका सोहळा झाला. खरं सांगायचं तर या नाटकाच्या वेळी सुप्रसिद्ध नट विक्रम गोकले चार दिवस दुबईत राहिले व त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी स्थानिक कलाकारांना मिळाली व बरेच काही शिकता आले.

महाराष्ट्रात गाजलेली अनेक professional नाटके येथे आली; पण स्थानिक कलाकारांनी मेहेनत घेऊन स्वतः सादर केलेल्या नाटकांची मजा काही वेगळीच होती.

रंगभूमीच्या या प्रवासात अशोक काळे, गिरीश व सुरेखा शिरसाळकर, विजय राणे, निखिल फडके, प्रकाश केळकर, ज्योती व अविनाश जव्हारकर, सुनील हत्तंगडी, विकास व आरती म्हात्रे, मुळावकर, लहान मुलांच्या नाटकांच्या स्क्रिप्टमध्ये मेघना वर्तक, उमा राळे अशा अनेकांचे सहकार्य लाभले.

आज महाराष्ट्र मंडळाला ४०हून अधिक वर्षे झाली. आता ह्या वटवृक्षाच्या पारंब्या जमिनीपर्यंत पोहोचल्या आहेत. नाटक, गायन, विविध प्रकारचे साजरे होणारे सणवार, ह्या सर्वांद्वारे महाराष्ट्राची संस्कृती जपण्याचा, पुढच्या पिढीपर्यंत वारसा पोहोचवण्याचा प्रयत्न परदेशातही महाराष्ट्र मंडळाद्वारे केला जात आहे. मंडळाच्या रंगभूमीच्या कुटुंबातील काही सदस्यांनी ह्या जगाचा निरोप घेतला, त्यांची उणीव तर पावलोपावली जाणवते. पण 'show must go on'– हे लक्षात घेऊन यापुढेही दुबईच्या महाराष्ट्र मंडळाच्या रंगभूमीची परंपरा अशीच चालत राहो हीच ईश्वराकडे प्रार्थना!

**– श्रीकांत/उमा राळे**
shrikantr@gmail.com
umarale@yahoo.com

ग्रंथाली


## जगभर कुणीही शिकावी अशी...

## माय मराठी – My Marathi

**मराठी शिकवणारे सुलभ मार्गदर्शन**

**मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेला, ग्रंथालीने प्रकाशित केलेला एक अपूर्व अभ्यासक्रम**

एकात्मिक संभाषणात्मक पद्धतीने पद्धतशीर मराठी शिकू इच्छिणाऱ्या अमराठींसाठी.
'माय मराठी'च्या एका संचात पाठ्यपुस्तक, अभ्यासपुस्तिका आणि विनामूल्य दृक्‌श्राव्य डीव्हीडी यांचा समावेश आहे.




मूल्य
रु.१२५०
1000 रुपये
फक्त

$ 30

प्रकल्प समन्वयक
विभा सुराणा
दीपक पवार

लेखक
सुहास लिमये
जयवंत चुनेकर

टपालखर्च १०० रु.



# कथा वाळवंटाची

नितीन खानापूरकर



वाळवंटाची कथा वाळवंटात पुरून राहिली
अनेक आले अन् गेले, आता दिसे नाही सावलीही!
आम्हीही आलो इथे रडत-कुढत
कधी परत जातो म्हणून दिवस मोजत
आता मात्र विचाराल तर घर इथे, मन इथे
स्वप्ननगरी ही अशी मन भावली
पण शेवटी माणूस आम्ही
दिले कितीही तरी कमी

आमची ही वेळ इथली संपेल कधी तरी
घरी परतायची हुरहुर लागेल पुन्हा मनी
नवीन विचार, नवीन आचार असलेली
नवीन पाखरू येतील इथे
प्रेमाचे घरटे करून वावरतील इथे
पूर्ण करतील स्वप्न आमच्या सारख्या अनेकांची राहिलेली

nitinkhanapurkar@yahoo.com






# दुबईतील संस्कृती

**संजीवनी पाटील**



परदेशात मराठी अभ्यास संस्कारवर्ग सुरू करून, मुलांमध्ये मराठी संस्कृती आणि भाषेबद्दल प्रेम निर्माण करण्याची धडपड करणाऱ्या संजीवनी पाटील आपले विचार मांडत आहेत.



नमस्कार मंडळी!

उद्योगासाठी, नोकरीसाठी म्हणून भारत सोडून दुबईत वास्तव्य झाले. गेली २५ वर्षे दुबईत असल्याने दुबई हेच माहेरघर झाले. दुबईत महाराष्ट्र मंडळ असल्याने मराठी संस्कृती जपणं सहज शक्य झाले. आपल्या हिंदू संस्कृतीचा अभिमान असतानाच, अरबी समाजात वावरताना अनेकदा ते आपली संस्कृती कशी जपतात याचे कौतुक वाटते. खरंतर संस्कृती म्हणजे काय तर आपले पूर्वापार चालत आलेले संस्कार आपण स्वतः आणि कुटुंबात ते जागृत ठेवणे!

ही संस्कृती अरेबिक कुटुंबात पण आहे. नवीन आल्यावर पहिल्याच दिवशी सकाळी साडेपाच वाजता त्यांच्या अरेबिक प्रार्थनेने जाग आली. कारण आमच्या घराजवळच मस्जिद होती. आणि तेव्हा मला आणि मुलांना दचकून जाग आली. असे वाटले आपल्या भारतात काकड आरतीने किंवा प्रार्थनेने कधीच जाग येत नाही! पण नंतर इतक्या वर्षांत ते अंगवळणी पडले. पहाट झाल्यावर कोंबडा आरवण्याने जशी जाग येते तशीच त्यांच्या प्रार्थनेने यायची. अशी प्रार्थना दिवसातून तीन वेळा ऐकू येते. तसेच बाहेर सर्वकडे नमाज पढायला ठरावीक जागा केलेली असते हे लक्षात आले. त्या त्या वेळेला त्या त्या ठिकाणी जाऊन अरबी लोक नमाज पढतात. सुरुवातीला थोडे आश्चर्य वाटले; पण नंतर लक्षात आले की रस्त्यावरच्या कामगारापासून राजापर्यंत ही संस्कृती पाळली जाते. रमझानच्या काळात पाणीही न पिता हे सर्व सांभाळणं कठीणच आहे. परंतु लहान मुलापासून सर्व स्त्री–पुरुष व वृद्ध मंडळीसुद्धा हे सर्व रिवाज पाळतात. रमझानमध्ये तेवढ्याच उमेदीने हे सर्व आपल्या कुटुंबासमवेत शॉपिंग करतात.

दुबईसारख्या उन्हाळी प्रदेशातही स्त्रिया काळा बुरखा घालून दिमाखात वावरतात. तसेच अरबी पुरुष एकदम सफेद वस्त्र वापरतात. जसे आपल्याकडे कोणीही भेटल्यावर नमस्कार करतो तसे अरबी लोक सलाम आलेकुम – वालेकुम सलाम म्हणतात. एकमेकांच्या नाकाला नाक घासतात. हीच त्यांची मैत्री वाढवण्याची पद्धत आहे. जसे आपल्याकडे कोळीनृत्य किंवा लावणीसारखी सांस्कृतिक नृत्ये आहेत, तसेच अरेबिक लोक काठीचा वापर करून नृत्य करतात. संगीताच्या तालावर ही मंडळी सामूहिक नृत्य करतात. सहसा अरबी स्त्री नृत्य करताना दिसत नाही.

अजूनही या देशात स्त्री आणि पुरुष हा भेदभाव जाणवतो. पण तरी आता अरबी स्त्रियाही उत्तमप्रकारे शिक्षण घेऊन नोकरी करताना आढळतात. सुरुवातीला इथे येण्यापूर्वी मनावर खूप दडपण होते की वाळवंटात जायचं आहे, त्यांचा ड्रेस घालायचा, भाषा बोलायची, पण इकडे आल्यावर जाणवले की विशेषतः दुबईत असे कोणतेच बंधन नाही.

मुलांना शाळेत अरबी भाषा शिकवली जाते हे चांगलेच आहे. जसे महाराष्ट्रात मराठी तसे इथे अरबी! अरबी लोक उत्तम हिंदी, इंग्रजी बोलतात; पण आपल्याला मात्र अरबी लिहिता–वाचता येत नाही याची खंत वाटते.

दुबईसारखा वाळवंटी देश– यह्या देशाची प्रगती पाहिली, त्यांनी जपलेली संस्कृती पाहिली की असे वाटते,



आपल्या भारतातही प्रगती आहे, पण आपली संस्कृती आपण जपतो का? आपण स्वतः प्रार्थना करतो का? मुलांमध्ये रुजवतो का? या प्रश्नांची उत्तरे म्हणून मी दुबईत मराठी शाळा सुरू केली. इथे अभ्यासाबरोबर संस्कारवर्ग घेतले जातात. आणि पुढली पिढी ही विद्वत्तेबरोबर संस्कारानेही आखाती देशात घडली जाईल याचे प्रयत्न करत आहे. अशा या अरेबिक संस्कृतीला माझा मानाचा सलाम!

**– संजीवनी पाटील**

(माजी अध्यक्ष/ट्रस्टी महाराष्ट्र मंडळ, दुबई)

sanjivani_v@hotmail.com



# आध्यात्मिक दुबई


## दासबोध अभ्यासवर्ग, दुबई... सिंहावलोकन!

**सलील जामखेडकर**

दुबईत गतिमान जीवन व्यतीत करत असताना, सांभाळावे लागणारे व्याप, नकळत घडणारे उपद्व्याप आणि त्यातून निर्माण होणारे ताप या पार्श्वभूमीवर विचार करता सुमारे १४ वर्षांपूर्वी दुबईत सुरू केलेला उपक्रम म्हणजे वाळवंटातील हिरवळ किंवा एखादे स्वप्न म्हणावे लागेल. पण आजही हा उपक्रम चालू आहे म्हणून ते स्वप्न नसून सत्य आहे आणि साधकाचे भविष्य त्यातून घडेल यात शंका नाही.

जेव्हा गतीमधील अगतिकता कळूनही व्यथित न होता आम्ही सत्संगात राहू, तेव्हाच साधकाची वाटचाल सोपी होईल. ''प्रपंची वीट मनिला, मने विषय त्याग केला, तरीच पुढे अवलंबिला, परमार्थ मार्ग!''

अशा विचारातून प्रेरणा घेत ''समर्थ रामदास स्वरूपसिद्ध दासबोध'' ग्रंथाच्या वाचनाचा प्रस्ताव पुढे आला आणि दासबोध अभ्यासवर्ग सुरू झाला. या वर्गाला उपस्थित असणाऱ्या सर्वांना म्हणजे श्री. व सौ. काळे, जव्हारकर,



शिरसाळकर, नरगुंद, सतीश गदगकर या मंडळींना दुबईत येऊन १५ वर्षे होऊन गेली होती. आपापल्या व्यवसायात सर्व यशस्वी व समाधानी झाले होते. म्हणजे थोडक्यात काय तर परमार्थाला प्रतिकूल असलेल्या त्यांच्या काळात त्यांनी हा वर्ग सुरू केला. आजही दासबोध अभ्यासवर्गाच्या अभ्यासकांना त्यांचे मार्गदर्शन मिळत असते, पुढे मिळत राहील. 'ragging' न करणारे seniors आमच्या या दुबईच्या विद्यापीठात आहेत आणि त्याबद्दल आम्ही त्यांचे खरंच ऋणी आहोत.

२००० ते २००१ या दरम्यान डॉ. निमखेडकर यांनी हा अभ्यासवर्ग आपल्या पंखाखाली घेतला. गाढा व्यासंग, नियमितपणा, तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि कनवाळू स्वभाव हे अंगभूत असलेले गुण आणि कुशल संघटक असल्याने साधक वाढू लागले. तर दासबोधातील काव्य, लाक्षणिक अर्थ, त्याचे आजच्या काळासंदर्भात असलेले महत्त्व ह्याचे विश्लेषण श्री. गिरीशजी शिरसाळकर फार सुंदर करतात. अशा दुग्धशर्करा योगामुळे अभ्यासातील रस वाढू लागला. येथे येणाऱ्या सर्व तरुण साधकांना अजून मार्गदर्शन कसे देता येईल या विचारातून पुढे अनेक सत्संग दुबईतील साधक डोळ्यांसमोर ठेवून केले गेले.

श्री व सौ. न्यायाधीश, डॉ. संजय जाधव यांची भर पडल्यानंतर अभ्यासाला विशिष्ट दिशा मिळत गेली. सांप्रदायिक पद्धतीने ग्रंथाचे वाचन, उपासना हे त्यातून समजले. त्यानंतर डॉ. श्री.द. देशमुख यांच्या आगमनाचा फार मोठा फायदा झाला. आम्ही त्यांना डॉ.काका म्हणतो. ते इथे आले आणि वर्गाची दिशा, हेतू, अभ्यासाची पद्धत याची नवीन दृष्टी मिळाली. सोप्या भाषेत सांगायचे तर परमार्थ, साधना, जप, ध्यान, मोक्ष हे सर्व याच जन्मात प्रपंच करताना कसे करायचे हे उमगू लागले. डॉ. संजय जाधव म्हणजे चालता-बोलता ज्ञानकोश! अफाट बुद्धिमत्ता, विलक्षण स्मरणशक्ती, बहुश्रुतता आणि खुमासदार भाषा या पायांवर पक्की बसलेली त्यांच्या अभ्यासाची घडी आम्हालाही समृद्ध करत होती. जगभरातल्या तत्त्ववेत्त्यांची चिंतने, विविध तत्त्वज्ञानांचा अभ्यास, विविध धर्मांची वैशिष्ट्ये, भारतातील संत कबीरजी, सुफी संत, स्वामी विवेकानंद अशा कितीतरी विषयांवर बोलण्यात त्यांचा हातखंडा! अर्थातच आम्ही त्याचा उपयोग करून न घेतला तरच नवल! माननीय दातीर, दाणी, दिवटे, गवांदे, शुक्ल, मेहता या सर्वांची घरे सत्संगासाठी नेहमीच उपलब्ध असतात.

डॉ.काकांची दर वर्षाआड एक अशी पाच प्रवचने झाली. या प्रवचनांनी आम्हाला डोळस केले. कितीतरी वक्ते आणि साधक इथे मार्गदर्शक म्हणून येत राहिले. त्यात प्रामुख्याने डॉ.काकांच्या शिष्या अलकाताई मुतालिक, लघु ज्ञानेश्वरीचे लेखक श्री. न.म. दातार यांची प्रवचने, तसेच कीर्तनकार चारुदत्त बुवा आफळे, ह.भ.प. राजेंद्र मुंडेवाल यांची कीर्तने झाली. पद्मश्री डॉ. यु.म. पठाण यांचे ज्ञानेश्वरीवर मार्गदर्शन लाभले. समर्थ विरचित सोली व सुख यावर लघुप्रवचन सौ. जोशी ह्यांनी दिले. ह्यातील बरीचशी मंडळी आपल्या आप्तांकडे किंवा पर्यटनास किंवा इतर ठिकाणी सत्संगात आली होती.

**दुबईसारख्या अत्याधुनिक शहरात कितीही ऐहिक सुखे मिळाली तरी प्रत्येकाच्या जीवनात काही त्रुटी राहून जातात. यह्या त्रुटींचे स्वरूप जरी भिन्न असले तरी त्यावरील उपायाचा समान धागा एकच आहे तो म्हणजे अध्यात्म! यातूनच दासबोध अभ्यासवर्गाचा उगम झाला. गेल्या १४ वर्षातील दासबोध वर्गाचे सिंहावलोकन केले आहे**
**श्री. सलिल जामखेडकर यांनी!**



''धरी श्रावणाची आवडी, अद्वैत निरुपणाची गोडी, मानाने अर्थांतर करी मानवा साधक'' समर्थ भक्त सुनीलदा चिंचोलकर यांची झालेली प्रवचने म्हणजे पर्वण्याच होत्या. एप्रिल २००७ मध्ये त्यांची दासबोधावर प्रवचने झाली. त्यातील बरेच समास केवळ प्रापंचिक होते. वाचायला सोपे वाटणारे समास त्यांनी अजूनच सोपे करून सांगितले. म्हणजे अगदी आंबेमोहोर तांदळाच्या भातावर लोणकढी तूप असा व्यवहार होता. त्याच वर्षी समर्थांच्या ४००व्या जयंतीचे वर्ष होते. दुबईतील साधकांनी स्मरणिका प्रकाशित करण्याचा संकल्प सोडला. मार्च २००८ मध्ये डॉ. संजय जाधव यांच्या हस्ते या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. सर्व साधकांनी आपल्या



लेखनाचे पुष्प गुंफून झालेला 'सुमनहार' त्याच नावाने स्मरणिकेच्या स्वरूपात प्रकाशित केला.

डिसेंबर २०१०, महाराष्ट्राची आध्यात्मिक मुळी संत ज्ञानेश्वर यांच्या संजीवन समाधीच्या दिनी ''संत वाङ्मय सोहळा महाराष्ट्र मंडळ दुबई''च्या छत्राखाली साजरा करण्यात आला. सोहळ्याचे अध्यक्षपद आचार्य गोविंद देवगिरी, उपाख्य श्री. किशोरजी व्यास यांनी भूषविले. स्थानिक साधकांच्या दिंडीने सोहळ्याची सुरुवात झाली. श्री समर्थ, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांचे तत्त्वज्ञान अनुक्रमे समर्थ भक्त सुनीलदा चिंचोलकर, ह.भ.प. प्रमोद महाराज जगताप, पद्मश्री डॉ. पठाण आणि गुरुदेव शंकर अभ्यंकर ह्यांनी प्रतिपादित केले. संत एकनाथांचे चरित्र युवा कीर्तनकार प्रणव देव ह्याने कीर्तनाद्वारे केले. मधुरा जोशी यांनी भरतनाट्यम नृत्याद्वारे मधुर भक्ती सादर केली.

जानेवारी २०११ मध्ये श्री. चिंचोळकर यांची प्रवचने 'राम कथा आणि मनाचे श्लोक' या विषयांवर झाली. इंद्रियांवर आणि षड्रिपूंवर जय मिळवून अमर तत्त्वाचा प्रवास सोपा होऊ शकतो ही शिकवण झाली.

मार्च २०१२ मध्ये दासबोध अभ्यासाची साखळीरूरुपात सांगता झाली. त्यात सत्संग, प्रवचने होती. हे सर्व मिळून सुमारे बारा वर्षे पूर्ण झाली. दासबोध अभ्यासाची सोबत कायम ठेवून भगवद्गीतेचे देशीकार लेणे अभ्यासायचे ठरवले.

भ्रांत अर्जुनाला भगवंताने देववाणीत उपदेश केला. आपले भाग्य असे की आपल्याला तो उपदेश ज्ञात व्हावा, उपयोगी पडावा म्हणून ज्ञानोबांनी तो आपल्यासाठी भाषांतरित केला. माऊलींच्या भाषेचा गोडवा ऐकला की मन थक्क होते आणि ''माझा मराठीचा बोल कौतुके, परी अमृताते पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिका मेळवीन'' ही प्रतिज्ञा सिद्ध झाल्याचे प्रचीतीस येते. आजमितीस ज्ञानेश्वरीच्या पहिल्या दोन अध्यायांचे वाचन व श्रवण पूर्ण झाले आहे.

मार्च २०१३ मध्ये सर्वांना स्मरणात राहील असा 'कीर्तन सोहळा' साजरा झाला. ''नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी'' हे बोधवाक्य घेऊन कालमर्यादेमुळे फक्त तीन प्रकारची कीर्तने सादर होऊ शकली. सोहळ्याची सुरुवात स्थानिक कलाकारांच्या वारकरी दिंडीने झाली. संत एकनाथांच्या भारुडांचाही त्यात समावेश होता. संपूर्ण पथकाला सुषमा शिंदे यांनी दिग्दर्शित केले. अध्यक्षस्थान विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी भूषविले. गणेश वंदना, सरस्वती वंदना झाल्यानंतर डॉ. निमखेडकर यांचे प्रास्ताविक, मंडळाचे अध्यक्ष प्रकाश केळकर यांचे मनोगत, सोहळ्याचे उद्घाटन व स्मरणिकेचे प्रकाशन झाले. शेवटी अभ्यंकर यांनी वारकरी कीर्तन सादर केले. 'अरे अरे ज्ञाना झालासी पावन' हा अभंग निरुपणास होता. असा हा विलोभनीय सोहळा आजही डोळ्यांसमोर उभा राहतो.



आतापर्यंत झालेल्या श्रवणाच्या शिदोरीवर, प्रवचनावर आधारित अशी पुस्तके गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रकाशित झाली. गिरीश शिरसाळकर आणि सौ. मंगला काळे ह्यांनी 'विचार सागर' या ग्रंथावरील प्रवचनांवर 'सार विचार सागर' हे पुस्तक लिहिले. सौ. ज्योती जव्हारकर आणि राजेश दिवटे यांनी 'आत्माराम' या ग्रंथावरील प्रवचने पुस्तक रूपात लिहिली. दोन्ही पुस्तकांच्या अक्षरजुळणीपासून ते प्रकाशन सोहळ्यापर्यंतच्या सेतू बंधनाचे काम न्यायाधीश द्वय, सचिन कोडोलीकर आणि रवी जोशी यांनी केले.

येथून पुढेही सत्संग चालू राहतीलच. साधकांची जास्तीत जास्त प्रगती होईल, ज्ञानलालसेने नवीन साधक वाढतील, पण त्यासाठी गुरुकृपा व्हावी, ईश्वरभक्ती वाढावी हीच आपल्या सुजन वाचकांना प्रार्थना!

''जय जय रघुवीर समर्थ''

**– सलिल वि. जामखेडकर**
jamkhedkar@gmail.com



SELECTED Superbrand Consumer Validated

## सणासुदीत मिसळू द्या आनंदाचा गोडवा
## सोबत ऐवरेस्ट केशर आणि केशरी मिल्क मसाला हवा.

नातेवाईक आणि मित्रमंडळी यांच्यामुळेच घरात आनंद बहरतो. मग त्यांचे स्वागत आणि तोंड गोड करा
ऐवरेस्ट केशर आणि केशरी मिल्क मसाल्याने बनविलेल्या गोडधोडाने.
या रुचकर क्षणांची सोबत वर्षानुवर्षे आठवणीत राहील आणि दिवाळी होईल चिरस्मरणीय!







EVEREST

Follow us on f अनेक चविष्ट पाककृती जाणून घेण्यासाठी लॉग ऑन करा www.everestspices.com वर.

Situations/Everest/237/2015 Mar